# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

### दिनांक २०-०१-१९९२ ते ३१-०३-१९९२

### रजिष्टर क्र.०९

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सोमवार दिनांक २०-१-१९९२ रोजी सर्वसाधारण सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्तांत**
**सोमवार दिनांक २०-१-१९९२ रोजी मा.महापौर श्री.किशोर थोरात**
**यांचे अध्यक्ष ते खाली अंदाजे ११.२५ वाजता वंदेमातरम या गिताने सभेस**
**सुरूवात झाली या सभेस मा.आयुक्त, उप-आयुक्त तथा अधिकारी व खालील, स.सदस्य उपस्थित होते.**

१) मा.श्री.शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
२) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
३) मा.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
४) मा.श्री.सोनवणे केशव काशिनाथ
५) मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीक
६) मा.श्री.ओक जयवंत केशवराव
७) मा.श्री.गिल एकबालसिंग प्रितमसिंग
८) मा.श्री.अ.रशीदखान (मामू) अ.हमीदखान
९) श्रीमती दलाल लता श्रीनिवास
१०) मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
११) मा.श्री.खैरे चंद्रकांत भाऊराव
१२) मा.श्री.मगर शंकर जिजाराम
१३) मा.श्री.मानकापे नामदेवराव शामराव
१४) मा.श्री.पैठणकर पांडूरंग भिमाजी
१५) मा.श्री.सुम्रीम हेरलाल रिडलान
१६) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
१७) मा.श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ
१८) मा.श्री.शिंदे मधुकरराव माणिकराव
१९) मा.श्री.डॉ.काळे शांताराम यशवंतराव
२०) मा.श्री.जहागिरदार अजिज मुख्तार अहेमद
२१) मा.श्री.जावळे प्रकाश शिवराम
२२) मा.श्री.गोडसे आनंद जगदिश (रजे बाबत पत्रक दिले आहे)
२३) मा.श्री.गाडे गंगाधर खुसदेव (रजे बाबत पत्रक दिले आहे)
२४) मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
२५) मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** आजच्या सभेमध्ये कोरम पुर्ण नसल्याने आजची सभा तहकूब करण्यात यावी हि विनंती.

**मा.महापौर :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार सभागृहात कोरम पुर्ण नसल्याने आजची सभा तहकूब करण्यात येते व सभेची पुढील तारीख सर्व स.सदस्यांना नंतर कळविण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी.

राष्ट्रगिताने सभा समाप्त झाली

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०-१-१९९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त गुरूवार दिनांक ३०-१-९२ रोजी सर्वसाधारण सभा मा.महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे अध्यक्षतेखाली अंदाजे ११.२० वाजता वंदेमातरम् या गितांने सुरू झाली**

**सभेस मा.आयुक्त, उप-आयुक्त व अधिकारी तसेच खलील स.सदस्य उपस्थित होते.**

१) मा.श्री.थोरात किशोर गोविंदराव
२) मा.श्री.यादव अशोक सायन्ना
३) मा.श्री.शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
५) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
६) मा.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) मा.श्री.गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
८) मा.श्री.सोनवणे केशव काशिनाथ
९) मा.श्री.भमूरे तुळशिराम छगन
१०) मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीक
११) मा.श्री.पाटील नरेंद्र यादवराव
१२) मा.श्री.घडामोडे मोतीराम नारायणराव
१३) मा.श्री.म.आयुब गुलाम जिलानी
१४) मा.श्री.मुजीब आलमशा खान
१५) मा.श्री.प्रधान बंडू गोविंदराव
१६) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
१७) मा.श्री.तकिहसन खान कासिमहसन खान
१८) मा.श्री.स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतूबुद्दीन
१९) मा.श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
२०) मा.श्री.ओक जयवंत केशवराव
२१) मा.श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२२) मा.श्री.वंजारे पिटर प्रभाकरराव
२३) मा.श्री.अ.रशीदखान (मामु) अ.हमीद खान
२४) श्रीमती दलाल लता श्रीनिवास
२५) मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२६) मा.श्री.खैरे चंद्रकांत भाऊराव
२७) मा.श्री.हाजी मोहमद हफिजोद्दीन
२८) मा.श्री.छापरवाल रमेश नारायण
२९) मा.श्री.डॉ.संचेती चेणकरण गणेशलाल
३०) मा.श्री.म.इस्माईल अ.करीम
३१) मा.श्री.फैय्याजखान अहमद खान

३२) मा.श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
३३) मा.श्री.स.हुसैन स.अहमद
३४) मा.श्री.मगर शंकर जिजाराम
३५) मा.श्री.मानकापे नामदेवराव शामराव
३६) मा.श्री.पैठणकर पांडूरंग भिमाजी
३७) मा.श्री.अलफखान हुसैन खान
३८) मा.श्री.वाघमारे सुदाम भानुदास
३९) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
४०) मा.श्री.अजिमखान दादामियाँ अ.रहेमान
४१) मा.श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ
४२) मा.श्री.शिंदे मधुकरराव माणिकराव
४३) मा.श्री.डॉ.काळे शांताराम यशवंतराव
४४) मा.श्री.दत्त प्रदिपकुमार एस
४५) मा.श्री.बारवाल गजानन रामकिसन
४६) मा.श्री.मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४७) मा.श्री.जावळे प्रकाश शिवराम
४८) मा.श्री.गाडे गंगाधर सुखदेव
४९) मा.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
५०) मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५१) मा.श्री.परदेशी सुभाष शिवलाल
५२) मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

विषय क्रमांक १ : दिनांक ३१-१२-९१ रोजी संपन्न झालेला व दिनांक १९-१२-९१च्या तहकूब झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद:

श्री.रशीद मामू : शहरातील सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्यीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्रमासंबंधी पत्र काल देण्यात आले होते परंतु त्यातील मजकुर काय आहे तो मला समजत नाही कृपया आपण वाचुन दाखववे किंवा सचिवांनी वाचुन दाखववे सदरील पत्रामध्ये खालच्या मजकुरातील पॅरेग्राफ मध्ये असे लिहिले आहे की राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना श्रध्दांजली अर्पन करण्यासाठी ००.०२ मिनिटे उभे राहून याचा लाभ घ्यावा. अशा प्रकारचे शब्द प्रयोग करणे म्हणजे राष्ट्रपित्यांचा अपमान होय. असे मला वाटते या बाबत मा.महापौर आपण काय कार्यवाही करणार ?

श्री.मोरेश्वर सावे : स.सदस्य श्री.रशीद मामू यांनी सुचित केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमासंबंधी वर्तमान पत्रासाठी जे पत्र नावानिशी लिहिले आहे व त्यातील मजकुर बेजबाबदार पणे लिहिलेला असुन त्याखाली संबंधित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी सुध्दा केलेली नाही अशा जबाबदार अधिकाऱ्या विरूध्द मा.आयुक्त

आणि मा.महापौर यांनी योग्य ती नोंद घेवून कार्यवाही करावी या बाबत सभागृहात आमचा सर्वांचा पाठींबा आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : एका चतुर्वश्रेणी महिला कर्मचारी यांना पिरबाजार उस्मानपुरा येथे एका नागरीकांनी मारहान केल्यामुळे त्या भागातील सफाई कामगारांनी काम बंद केलेले आहे तेव्हा आपण त्या संदर्भात काय कार्यवाही करणार ?

मा.महापौर : स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे मो.पिरबाजार उस्मानपुरा येथे काय झाले याची कल्पना आम्हाला नसल्याने आम्ही काहीही सांगु शकत नाही माहिती मिळाल्यास योग्य ती दखल घेवू परंतु सरदची सभा दोन वेळेस तहकुब झाल्याने या सभेतील विषय पत्रिकेवरील लोकोपयोगी प्रशासकीय प्रस्ताव अगोदर मंजुर करणे महत्वाचे आहे तेव्हा सर्व स.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी चर्चा इतिवृत्तावर करून सहकार्य करावे.

श्री.नामदेवराव मानकापे : आजच्या अजंडयावरील पान क्र.९ वर माझ्या नावामध्ये काय बदल केलेला आहे तो कृपया वाचुन दाखवावा.

मा.महापौर : सचिवांनी खुलासा करावा.

सचिव : स.सदस्यांनी सुचित केल्यानुसार इतिवृत्तातील पान क्र.९ वर टाईप करीत असतांना स.सदस्याचे नावात नजर चुकिने चुक झाली त्या बाबत दुरूस्ती करण्याची परवानगी द्यावी.

मा.महापौर : ठिक आहे.

सचिव : प्रशासनातर्फे विषय क्र.६२/२ मधील स्वेच्छा निधी नियमावलीमध्ये दुरूस्ती बाबत पत्र आलेले आहे त्यामध्ये दुरूस्ती करावयाची आहे तो मजकुर मी आपल्या सर्वासमोर वचुन दाखवितो.

वरील विषयास अनुसरून विनंती करण्यात येते की पृष्ठ क्र.३५ इतिवृत्ता सर्वसाधारण सभा १९-१२-९१ ठरावातील मुद्दा क्र.४ अनुसार स.नगरसेवकांना रूपये १५,०००/- पर्यंन्त सार्वजनिक व लोकहिताच्या दुष्टीने स्वेच्छा निधीमधुन एखाद्या खाजगी रजिस्टर्ड (पंजीकृत) संस्थेला खेळाचे साहित्य मदत करू शकतात सदरील संस्थेने या रक्कमेच्या खर्चा बाबतचे प्रमाणपत्र ( Uitilizution Certificate) खर्च झाल्यानंतर कार्यालयात ३ महिन्यात सादर करावे.

श्री.प्रदिप जैस्वाल : सचिव साहेब आपण काय वाचत आहात हे सभागृहाला समजले पाहिजे आपले काय म्हणने आहे तो समजु द्या ?

श्री.मोरेश्वर सावे : कोणत्या विषयाला सुरूवात झाली मा.महापौरांनी सचिवांना परवानगी दिली आहे काय ? ही सभा चालविण्यास मा.महापौरांनी विषयानुसार परवानगी द्यावी किंवा दुरूस्तीस परवानगी देवूनच पुढील कामकाज चालु करावे एकदम सचिवांनी उठून विनापरवानगी कामकाजास सुरूवात करू नये.

सचिव : स्वेच्छा निधी नियमावलीमध्ये दुरूस्ती संर्दभात मा.महापौर यांची परवानगी घेतलेली आहे.

मा.महापौर : प्रशासनातर्फे पत्र देवून कळविण्यात आले आहे की विषय क्र.६२/२ पुष्ठ क्र.३५ मध्ये स्वेच्छा निधी नियमावली मध्ये काही दुरूस्ती सुचवायची आहे ती सभागृहाच्या निर्णयासाठी आहे आपल्या सर्वाच्या विचारान्वये योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अलफखान हुसैन खान : एखद्या प्रस्तावामध्ये आपणास दुरूस्ती करावयाची झाल्यास त्यामध्ये अमेंड करावे लागते उदा.मी म्हटले की जेवन करा आणि त्यामध्ये जेवन करू नका आशी दुरूस्ती करावयाची असल्यासच होईल अन्यथा नाही याचा अर्थ असा की सभागृहातर्फे जे प्रस्ताव मंजुर होतात ते आपण दुरूस्त करणे हे योग्य नाही.

मा.महापौर : ठिक आहे स.सदस्यांच्या सुचने प्रमाणे सदरील दुरूस्ती करणे योग्य नसुन नंतर दुरूस्ती बाबत प्रस्ताव मांडावा

श्री.प्रदिप जैस्वाल : मी मागील सभेमध्ये प्रश्न उपस्थित केलेला होता त्या प्रश्नाचे उत्तर मला योग्य ते मिळाले नाही महानगरपालिकेचे आरक्षण १७६ आहेत त्या आरक्षणापैकी ८७ आरक्षणावर ९५% वस्ती झालेली आहे राहिलेल्या आरक्षणाबाबत मा.आयुक्त, मा.महापौर व सहाय्यक संचालक नगर रचना यांनी संबंधित लोकांशी निगोशिअस करून कार्यवाही करावी व जमीन ताब्यात घ्यावी कारण आरक्षण क्र.१५१,१५२ असे आहेत की तेथे सुध्दा जागा शिल्क राहत नाही याबाबत सभागृहात ठोस निर्णय होणे आवश्यक आहे.

सौ.लता दलाल : मागील सर्वसाधारण सभेमध्ये मी प्रश्न विचारलेला होते की महानगरपालिकेमध्ये तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची राखीव व सर्वसाधारण किती पदे आहेत. राखीव पदापैकी एस. सी., एस. टी., एन. टी.,व्ही.जे.एन.टी. पदे इत्यादी भरल्याची यादीसह सविस्तर माहिती आम्हाला मिळवयास पाहिजे होती परंतु ती सविस्तर यादी मला मिळालेली नाही तेव्हा मी विचारलेल्या प्रश्नांची माहिती कधी पर्यंत देणार याचा खुलासा व्हावा. संबंधित विभागाकडून त्या ठिकाणी गेल्यानंतर माहिती मिळाल्यास या सभेत प्रश्न विचारण्याचा अर्थ काय ?

श्री.शांताराम काळे : गेल्या सहा महिन्यापासुन प्रस्ताव पडलेले आहेत तेव्हा अगोदर अजंडयातील प्रस्तावावर चर्चा करून निकाली काढावे आणि स.सदस्यांचे जे काही प्रश्न उपप्रश्न असतील ते सभेतील प्रस्ताव संपल्यानंतर घेण्यात यावे ही कळकळीची विनंती.

सौ.लता दलाल : यापुर्वीच्या सभेमधील प्रस्तावास सुरूवात करण्यापुर्वी प्रश्नोत्तराचा तास होत होता म्हणून मी सदरील प्रश्न उपस्थित केलेला आहे.

श्री.शंकर मगर : स.सदस्य श्री.शांताराम काळे यांनी जे सुचित केले आहे त्याप्रमाणे या इतिवृत्तातील प्रशासकिय प्रस्ताव अगोदर चर्चेला हयावे आणि नंतर प्रश्नोत्तरे घेण्यास माझे व सहकाऱ्यांचे सहमत राहील.

मा.महापौर : विषय क्र.एक मंजुर करण्यात येतो.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १९-१२-९१ रोजी तहकुब झालेल्या सर्वसाधारण सभेचे व दिनांक ३१-१२-९१ च्या तहकुब सभेचे इतिवृत या व इतर दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्रमांक २ : मा.महापौर यांनी दि.१९-९-९१ च्या सर्वसाधारण सभेत निर्देशित केले की आरक्षण क्रमांक १५० व १५१ चा प्रस्ताव दुरूस्ती करून पुढील सभेत ठेवणेत यावा. त्यानुसर प्रस्ताव ठेवणेत येतो की शहर सुधार समितीने दि.२६-९-९० च्या बैठकित प्रशासनाने भुसंपादनासाठी सादर केलेल्या १६ आरक्षणा पैकी एकूण १० आरक्षण खालील जमिनिचे भूसंपादन करणेची शिफारस सर्वासाधारण सभेस केली होती हयामध्ये आरक्षण क्र.१५७ खुली जागा चे भुसंपादन करणेची शिफारस होती.

शहर सुधशर समितीचा वरील ठराव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ दि.२०-३-९१ ठेवणेत आला असता स.सदस्य श्री.इकबालसिंग गिल यांनी आरक्षण क्र.१५७ खुली जागा वगळनेत यावी अशाी सुचना केली हे इतिवृत्त दि.११-४-९१ च्या सभेत कायम करणेसाठी आले असता श्री.गिल यांनी त्यांच्या वक्तव्यात आरक्षण क्र.१५७ ऐवजी १५१ अशी दुरूस्ती करणेस सुचविले त्यानुसार फक्त त्यांच्या वक्तव्यात अशी दुरूस्ती होणे आवश्यक असतांना चुकीने ती दुरूस्ती ठरावात केली गेली तसेच दि.११-७-९१ रोजीच्या सर्वसाधारण सभेत श्री.गिल यांनी ११-४-९१ च्या इतिवृत्तांत पुन्हा आरक्षण क्र.१५७ ऐवजी १५१ अशी दुरूस्ती सुचाविली परंतु त्या सभेत ठराव करतांना मात्र १५७ ऐवजी १५० व १५१ अशी दुरूस्ती चुकीने करण्यात आली.

दि.१९-८-९१ रोजी झोलल्या सर्वसाधारण बैठकित सहाय्यक संचालक नगर रचना यांनी वरील प्रमाणे चुकीने करण्यात आलेली दुरूस्ती रद्द करणे बाबत सुचना केली होती.

आता सर्वसाधारण सभेत शिफारस करणेत येते की स.सदस्य श्री.एकबालसिंग गिल यांनी इत्तिवृत्तात आलेल्या त्यांच्या वक्तव्यात दुरूस्ती करणेच्या सुचना वेळोवेळी केल्या असता वक्तव्यात दुरूस्ती करणे ऐवजी ठरावामध्ये चुकीचे दुरूस्त्या करण्यात आल्या असलेने आरक्षण क्र.१५० व १५१ संबंधी दि.३०-३-९१, ११-४-९१, ११-७-९१ व १९-९-९१ सभेत करण्यात आलेल्या सर्व दुरूस्त्या रद्द करणेत याव्यात व आरक्षण क्र.१५७ खुली जागा चे भुसंपादन करणेचा प्रस्ताव कायम करणेत यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.शंकर मगर : विषय क्र.२ हा वादाचा असल्याने अगोदर इतिवृत्तातील दुसरे प्रस्ताव घ्यावे आणि नंतर हा विषय चर्चेला घ्यावा.

श्री.प्रदिप जैस्वाल : विषय क्र.२ व ३ स्थगित ठेवून इतिवृत्तातील प्रस्ताव झाल्यानंतर या विषयावर चर्चा करावी.

मा.महापौर : ठिक आहे विषय क्र.२ व ३ तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

ठराव : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येते असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रमांक ३ : सर्वसाधारण सभा दिनांक ११-४-१९९१ चे ठराव विषय क्र.१५७/१ अन्वये खालील सहा (६) आरक्षणे मंजुर शहर विकास योजनेतुन वगळणेचा प्रस्ताव मंजुर केला आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्र. | क्षेत्र हेक्टर | आरक्षणाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १) | ९ | ०.५८ | ओपन स्पेस |
| २) | २१ | २.०८ | पार्क |
| ३) | १३ | १०.२४ | पार्क |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | २२३ | १.३५ | गार्डन |
| ५) | १५० | ७.३१ | ओपन स्पेस |
| ६) | १५२ | १९.१९ | ओपन स्पेस |

प्रशासनाने वरील आरक्षणे रद्द करणेचा प्रस्ताव कधिही ठेवलेला नव्हता उलट वरील आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन करावे असा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला होता सबब प्रस्ताव ठेवणेत येतो की विषय क्र.१५७/१ दिनांक १४/४/९१ अन्वये वरील सहा आरक्षणे मंजुर विकास योजनेतुन वगळणेचा पारित केलेला प्रस्ताव रद्द करणेत यावा. मंजुरीस्तव सादर.

ठराव : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येते असे सार्वानुमते ठरले.

संवाद : श्री.शांताराम काळे : विषय क्र.२ व ३ चे प्रस्ताव मागील सभेतील असल्याने या मध्ये तांत्रिक मुद्दा उपस्थित होती आणि ते इतिवृत्त कायम करण्यात आलेले नाही याची दक्षता घ्यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : स.सदस्यांना कळले नसेल आमचा मुद्दा असा होता की हे प्रस्ताव अगोदरचे होते व त्याचा नंबर पुन्हा लावुन त्यावर स.सदस्यांना काय चर्चा करावयाची असेल ती करावी.

मा.महापौर : सदरील विषय तहकुब करण्यात येते.

विषय क्रमांक ४ : सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संलेको-१९९१/प्र.क्र.-१६४/९१ कोषागार-१ मंत्रालय, मुंबई दिनांक ३०-८-९१ अन्वये श्री.सु.रा.भोसले यांनी मुख्यलेखा परिक्षक या पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण) अवधी स्र्वायेत्तर सेवा.....इ. नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन मधील अटी व शीर्त नुसार प्रथमत दोन वर्षासाठी सवगातील पदाचा कार्यभार सोडल्यापासुन प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली आहे श्री.भोसले यांनी संवर्गातील कार्यभार दिनांक २६-९-९१ रोजी मध्यान्हापुर्व सोडला आहे .

करिता श्री.सु.रा.भोसले यांच्या दिनांक १६-९-९१ पासुन महाराष्ट्र नगरी सेवा ( पदगृहण अवधी स्वित्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट दोन मधील अटी व शर्तीनुसार मुख्यलेखा परिक्षक या पदावर प्रथम दोन वर्षा करिता प्रतिनियुक्तीस मान्यता देण्या करिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

संवाद :

मा.महापौर : मंजुर

ठराव : प्रस्तावात दर्शविल्या नुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.संलेको-१९९१/प्र.क्र. १६४/९१ कोषागार-१ मंत्रालय मुंबई दिनांक ३०-८-९१ अन्वये श्री. सु.रा.भोसले, मुख्य लेखा परिक्षक म्हणून मनपामध्ये दिनांक १६-९-९१ रोजी मध्यान्हापुर्व रूजु झाले असुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदागृहन अवधी स्वियेत्तर सेवा ई.) नियम १९८१ मधील, परिशिष्ठ दोन मधील अटी व शर्ती नुसार मुख्यलेखा परिक्षक या पदावर रूजु झोलेल्या तारखेपासुन सोबतच्या

शर्ती व अटी नुसार प्रथम दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५ : जकात अधिक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत हीट ट्रिटमेंट या प्रक्रियेसाठी आयात होणाऱ्या मालावर जकात नियम १९८४ चे नियम १६ मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे या संबंधी पिंप्री चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्रथम १०० टक्के अनामत रक्कम घेवून १० टक्के रक्कम वजा करून ९० टक्के रक्कम परत केल्या जाते. औरंगाबाद महानगरपालिकेत तयार केलेल्या जकात नियम १९८४ चे नियम १६ अन्वये जर ४ महिन्याच्या आत आयात माल जसाच्या तसा नियति केल्यास ९० टक्के परतावा देण्याची तरतुद आहे परंतु हिट ट्रिटमेंट सारख्या प्रक्रियेसाठी ९० टक्के परतावा बाबत उल्लेख नाही, त्यासाठी जकात नियम १६ मध्ये नियम (आय) वाढविणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे तरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.अजिजुल्ला बेग : सदरील प्रस्तावा संबंधी ऑक्ट्रायचे नियम क्र.१६ बाबत काय आहे ते सभागृहात वाचुन दाखवावे.

श्री.शांताराम काळे : जकात बाबतीत हा जो प्रस्ताव आहे त्याबाबत या ठिकाणी दोन मुद्दे येतात (१) कच्च्या माल (२) हिट ट्रिटमेंट या दोही मध्ये तफावत असुन याबाबत संबंधित अधिकाऱ्याने विश्लेषन करावे की किंमती मध्ये काही फरक आहे काय ? जर कच्चा मालावर हिट ट्रिटमेंट दिल्याने किंमत वाढत असेल तर प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे १० टक्के योग्य नाही.

अशा प्रकारे शहरामध्ये अनेक कच्चा मालाचे उद्योग धंदे तुमच्याकडे येतील उदा. तेल,गॅस वगैरे कच्चा मालाचे व्यापारी मनपाकडे येण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे अशा प्रकाराने मनपाचे उत्पादनावर गदा येण्याची शकयता आहे याबाबत मी विनंती करतो की मा.आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्या बरोबर चर्चा करून सदरील प्रस्ताव योग्य की आयोग्य असे ठरवावे.

श्री.चेनकरण संचेती : मनपामधील बऱ्याचशा करांची वसुली होत नाही त्यामध्ये जकात कर सध्या येतो तेव्हा सदरील प्रस्ताव नामंजुर करावा.

श्री.नरेंद्र पाटील : सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे की, आपल्या मनपा व्यातिरिक्त इतर मनपा विषयीची चर्चा नको तरी ही पिंपरी चिंचवड असे बोलण्यात येते दुसरे एखाद्या प्रक्रियेचे रूप जसेच्या तसे नसते म्हणजे बदललेले असते मागील वर्षी औद्योगिक क्षेत्रातील एक प्रकारण जाड वायरिंगचे आलेले होते ते पातळ वायरिंग कमी केल्याचे होते हे प्रकरण मागील आयुक्तांनी रद्द केलेले होते तरिही सदरचे प्रकरण आलेच कसे हेच समजत नाही. जर इतर भागातुत या ठिकाणी कच्चा माल आणुन हिट ट्रिटमेंट होत असेल किंवा येथून कच्चा माल नेवून होत असेल तर म्हणजे प्रकियेत बदल होत असतांनाही टक्केवारी का ? तेव्हा माझ्या मते सदरील प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

श्री.प्रदिप जैस्वाल : सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री.रशीद मामु : मागील दोन वर्षापुर्वी एक पोलीसी तयार करण्यात आलेली होती आणि सदरचा प्रस्ताव दोन वर्षापासुन ठेवण्या बाबत प्रक्रिया चालु आहे याबाबत नमके कोणते कारण आहे हेच समजायला मार्ग नाही संबंधित प्रस्ताव नाईलाजाने मांडण्यात आलेला आहे काय याचा खुलासा व्हावा.

श्री.अजिजुल्ला बेग : स.सदस्यांनी सुचविल्यानुसार प्रशासना तर्फे अगोदर खुलासा व्हावा.

श्री.मोहम्मद ईस्माईल : औरंगाबाद शहरामध्ये कच्चा मालावर हिट ट्रिटमेंट घेवून माल परत घेते असे या प्रस्तावावरून समजते उद्या असे होईल की, औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रातील मोठे व छोटे उद्योगवाले कच्या मालावर हिट ट्रिटमेंट करून माल आयात निर्यात करतील आणि मनपाला म्हणतील की जकात कर वसुल करू नका हे म्हणने चुकीचे आहे अशा प्रकारे नियम नाही अगोदरच मनपा आर्थिक दृष्ट्या अडचणीत असुन असे काही केल्यास अंदाजपत्रकात तशी तरतुद करावी लागेल आणि या बाबत मनपाला आर्थिक नुकसन होण्याची शक्यता आहे यासाठी सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा.महापौर : सभागृहामध्ये सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

ठराव : सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रमांक ६ : स्थायी समिती विषय क्र.२६७/१४ दि.४-१-९२ अन्वये मुल्य निर्धारण अधिकारी -२ यांनी प्रस्ताव दिला आहे की, ९२-९३ या पुढील वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील मालममत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण नऊ व कलम ९९ अन्वये स्थायी समितीने दि.२०-२-९२ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे त्यानुसार सन ९२-९३ या वित्तीय वर्षासाठी खालील दर स्थायी समितीचे मंजुरीस्तव प्रस्तावति आहे खालील कराचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

(१) समान्य कर ३०% (सध्या आमलात असलेल्या दर २२% त्याऐवजी ३०% )

(२) साफसफाई कर ३%

(३) सर्वसाधारण पाणीपट्टी ३% (मुं.प्रां.म.अ.१९४९ चे कलम १३० प्रमाणे तसेच ज्या घरांना महापालीकेचे नळ कनेक्शन नाहीन्

(४) वृक्ष कर ०.५०%

(५) अग्निशमन कर ०.७५%

तसेच राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराचे आकारणी कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे व दराने शासन निर्णया नुसार करण्यात येईल.

| अ.क्र. | करयोग्य मुल | राज्य शिक्षणकर रोजगार हमी | | |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तला उपकर वापर | |
| १) | रूपये १ ते ७४ | - | - | - |
| २) | रूपये ७५ ते १५० | २% | ४% | १% |
| ३) | रूपये १५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | रूपये ३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५) | रूपये ३००० ते ६००० | ५% | १०% | २.५०% |
| ६) | रूपये ६००० ते त्या पेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

विशेष साफसफाई कर ९१-९२ साठी अमलात असलेले सन ९२-९३ साठी स्थायी समितीचे मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

१) मोंढा व शहगंज भाजी मंडई — रूपये ४,५०,०००/-
२) रेल्वे यार्ड — रूपये १,२०,०००/-
३) एस.टी.स्टॅन्ड — रूपये ६०,०००/-
४) हॉटेल्स मोठे — रूपये १०,०००/-
अ) मध्यम हॉटेल / हॉस्पीटल / थियेटर — रूपये १,८००/- अे
ब) लहान हॉटेल/टपरी/रसवंती/ज्युसबार इत्यादी — रूपये ६००/- बी
क) कोणतीही टपरी — रूपये ३६०/-सी

वरील प्रस्तावित केलेले मालमत्ता कराचे दरा स्थायी समितीत चर्चा होऊन सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या दराने मालमत्ता आकारणी न करता यापुर्वी असलेल्या दराप्रमाणे मालमत्ता कर अकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वासाधारण सभेस शिफारस केलेली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मोरेश्वर सावे :** प्रस्ताव योग्य आहे इतर मनपाप्रमाणे या मनपामध्ये रिसोर्सेस वाढवले चाहिजे या प्रकारची शासनाची भूमिका आहे आणि त्याबाबत कुणाचेही दुभत नाही परंतु गेल्या ३१/२ वर्षामध्ये या टॅक्सेशन बाबत जो कारभार चालु आहे तो अंधाधुंद असुन माझी वैयक्तिव मागणी अशी आहे की टॅक्सेशनमध्ये वाढ करण्यापुर्वी प्रस्तावाबाबत स.सदस्यांना विश्वासात घेतले पाहिजे आतापर्यंत टॅक्सेशन वसुल करण्यासाठी किती प्रमाणात नोटीसा पाठविण्यात आल्या त्या आधारे किती लोकांनी टॅक्स भरले व किती लोकांकडून टॅक्स वसुल करण्यात आला किती प्रकरणे न्यायालयामध्ये गेली याची माहिती मिळणे आवश्यक आहे कोर्टाकडे जी प्रकाणे जातात ती गेली कित्येक वर्षापासुन कोर्टात पडून आहेत त्याऐवजी लोक न्यायालयामध्ये सदरील सर्व प्रकाणे टाकूण सदरीची प्रकारणे मिटविणे आवश्यक आहेत. कारण कोर्टबाजी मुळे मनपाचा बराच पैसा खर्च होत असतो तेव्हा मा.आयुक्तांना विनंती आहे की त्यांनी यासर्व बाबींचा विचार करून आम्हाला अगोदर तपशीलवार माहिती देण्याबाबत खुलासा करावा.

**श्री.अशोक सायन्ना :** यापुर्वी मनपातर्फे जसे घर तसे कर नुसार टॅक्स आकारण्यात येत आसे त्याप्रमाणे टॅक्सेशन बाबत योग्य ती कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. संबंधित विभागामार्फत सर्व्हे करून कर आकारणी करीत असतांना कोणत्याही घरांना कितिही कर लावल्या गेल्याचे आपल्याला पाहावयास मिळतील यासाठी संबंधित करास स्थगिती देणे ठिक राहिल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्यांना माहिती नसेल की, दरवर्षी प्रस्ताव मंजुरीस्तव येतो शासनाचे कॅलेंडर वर्षाप्रमाणे अंदाजपत्रकात तशी तरतुद करणे भाग पडते यासाठी स्थायी समितीने सदरील प्रस्ताव शिफारीस करून सर्वसाधारण सभेकडे पाठविला आहे त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री.केशव सोनवणे :** स्थायी समितीकडे विषय क्र.२६७/१४ दि.४/१/९२ अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला. हा ठराव मांडतानाच मुळात चुकीचा मांडला गेला आणि म्हणुन स्थायी समितीने ३० टक्के ऐवजी २०% सामान्य कर लावण्या बाबत या सभेत शिफारीस केलेली आहे दुसरे असे की शहरातील कोणत्या भागाना कर आकारण्यात आला .

उदा : सिडको-हडको हा भाग वगळून हा टॅक्स आहे असा स्पष्ट उल्लेख या विषयामध्ये असणे आवश्यक आहे.

**श्री.म.इस्माईल :** स्थायी समितीकडे ज्यावेळी सदरील प्रस्ताव विचाराधीन आला यामध्ये चर्चेनुसार जो मागिल टॅक्स वसुल करण्यात येते तोय टॅक्स यावर्षी सुध्दा वसुल करण्याबाबत शिफारस करून प्रस्ताव पाठविलेला आहे. सन १९८९ पासुन नविन कर आकारणी करणे या बाबतची कार्यवाही सुरू झाली. यामध्ये शहरातील बऱ्याचशा नागरीकांनी आक्षेप घेतले. ज्या घरांचे सर्व्हे करून कर लावण्यात आला त्यापैकी काही घरांना जास्त तर काहींना कमी कर लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्षात जी.एन.आर.व्ही आहे त्याप्रमाणे सर्व्हे करून कर आकारणी करण्यात आलेली नाही. यामुळे सन १९८९ प्रमाणे कर आकारणी करण्याचे जे कार्य चालु होते, त्यावर स्थगिती आणून जुनाच कर एन.आर.व्ही.नुसार आकारण्याचे सुचविण्यात आले. परंतु आजही करांवर आक्षेप आलेले असल्यास त्यामध्ये फेरफार केल्या जातो दोन वर्षापासुन जरी टॅक्सधारक असला तरीही त्याचा आक्षेप ग्राहय धरूण प्रकरण मिटविणे आवश्यक आहे.

**श्री.अलफखान :** टॅक्स बाबतचा प्रस्ताव आहे. हा गंभिर प्रश्न असुन यामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे या संदर्भात कित्येक वेळेस चर्चा झालेली आहे सन १९८९ पासुन सर्व्हे करून नविन कर आकारणे बाबत प्रशासनाने कार्यवाही केली परंतु त्याला सर्वांनी विरोध केल्यामुळे पुन्हा प्रस्तावाच्या ठरावानुसार एन.आर.व्ही.नुसार कार्यवाही करून कर आकारण्यात यावा असे ठरविण्यात आले. ज्यामध्ये सन १९८१-८२ सालाचे जे रेकॉर्ड आहे सदरील रेकॉर्ड प्रत्येक झोनच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. त्या रेकॉर्डची पाहणी करून आणि प्रत्यक्षात सध्या जे कर आकारण्यात आले त्या दोघांमध्ये टॅक्सच्या बाबतीत काही तफावत आहे काय ? याची पाहणी करणे आवश्यक आहे आणि तसे असल्यास दुरूस्ती करणे भाग पडते परंतु या ठिकाणी नागरिकांच्या चुका काहीही नसुन प्रसारास मात्र लोकांना आक्षेप अर्ज घेवुन कार्यालयात बोलविले हे याला अर्थय नाही. चुकी प्रशासनाची असुन आपण नागरिकांना कोणत्या कारणासव नोटीस देवून बोलावणी करतो यासाठी १९८१-८२ सालाचे रेकॉर्ड आणि सध्या लावण्यात येत असलेल्या करांमध्ये काय तफावत येते याची पाहणी करून दुरूस्ती सुचवावी. कारण लोकांची घरे बदललेली नसुन त्या एन.आर.व्ही.प्रमाणे आपण कार्यवाही

करावी किती घरे नल्याने बांधण्यात आली किती घरांना टॅक्स आकारण्यात आला याचा सर्व्हे होणे आवश्यक आहे. यासाठी स.सदस्य श्री.मोरेश्वर सावे यांनी सुचित केल्याप्रमाणे त्या माहितीशी निगडीत राहण्यासाठी सर्वांना समजण्यासाठी टॅक्स संर्दभात एक विशेष बैठक बोलवावी अशी मी विनंती करतो आणि संबंधित प्रस्तावाबाबत २२% सामान्य कर लागु करावा अशी माझी विनंती आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सन १९८९-९० मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनातर्फे ज्यावेळी आला त्यावेळी सामान्य कर २२% ते २५% करण्या बाबत मंजुरी मिळालेली आहे. तरीही त्या वेळेसच्या आयुक्तांनी २२% वसुली करण्यावर कार्यवाही केलेली होती. स.सदस्य श्री.मोरेश्वर सावे आणि अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे शहरातील टॅक्स धारकांना आजही लावण्यात आलेल्या टॅक्स बाबत समजलेले नाही आणि त्यामुळष ते टॅक्सधारक टॅक्स भरत नाही यासाठी बरेचसा टॅक्स वसुल होणे आवश्यक आहे शहरात नविन घरे नविन सिडको- हडको भाग आदिबाबत टॅक्स योग्य पध्दतीने लावण्यात यावा आणि राहिलेल्या एक विशेष बैठकिचे आयोजन करणे आवश्यक आहे यामध्ये बऱ्याचलोकांनी आक्षेप घेतलेले आहेत ज्याच्या नोंदी हिरव्या,  लाल शाईच्या आहेत यासाठी झोनच्या रेकॉर्डवरून सर्व तपासणी करावी पो पर्यंत सदरील प्रस्ताव नामंजुर करावा.

**श्री.अलफ खान :** स.सदस्य श्री.रफत यांच्या भागातील घरांना टॅक्स आकारणे बाबत मा.आयुक्तांशी चर्चा झालेली आहे. सदरील भा हा आरक्षेत असुन या जागेवर घरे बांधलेली आहेत आणि अशाचप्रकारे काही भाग आरक्षित असुनही घरे झ ाालेली आहेत व तो भाग स्लम घोषित झाल्याने टॅक्स वसुल केल्या जातो तर आरक्षित जागेवर घरे बनलेली आहेत त्यांचे कडून टॅक्स वसुल केल्या जात नाही हा फरक आहे अशा बाबत आपण कोणती कार्यवाही करणार याचाही विचार होणष आवश्यक आहे.

**श्री.रशीद मामु :** शहरातील घरांना जो टॅक्स लावण्यात आलेला आहे तो योग्य नाही माझ्या मते नविन सर्व्हे करून कार्यवाही व्हावी. कारण घर टॅक्स, नळ टॅक्स एकत्रीत वसुल करणे आवश्यक आहे एखाद्या वेळी संबंधित मालक घर विक्रीला काढतो व दुसऱ्यांना विकतो ते घर घेणाऱ्याच्या नांवे होते परंतु नळ पहिल्याच मालकाच्या नांवावर असतो याासठी वार्ड वाईज सर्व्हे करून घरांना नबंर टाकणे आवश्यक आहे म्हणजे घराचे नंबर घर टॅक्स, नळ टॅक्स इत्यादी बाबत एकाच वेळी रेकॉर्ड समजु शकते आणि प्रशासनाचे कार्य उत्तम चालु शकेल. यासाठी मा.महापौर यांनी याबाबत विचार करून कार्यवाही होण्यास प्रयत्नशील रहावे.

**श्री.स.अहमद स.हुसैन :** शहरातील टॅक्स बाबत नागरीक बरेचसे परेशान आहेत जो टॅक्स आकारण्यात आलेला आहे त्याबाबत आक्षेप घेणे कमी जास्त करणे वगैरे प्रकरणे सध्या चालु आहेत. यासाठी टॅक्स बाबत नागरिकामध्ये जो विेधाभास आहे तो मिटविण्यासाठी येत्या मार्च महिन्या पर्यंत कार्ववाही करणे आवश्यक आहे. कारण टॅकसची अंदाजपत्रकात तरतुद कराची लागते. त्याप्रमाणे वसुल केल्या जातो. यासाठी टॅक्सची पध्दत सुधारणेसाठी आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु सदरील प्रस्ताव सामान्य करासाठी असुन दोन्ही मध्ये

तफावत आहे यासाठी एखादे टारगेट देवून महिन्या भरात काय करता येईल याची पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.बंडू प्रधान :** सन १९९०-९१ मध्ये राष्ट्रीय जनगणनेचे मनपा मार्फत उत्कृष्ट कार्य झाले व बक्षिसपण झाले त्याच पधदतीने टॅक्स बाबतीत मनपाने चांगले कार्य करण्यासाठी कार्यवाही करावी ज्यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडू शकेल व नागरिकांनाही दिलासा मिळेल अशा पध्दतीने कार्यवाही हाती घ्यावे.

**मा.महापौर :** सभागृहामध्ये संबंधित प्रस्तावा बाबतच्या स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव पॉलीसी मॅटरचा असल्याने कोणतिही वाढ होवु नये असे सुचविल्याने सामान्य कर ३०% करणे ऐवजी २२% करण्यासाठी प्रस्ताव परत घेण्यात येतो व त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी यासोबत स.सदस्य श्री.रफत व रशीद मामू यांनी सुचित केल्याप्रमाणे आम्ही बैठक बोलाविलेली होती तरंतु दुदैवाने त्या सभेच्या विषयाचा निर्णय होत असतांना कोरम अभावी बैठक तहकूब करावी लागली त्या बैठकितील विषयानुसार जी अनाधिकृत बांधकामे आहेत त्या बाबत विचार (स्टँप) करणे चालु आहे ज्यामुळे अनाधिकृत बांधकामांना परवानगी देवून त्यांना टॅक्स लागु करून वसुल करता येऊ शकतो. ज्यामध्ये आरक्षित जागेचाही समावेश राहील कारण यामधून मनपाच्या उत्पन्नाची बाजु बळकट होण्यास मदत होईल आपण इतर मनपा विषयी या ठिकाणी बोलू नये परंतु ठाणे महानगरपालिकेने जसे केले त्याला अनुसरून आपण अनधिकृत बांधकामा बाबत कार्यवाही करत असे मी आश्वासन देत आहे.

**श्री.मोतीराम घडामोडे :** मा.महापौर सदरील प्रस्ताव आपण रद्द केला आहे काय ?

**श्री.केशव सोनवणे :** यापुर्वी सुचित केल्या प्रमाणे सिडको-हडको भागासाठी वगळण्यात यावे.

**श्री.मोतीराम घडामोडे :** स्थायी समितीने जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे आपण सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा असा निर्णय द्यावा आणि दुरूस्ती करून प्रस्ताव ठेवावा असे सुचवावे.

**मा.महापौर :** सदरील प्रस्तावात दर्शविलेले वाढीव दर रद्द करण्यात येतो आणि पुर्वीचा प्रस्ताव २२% समान्य कर लागु करण्या बाबतचा आहे तो लागु होणार कारण टॅक्स तर लावावे लागणार आहेच.

**श्री.मोतीराम घडामोडे :** जुनी पधत आहे ती आहेच.

**मा.महापौर :** स.सदस्य आपण कृपया खाली बसावे उप-आयुक्त या बाबत खुलासा करतील सदरील प्रस्ताव पॉलीसी मॅटर आणि आर्थिक बाबतीचा आहे.

**श्री.मोतीराम घडामोडे :** सिडकोला टॅक्स आपण लावु शकणार नाही तेव्हा या प्रस्तावा मध्ये तसा उल्लेख करावा की सिडको-हडकोला या मधून वगळण्यात यावे.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको-हडकोला या टॅक्स मधून वगळण्यात यावे अन्यथा आम्ही साभात्याग करू.

**मा.महापौर :** हा जो टॅक्स सर्वासाठी असुन २२% सामान्य कर लागु करण्यास हरकत नाही या मधून कुणालाही वगळता येणार नाही (स.सदस्य,श्री.केशव सोनवणे व श्री.मोतीराम घडामोडे यांचे दोघांच्या बोलण्याने काही ऐकू येत नाही यावेळी सर्व सेना सदस्य निषेध म्हणून सभागृहाच्या बाहेर जातात वेळ अंदाजे १२.२० वाजता)

**श्री.मोतीराम घडामोडे :** सिडकोला या टॅक्स मधुन वगळावे असे जोरजोरात बोलतात व (समोरील माईक तोडून खाली फेकतात बेंचची तोडफोड तरतात सभागृहात आवाज होते )

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे आपल्याला सुचित करण्यात येते की सभागृहात शांतता बाळगावी अन्यथा आपल्या विरूध्द कार्यवाही करण्यात येईल. (सर्व सेना सदस्यांचे सभागृहात पुन्हा प्रवेश) (यावेळी स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे जोरजोरात बोलतात काही ऐकू येत नाही)

**मा.महापौर :** पुन्हा एकदा विनंती करण्यात येते की स.सदस्यांनी आपल्या जागेवर शांततेने बसुन घ्यावे सभागृहात गोंधळ करू नये, नसता आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल (पुन्हा स. सदस्यांचे गोंधळ करणे, आंदळआपट करणे चालुच असते.)

**मा.महापौर :** सिक्युरिटी गार्डना विनंती करण्यात येते की स.सदस्यांना बाहे नेण्यात यावे.यावेळी स.सदस्य खालीच बसतात सिक्युरिटी त्यांना धरून बाहे नेतात परंतु ते जागे वरून हळत नाही. स.सदस्यांनी सभागृहातील शांतता भंग केल्या बाबतत्यांचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करण्यात येते.

**श्री.बंडू प्रधान :** (जोरात) तुमचे सुरक्षा गार्ड काय करतात आपण आदेश दिल्यातरही काहीही परिणाम दिसुन येत नाही आणि आमच्या सारख्या स.सदस्यांना उचलून न्या म्हणता असे आपण पक्षपातीपणा करू नये मा.महापौर आपण लोकशाहीत सभागृहाचा अपमान करीत आहात (यावेळी काही स.सदस्य श्री.घडामोडेचे तिन महिन्यासाठी सभासदस्व रद्द करण्याचे आवाज काढतात)

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.घडामोडे यांना सुचविण्यात येते की त्यांनी स्वखुशीने सभागृहा बाहेर जावे अन्यथा त्यांचे एक महिन्यासाठी सभासदत्व रद्द करण्यात येईल.

**मा.उप-महापौर :** स.सदस्य श्री.घडामोडे यांनी सभागृहाचा अपमान केलेला आहे त्यांचे एक महिन्याचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.

**श्री.केशव सोनवणे :** मा.महापौर आपण सभागृहा मध्ये सिडको-हडकोच्या बाबतीत सापत्न वागणून देत आहात या सभागृहात जो गोंधळ चाललेला आहे.

(या वेळी स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे जागीच बसुन असल्याने त्यांचा फोटो काढण्याचे पत्रकरांचे प्रयत्न)

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** (मा.महापौरांनी सभागृहात फोटो काढण्याचे आदेश देवू नयेत अशी विनंती करतात.

**मा.महापौर :** सभागृहात विना परवानगी फोटो काढण्यात येवू नये फोटोची रिल माझ्याकडे देण्यात यावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.केशव सोनवणे यांना सुचविण्यात येते की आपण या विषयावर सभात्याग केलेला आहे कृपया आता बोलु नये (यावेळी स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांना सिक्युरीटी गार्ड तर्फे बाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न सभागृहात काही स.सदस्यांचा जोराने बोलण्याचा आवाज ऐकू येते अंदाजे वेळ १२.२५)

**मा.महापौर :** मा.आयुक्तांना माझी विनंती आहे की, सभागृहाचा अपमान केल्या बद्दल स.सदस्यावर कार्यवाही करून पोलीस केस करावी.

**मा.उप-आयुक्त :** हा प्रस्ताव जो ठेवलेला आहे तो सेक्शन ९९ प्रमाणे ठेवण्यात आलेला असुन सेक्शन ९९ नुसार दरवर्षी कर आकारतो त्या दराची मान्यता या ठिकाणी घेत

असतो आम्ही सदरील प्रस्ताव स्थायी समिती पुढे विचाराधीन ठेवलेला होता की ३०% सामान्य कर घ्यावा परंतु स्थायी समितीने ३०% सामान्ये कर लागु करण्याचे मान्य केलेले नाही फक्त २२% मान्य केलेले आहे आणि २२% हाज आपला ........... आहे आणि त्याचप्रमाणे स्थायी समितीच्या शिफारशीने या सभेमध्ये प्रस्ताव आलेला आहे तर २२% जो सामान्य कर मागील वर्षाचा आहे त्यालाच मान्यता देण्या बाबत हरकत नाही असे आमचे म्हणणे आहे. ( यावेळी पुन्हा सभागृहा बाहेरून दरवाच्याच्या काचा फुटण्याचा आवाज ऐकू येतो सभागृहात एकत्रीत आवाज सुरू असतो संबंधितावर कार्यवाही करावी)

**मा.महापौर :** स.सदस्यांना पोलीसांच्या ताब्यात देण्यात यावे. (सभागृहात संबंधितावर कार्यवाही करावी असा अवाज) संबंधित नगर सेवकांचे तिन महिन्यासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते ( पुन्हा काही स.सदस्य उठून एकच आवाज काढतात संबंधित नगरसेवकांचे कायमचे सभासदत्व रद्द कराले)

**श्री.मुधकर शिंदे :** मा.महापौर स.सभासदाने सभागृहाची जी बेईज्जती केली त्याबाबत त्यांचे कायमचे सभासदत्व रद्द करण्यात यावे. (यावेळी काही स.सदस्य सभागृहात पोल पोल असे आरडतात)

**श्री.बंडू प्रधान :** सदरील सभा ००.१५ मिनिटासाठी तहकुब करण्यात यावी.

**मा.महापौर :** सभागृहातील सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता मी विनंती करतो की स.सदस्य श्री.घडामोडे यांनी ज्या चुका केलेल्या आहेत त्या बाबत बऱ्याचशा स.सभासदाचे म्हणने होते की त्यांचे कायमचे सदस्यत्व रद्द करावे परंतु ज्या वार्डातील नागरिकांनी संबंधित नगर सेवकांना निवडूण दिले आहे त्यांचा अपमान होऊ नये म्हणून सभागृहाच्या संमतीने तीन महिन्यासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते असा निर्णय देण्यात येतो.

**श्री.मुजिब आलमखान :** येथील सेक्युरीटी गार्ड नेहमी निष्काळजीपण करतात त्याबाबत त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. आताच याच वेळी सभागृहा मध्ये

**मा.महापौर :** ज्या सिक्युरिटी गार्डनी सभागृहातील नासधुसीच्या  वेळी हळगजीपण दाखविला त्यांचेवर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**श्री.रशीद मामू :** मा.महापौर यांनी स.सदस्यांचे बाबतीत दिलेला निर्णय योग्य नसुन (मा.महापौरा बद्दल अपशब्द उच्चारतात)

**श्री.मधुकर शिंदे :** (यावेळी काही स.सदस्यांचे अशा वक्तव्या बाबत सभागृहात एकच आवाज करतात) स.सभासदांनी सभागृहात जी भाषा वापरली त्याबाबत त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे हा सभागृहाचा अपमान आहे.

**मा.महापौर :** स.सभासदांनी सभागृहात जी भाषा वापरली त्या बाबत त्यांचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सन ९२-९३ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातिल मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण नऊ  व कलम ९९ अन्वये मंजुर करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्थायी समितीने प्रस्तावात दर्शविलेल्या दराने मालमत्ता आकारणी न करता यापुर्वी असलेल्या

दराप्रमाणे मालमत्ता कर आकारणी करण्यास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली सदरचे दुर हे कर योग्य मुल्यावर आकारले जातील.

१) सामान्य कर २२ %
२) साफसफाई कर ३ %
३) सर्वसाधारण पाणी पट्टी ३ %
(मुंबई प्रांतिक महानगरपालिकाा अधिनियम १९४९ चे कलम १३० प्रमाणे तसेच ज्या घरांना महानगरपालिकेचे नळ कनेक्शन नाही)
४) वृक्ष कर ०.५० %
५) अग्निशमन कर ०.७५ %
तसेच राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराचे आकारणी करयोग्य मुल्यावर खालील प्रमाणष व दराने शासन निर्णयानुसार करण्यात येईल.

| अ.क्र. | करयोग्य मुल | राज्य शिक्षणकर | | रोजगार हमी |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेला | उपकर वापर |
| | निवासेत्तर | | | |
| १) | रूपये १ ते ७४ | - | - | - |
| २) | रूपये ७५ ते १५० | २% | ४% | १% |
| ३) | रूपये १५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४) | रूपये ३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५) | रूपये ३००० ते ६००० | ५% | १०% | २.५०% |
| ६) | रूपये ६००० ते त्या जास्त | ६% | १२% | ३% |

विशेष साफसफाई कर ९१-९२ साठी अमलात येणे साठीचे दर
१) मोंढा व शहगंज भाजी मंडई रूपये ४,५०,०००/-
२) रेल्वे यार्ड रूपये १,२०,०००/-
३) एस.टी.स्टॅन्ड रूपये ६०,०००/-
४) हॉटेल्स मोठे रूपये १०,०००/-अे
(५) अ) मध्यम हॉटेल / हॉस्पीटल / थियेटर रूपये १,८००/- बी
ब) लहान हॉटेल/टपरी/रसवंती रूपये ६००/- सी
क) कोणतीही टपरी रूपये ३६०/-डी
वरील प्रमाणे दर सन १९९१-९२साठी भस्तिलात होते तेच दर सन १९९२-९३साठी कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की साईट नं.१९४ इंदिरानगर येथे शाळा बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.६-८-९० विषय क्र.११९/१९ अन्वये रक्कम रूपये ५,००,०००/- यास सर्वानुमते मंजुरी मिळालेली होती सदरचे काम हाती घेण्यासाठी स्थायी समिती बैठक दि.१२-१२-९० विषय क्रमांक ३०८-१२ अन्वये श्री.एस.ए.नवाब यांच्या

(अंदाजपत्राकिय दराच्या ०.५३ टक्के कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी मिळाल्यानंतर सदरचे काम पाच खोल्या जिन्या सहति तसेच ऑफिस व स्वच्छता गृहासइ आज पुर्णत्वाकडे आहे.

परंतु स.नगरसेवक वार्ड क्र.३७ व विरोधी पक्षनेता यांनी सदरच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या खोल्यांच्या संख्यामध्ये वाढ करण्याची मागणी केलेली आहे मा.आयुक्तानी सदर प्रस्तावित कामास मा.शिक्षण अधिकारी यांच्या अभिप्राया नंतर कामास प्रशासकिय मंजुरी दि.३-१२-९१ रोजी दिलेली आहे.

मा.शिक्षण अधिकारी यांनी आपल्या अभिप्राया मध्ये सदरचा वार्ड हा जवळ जवळ तिस हजार (३०,०००/-) लोकसंख्येचा असुन तेथे सर्व गरिब नागरीक राहतात व तेथे खाजगी अथवा मनपाची एकही शाळा नाही म्हणून तेथे महानगरपालिकेची शाळा बांधणे अत्यंत आवश्यक आहे जेणे करून गरिब विद्यार्थ्यांना शहरात दुरवर शाळेमध्ये जाण्याची गरज राहणार नाही व सदर भाग शिक्षणापासुन वंजित राहणार नाही असे नमुद केलेले आहे.

सदरच्या वाढीव सहा खोल्यांच्या बांधकामासाठी सर्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९०-९१च्या दरपत्रका प्रमाणे रक्कम रूपये ५,९४,०००/- चे सुधारीत व वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सबब इंदिरानगर बायजीपुरा येथील एकूण अकरा खोल्यांच्या शाळेने बांधकामासाठी ऐकूण सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये १०,९४,५००/- यास मंजुरीसाव व पैकी वाढीव अंदाजपत्रकिय रक्कम रूपये ५,९४,०००/- या रक्कमेस मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च सन १९९१-९२ हया आर्थिक वर्षातील विकास इमारती या लेखा शिषका मधुन करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईट नं.१९४ इंदिरानगर येथे शाळा बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती सभेतील विषय क्रमांक ११९/१९ दिनांक ६-८-९० अन्वये रूपये ५,००,०००/- मंजुरी मिळालेली असुन पुन्हा शाळेच्या खोल्यामध्ये वाढ करण्याच्या दुष्टीने या वार्डातील लोकसंख्या लक्षात घेत स.नगरसेवकांच्या मागणी नुसार आणि शिक्षणधिकारी यांचे अभिप्रायानुसार वाढीव सहा खोल्यांच्या बांधकामासाठी सुधारीत अंदजापत्रक रूपये १०,९४,५००/- यास मंजुरीस्तव पैकी वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ५,९४,५००/- सन १९९१-९२ या आर्थिक वर्षातील विकास ईमारती या लेखा शिषकामधुन खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८ :** सहाय्यक आयुक्त - १ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की सर्वासाधारण सभेचा ठराव क्र.७९१९ दि.१९-२-९० अन्वये श्री.बी.डी.सानप यांचा उप आयुक्त पदा वरील प्रतिनियुक्तीच्या काळावधीस दिनांक १२-१२-८९ पासुन दोन वर्षा करिता मंजुरी दिली होती त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.११-१२-९१ रोजी संपला आहे तथावी प्रशासनातर्फे

विभागीय आयुक्त यांना विनंती केली आहे की श्री.बी.डी.सानप यांना उप आयुक्ता पदावर दि.३१-३-९२ पर्यंत महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीने ठेवावे.

करिता श्री.बी.डी.सानप यांचा उप आयुक्त पदा वरील प्रतिनियुक्तीचा कलावधक्ष दि.३१-३-९२ पर्यंत वाढविण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.मोरेश्वर सावे :** सदरील प्रस्तावा नुसार ३ (तीन) महिन्या ऐवजी १५ महिन्याची मंजुरी देण्यास हरकत नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दोन वर्षाची मुदत वाढदेण्यात यावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.मोरेश्वर सावे यांनी सुचित केल्यानुसार सदरील प्रस्तावा नुसार एका वर्षाची मदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७९/९ दि.१९/२/९० अन्वये श्री.बी.डी.सानप यांचा उप-आयुक्त पदा वरील प्रतिनियुक्तीच्या कालावधीस दि.१२-१२-८९ पासुन दि.११-१२-९१ पर्यंत्न म्हणजे दोन वर्षी करिता करण्यात आला सदरील कालावधी आता संपल्याने प्रशासना तर्फे विभागीय आयुक्त यांना विनंती केल्या नुसार उप आयुक्त पदा वरील प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.३१-३-९२ पर्यंत वाढविणे ऐवजी संपलेल्या कालावधी पासुन पुढील एक वर्षा पर्यन्तच्या कालावधी करिता श्री.बी.डी.सानप, उप आयुक्त या पदा वरील प्रतिनियुक्तीच्या कालावधीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९ :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१०/३ दि.११-७-९१ अन्वये अग्निशमन विभाग करिता नविन पदास मंजुरी दिली आहे परंतु ठरावात नुमद केलेले आहे की सदरील पदे सेवा भरती नियम मंजुर झाल्यानंतर भरण्यात यावे परंतु उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी निर्णय दिला आहे की अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे कामाचे तास दि.३०-१२-९१ पर्यंत ८ तास करण्यात यावे त्याकरिता नविन निर्माण केलेली पदे भरणे आवश्यक आहे परंतु ठरावात सेवा भरती नियम मंजुर झाल्यानंतर पदे भरावित त्यामुळे नविन निर्माण केलेली पदे भरता येत नाही.

करिता उच्च न्यायालयाच्या आदेशाची अमलबजावणी करण्या करिता ठराव क्र.१०/३ दि.११-७-९१ मध्ये सेवा भरती नियम अंतिम झाल्यानंतर नविन निर्माण केलेली पदे भरण्यात यावी ही अट रद्द करून सेवा भरती नियमाचे तयार केलेल्या प्रारूपच्या अधिन राहुन नविन निर्माण केलेली पदे भरण्या बाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.मोरेश्वर सावे :** सदरील प्रस्तावास पुर्वीच मान्यता घ्यावयास पाहिजे होती न्यायालयाचा आदेश घेणे आवश्यक होते आता विना विलंब प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**मा.महापौर :** प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१०/३ दि.११-७-९१ अन्वये अग्निशमन विभाग करिता नविन पदास मान्यता मिळाली आहे उच्च न्यायालयाच्या आदेशाची अमलबजावणी करण्या करिता ठराव क्र.१०/३ दि.११-७-९१ अन्वये सेवा भरती नियम अंतिम झाल्यानंतर नविन निर्माण केलेली पदे भरण्यात यावी ही अट रद्द करून सेवा भरती नियमाचे तयार केलेल्या प्रारूपाच्या अधिन राहुन नविन निर्माण केलेली पदे भरल्या बाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १० :** औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार औरंगपुरा येथील नाथ मार्केट व त्या लगतचा भाग आरक्षण क्र.२७९ दुकान केंद्रसाठी आरक्षित आहे. यासाठी विकास योजना अहवाला प्रमाणे सुमारे १.७५ हेक्टर जनिन आरक्षित केलेली आहे या आरक्षणापैकी विद्यमान नाल्यावर काही भागात सुपर मार्केट (नाथ मार्केट) चे महानगरपालिकेने बांधकाम केले आहे.

मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे कडील पत्र क्र.९१/आर.बी.डेस्क-२/जमिन-२/२६१८/दि.२-१-९२ च्या पत्रान्वये विनंती केली आहे की, औरंगपुरा नाल्यावरील औरंगपुरा ते विधी महाविद्यालय या ८० फुट रूंद रस्त्या लगत आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्र च्या आरक्षणापैकी सुमारे ४०० चौ.मी. नाल्याची सरकारी जमिन औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ यांना पत्रकार भवनासाठी देण्याचा प्रस्ताव असल्याने सदर ४०० चौ.मी. जागा आरक्षणातुन वगळण्याची विनंती केली आहे तरी पत्रकार भवनासाठी सरकारी नाल्याची जमिन प्रदान करण्यासाठी पत्रकार भवनाच्या बांधकामाच्या वेळी सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या वास्तुपैकी ५०% दुकाने महानगरपालिकास द्यावी लागतील तसेच नाल्याचा प्रवाह सुरळीत राहील यासाठी बांधकाम करतांना आवश्यक ती उपाय योजना करावी लागेल या अटीवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्र पैकी ४००.०० चौ.मी. जागा वगळून निवास भागात सामील करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री.मोरेश्वर सावे :** सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

**मा.महापौर :** या प्रस्तावात शासन जमिन देत असुन केवळ आरक्षण बदलावयाचे आहे त्यामुळे मंजुरी देण्यास हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार औरंगपुरा येथील नाथ मार्केट व त्या लागतचा भाग आरक्षण क्र.२७९ दुकान केंद्रासाठी आरक्षित आहे यासाठी विकास योजना अहवाला प्रमाणे सुमारे १.७५ हेक्टर जमिन आरक्षित केलेली आहे या आरक्षणापैकी विद्यमान नाल्यावर काही भागत सुपर मार्केटचे महापालिकेने बांधकाम केलेले आहे औरंगपुरा ते विधी महाविद्यालय या ८० फुट रस्त्या लागत आरक्षण क्र.२७९ या आरक्षणापैकी सुमारे ४०० चौ.मी. नाल्याची सरकारी जमिन पत्रकार भवनासाठी व संबंधित भवनाच्या बांधकामाच्या वेळी जागेवर उभारण्यात येणाऱ्या वास्तुपैकी ५०% दुकाने मनपास द्यावी लागतील तसेच नालयाचा

प्रवाह सुरळीत राहील यासाठी बांधकाम करतांना आवश्यक उपाय योजना करावी या अटीवर महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्र पैकी ४००.०० चौ.मि. जागा वगळून निवास भागात शामील करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११** : प्रस्ताव सादर करण्यात येतो की विधी विभागात न्यायालयीन प्रकरणात उत्तर तयार करणे प्रतिज्ञा पत्र तयार करणष इत्यादी कामे करण्या करिता लघु टंकलेखकाची आवश्यकता आहे व काम त्वरीत होण्या करिता लघु टंकलेककांची तिकडीची गरज आहे.

करिता विधी विभाग करिता लघु टंकलेखक हे एक पद वेतन श्रेणी रूपये १४००-४०-१८०० दक्षता रोध ५०-२३०० वर सेवा भरती नियमाच्या प्रारूपातील शैक्षणिक अर्हतेनुसार निर्माण करव्या करिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संबंधित प्रस्तावातुसार बाहेरील पदे भरण्या ऐवजी आपला महापालीकेतील जेष्ठता यादीनुसार पद भरण्यास हरकत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सदरील पद निर्माण करावयाचे झाल्यास पद नॉमिनेशनने भरणष आवश्यक आहे नियमाप्रमाणे प्रमोशनने भरणे योग्य नाही.

**मा.महापौर :** स.सदस्य आपण आपले मत मांडावे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.मोरेश्वर सावे :** आस्थापनेवर महापालीकेचा भरपूर पैसा खर्च होत असतो त्या दुष्टीने बाहेरून उमेदवार बोलाविण्या पेक्षा प्रमोशन देवून सदरील पद भरण्यात यावे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सदरील पद नॉमिनेशनने भरावे असे माझे मत आहे प्रमोशनने भरू नये यास माझा विरोध राहील.

**मा.महापौर :** ठिक आहे आपला विरोध राहु द्या.

**श्री.नरेंद्र पाटील :** ज्या केडरचे कर्मचारी असतील त्यांच्या जेष्ठतेनुसार पद भरण्यात यावे.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे विधी विभागात न्यायालयीन प्रकरणात उत्तरे तयार करणे, प्रतिज्ञा पत्र तयार करणे इ कामे करण्या करिता लघु टंकलेखकाची आवश्यकता आहे या पदाची वेतन श्रेणी रूपये १४.००-४० १८०० दक्षता रोध ५०-२३०० दर सेवा भरती नियमाच्या प्रारूपातील शैक्षणिक अर्हतेनुसार निमार्ण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण ९३ वाहन चालकांची पदे मंजुर असुन भरण्याते आलेली आहे शासनाच्या नियम नुसार मंजुर पदापैकी ८०% कर्मचारी सेवेत कायम करणष आवश्यक आहे. त्यानुसार ९३च्या ८०% प्रमाणे ७४ वाहन चालक सेवेत कायम करावे लागतील.

करिता शासनाच्या नियमानुसार ८०% प्रमाणे ९३ वाहन चालकापैकी ७४ वाहन चालक सेवेत कायम करण्या करिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर

(स.सदस्य, श्री.रशीद मामु यांचा सभागृहात प्रवेश)

**संवाद :**

**मा.उप-महापौर :** सर्व कर्मचाऱ्यांच्या यादीसह पुढील बैठकित प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्तावातील कर्मचारी कोणकोणते याची माहिती सभागृहात द्यावी.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** सदर प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :** या प्रस्तावात ८०% कर्मचारी सेवेत कायम करणे आवश्यक आहे आणि हे जातील त्यावेळी माहिती सभागृहात देण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण ९३ वाहन चालकांची पदे मंजुर असुन भरण्यात आलेली आहेत. शासनाच्या नियमानुसार मंजुर पदापैकी ८०% कर्मचारी सेवेत कायम करण्या करिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्रमांक १३ :** दिनांक २८-१०-९१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.३८/१० अन्वये स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव.

औरंगाबाद शहराच्या वाढत्या विकास बरोबर हॉटेल्सची संख्याही वाढत आहे तेव्हा महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉटेल्सचे वर्गीकरण महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉटेल्सचे वर्गीकरण (ग्रेडेशन) करण्यात यावे.

सुचक : सौ.लता दलाल
अनुमोदक : श्री.केशव सोनवणे
दिनांक : १२-८-९१

**संवाद :**

**मा.महापौर :** आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आपण ग्रेडेशन १९९० मध्ये शासनाच्या अन्न भेसळ कायद्या नुसार जी फिस वसुल करतो त्यानुसार ए,बी,सी,डी, ग्रेडेशन केलेले आहे हे ग्रेडेशन टॅक्सनुसार केलेले आहे पण आता जे ग्रेडेशन करावयाचे आहे ते दुष्टीने करावयाचे आहे ज्यामध्ये हॉटेलमध्ये ८० मार्कच्या वर जे राहिल ते ए ग्रेडमध्ये राहील आणि ७५ च्या वरील राहील ते बी ग्रेडमध्ये येईल अशा प्रकारचे त्यांचे वर्गीकरण आहे तर या ची पधत मुंबई, पुणे, आणि कोल्हापु महानगरपालिकेने तयार केलेली आहे त्या महानगरपालिकेची माहीती मागवून घेवून विधीक्रम मंजुर

करावा लागेल त्यानंतर त्यासाठी एका समितीने गठन करून सभापतीची नेमणूक करावी लागेल.

**श्री.रशीद मामू :** आरोग्य कमिटी आहे.

**मा.महापौर :** संबंधित प्रस्ताव आरोग्य कमेटेकडे पाठवावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सभागृहाचा अपमान होत आहे स.सदस्य श्री.रशीद मामू यांचे सभासदत्व एका दिवसासाठी रद्द करण्याचा निर्णय मा.महापौरांनी दिलेली आहे आणि स.सदस्य सभागृहात येवून बसलेले आहेत तेव्हा सभागृहाच्या बाहेर स.सभासदांना काढण्यात यावे अशी विनंती.

**श्री.मुजीब खान, श्री.मुधकर शिंदे :** हा सभागृहाचा अपमान आहे.

**मा.महापौर :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार असे कळविण्यात येते की सभागृहात स.सदस्य श्री.रशीद मामु यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय झालेला आहे तेव्हा कृपया त्यांनी बाहेर जावे.

**श्री.रशीद मामू :** ठिक आहे (यावेळी मा.महापौर बद्दल अनुदगार काढले)

**श्री.केशव सोनवणे :** स.सदस्याचे वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात यावे.

**मा.महापौर :** सदरील वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात यावे आणि स.सदस्यांना सकत ताकीद देण्यात येते की शहराच्या प्रथम नागरिकांशी कसे बोलावे याचे मान ठेवावे अन्यथा पुढील वेळेस एक महिन्यासाठी सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव आरोग्य वैद्याकिय समिती मार्फत पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४ :** दिनांक २८-१०-९१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.४६/१८ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव.

औरंगाबाद महापालीकेच्या हद्दीत वाढ करून वाळूज येथील सर्व औद्योगीक कारखाने कंपन्या समाविष्ठ करणष बाबत कारण वाळूज परिसरात मोठमोठाल्या कंपन्या कारखाने नव्याने उघडत असुन शहरात कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात आयात होतो. सदर क्षेत्र सध्या महापालीकेच्या हद्दीत नसल्यामुळे या मालावर जकात कर आकारला जात नाही हा विभाग औरंगाबाद महापालिकेच्या हद्दीत समावेष्ठ झाल्यास महापालिकेच्या जकात उत्पन्नात फार मोठ्या प्रमाणात वाढ होईल तरी महापालीकेची हद्द वाळून पर्यंत्त वाढविण्यात यावी.

सुचक : श्री.चंद्रकांत खैरे
श्री.अविनाश कुमावत
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर
श्री.अजिज जहागिरदार
दिनांक : १६-१९९१

**संवाद :**

**श्री.चंद्रकांत खैरे :** नगर विकास विभाग मंत्रालय, मुबंई यांचे कडून या संदर्भात एक पत्र आलेले होते त्यानुसार सदरील प्रस्ताव मांडण्यात आलेला असुन मंजुर करण्यास हरकत नाही.

**श्री.शांताराम काळे :** नविन औद्योगीक क्षेत्र विकसीत होत असतांना शासनाच्या नियमाप्रमाणे किमान ५ वर्ष तरी लागतात ते ताब्यात घेऱ्यासाठी सध्या चिकलठाणा औद्योगिक वसाहत जी आहे त्याचे कडून किती उत्पन्न मिळते याच विचार होणे आवश्यक आहे सध्या वाळूज भाग नविन विकसीत होत असतांना आपण असा निर्णय लादु नये अन्यथा औद्योगीक क्षेत्रातील कारखान्याचे उत्पन्न काही होणार नाही आणि ताब्यात घ्यावयाचे असे होता कामा नये.

**मा.महापौर** : सदरील प्रस्ताव स.सदस्य श्री.काळे यांनी सुचविल्यानुसार त्यांचे सुचनेसह शासनाकडे प्रस्ताव पाढविण्यात यावा.

**श्री.मोरेश्वर सावे :** संबंधित प्रस्तावा बाबत कोणत्याही प्रकारची चर्चा किंवा अभ्यास न करता प्रस्ताव मंजुर करणे बेजबाबदार पणाचे आहे यास माझा विरोध आहे.

**श्री.सुदाम वाघमारे:** माझा सुध्दा यास विरोध आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत वाढ करून वाळूज क्षेत्रात निरनिराळे कारखाने कंपन्या उघडत असुन ज्यामुळे कच्चा माल आयात केला जातो यावर जकात कर लादल्या जात नाही तेव्हा सदरील क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून जकात उत्पन्नात फार मोठ्या प्रमाणात वाढ होईल या दुष्टीने प्रयत्न होणेसाठी प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५ :** दिनांक २८-१०-९१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.५२/२४ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव.

चिश्तीया कॉलनी झोपडपट्टी वासियांना शासनाची कोणतिीही सुविधा उपलब्ध नसल्याने चिश्तीया कॉलनी भागातील अल्पसंख्याकी नागरीकांचे बुरेहाल होत आहेत त्यांचे राहण्याचे मकान व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता मागासवर्गीय भटकया जाती/जमातीचे लोकांना शासनाची सुविधा जास्त देण्याकरिता सदरील भागास स्लम जाहिर करण्यात यावा.

पश्चिमेस : रोड पुर्व : रस्ता उत्तरेस : एन-६ (कॉलनी) दक्षिणेस : रस्ता

सुचक : श्री.मोहसीन अहमद

अनुमोदक : श्री.अलफखाँ हुसैनखाँ

दिनांक : १५-१०-९१

**संवाद :**

**मा.महापौर :** सदरील प्रस्तावाचे सुचक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात यावा.

**ठराव :** सदरील प्रस्ताव वगळण्यात यावा.

**विषय क्रमांक १६ :** (१) वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी औरंगाबाद विकास योजने अंतर्गत आरक्षण क्र.४५ (प्राथमिक शाळासाठी राखीव आहे) कैसर कॉलनी हा भाग गेली २० वर्षापासुन वसाहत झालेला आहे व मनपा या भागास सर्वसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत तरी कैसर कॉलनी भागातील नागरीकांना बांधकाम परवाना व इमारत दुरूस्ती परवानगी विशेष बाब म्हणून देण्यात यावी.

(२) नागसेन कॉलनी प्राथमिक शाळा (मनपा) गेली सहा महिन्यापासुन शिक्षक अभावी शाळा बंद आहे शिक्षकाची व्यवस्था करून शाळा चालु करण्यात यावी.

(३) वार्ड क्र.३५ जियाओद्दीन ले-आऊट मनपा ओपन स्पेस कॉलनीच्या रहिवासासाठी विकास करून उपलब्ध करून द्यावे.

(४) रोषनगेट भागातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे नागरिकांना एक वेळ सुध्दा पिण्याचे पाणी बरोबर मिळत नाही सारखी मोटर व पंपची कम्पलेन असल्यामुळे रोशनगेट व इतर माहेल्यातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे सध्याची परिस्थिती लक्षात घेवून रोशनगेट भागात कोणत्याही उंच ठिकाणी पिण्याचे पाण्याची मोठी टाकी बांधावी मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहसिन अहमद
अनुमोदक : श्री.रशीद खान (मामु)
दिनांक : १६-११-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** सदरील प्रस्तावाचे सुचक नाहीत प्रस्ताव वगळण्यात यावा.
ठराव : सदरील प्रस्ताव वगळण्यात यावा.

**विषय क्रमांक १७ :** औरंगाबाद विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.१५२ ही संपुर्ण जागा आरक्षित दाखविण्यात आली आहे. तरी वरील जागेचा संबंधितांना मोबदला देवून ती जागा मनपाच्या ताब्यात घ्यावी.
सुचक : श्री.ॲड.इकबालसिंग गिल
अनुमोदक : श्री.धनंजय गंगाखेडकर
दिनांक : १६-११-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** सदरील प्रस्तावाचे अनुमोदक नाही
**ठराव :** सदरील प्रस्ताव वगळण्यात यावा.

**विषय क्रमांक १८ :** औरंगाबाद शहरातील जालना रोडवरील जळगांव टी पॉईंट येथील चौकास माजी मुख्यमंत्री आणि हरीत क्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांचे नांवाने कै.वसंतराव नाईक चौक असे नांव देण्यात यावे.
सुचक : श्री.एकबालसिंग गिल

अनुमोदक : श्री.सुदाम वाघमारे
दिनांक : १६-११-९१

**संवाद :**

**श्री.नरेंद्र पाटील :** सदरील प्रस्ताव प्रशासनातर्फे मागील वर्षी अग्रेसन चौक असे नामकरण करण्यात यावे, अशा प्रकारचा प्रस्ताव आलेला होता आणि संबंधित रोड मनपाच्या ताब्यात नसल्याने तो होऊ शकला नाही व प्रस्ताव स्थगित होता पुन्हा वेगळ्याप्रस्ताव का आला ? जर करावयाचेच झाल्यास जुन्या प्रस्तावाचा विचार करावा लागेल.

**मा.महापौर :** या रोच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याकडून व जिल्हाधिकारी यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळालेले आहे त्यामुळे सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद जालना रोडवरील जळगांव टी पॉईट येथील चौकास माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांचे नांवाने कै. वसंतराव नाईक चौक असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १९ :** औरंगाबाद शहरामधील मो.बंजारा कॉलनी भागातील चौकामध्ये कै.वसंतराव नाईक माजी मुख्यमंत्री यांचा पुर्णाकृती तुतळा बसविण्यात यावा. या भागातील चौकात पुतळ्यासाठी प्रशस्त जागा उपलब्ध असुन या जागी श्री.वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत मो.बंजारा कॉलनी भागातील रहिवाशांनी मागणी केली आहे तरी या भागात कै. वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.नारायण फत्तेलष्कर
अनुमोदक : श्री.अलफखान हुसैनखान
दिनांक : १६-११-९१

**संवाद :**

**मा.महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावाता दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरामधील मो.बंजारा कॉलनी भागातील चौकामध्ये या भागतील रहिवाशांनी मागणी केल्यानुसार कै.वसंतराव नाईक माजी मुख्यमंत्री यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २० :** भडकलगेट ते सिटीक्लब १०० फुट डी.पी.रोड मधील टाऊन हॉल जवळील बेट (आयलैंड) चा नांव मलीक अंबर चौक ठेवणे.
सुचक : श्री.अजिजुल्ला बेग
अनुमोदक : श्री.अलीम बेग

**संवाद :**
**मा.महापौर :** सदरील प्रस्तावाचे अनुमोदक नाही
**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्रमांक २१ :** औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व स.नगरसेवकांना महाराष्ट्रामधील सर्व शासकीय विश्रामगृहे येथे सवलतिचे दराने राहण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी व्यवस्था मा.खासदार व मा.आमदारासाठी प्रत्येक शासकीय विश्रामगृहात असते तशीच सवलत महापालिकेच्या नगरसेवकांना देखील मिळणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामधील शासकीय विश्रामगृहे महापालीका नगरसेवकांना सवलतीच्या दराने उपलब्ध करून देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.
सुचक : श्री.पी.बी.पैठणकर (माळीबाबा)
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर
दिनांक : ३-१२-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांना महाराष्ट्रातील सर्व शासकीय विश्रामगृहे येथष सवलतिच्या दराने राहण्याची व्यवस्था मा.खासदार व आमदार यांचे प्रमाणे असणे बाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २२ :** मो.कैलासनगर ही वसाहत विकास आराखडया मध्ये स्मशान भुमीसाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. या वसाहतीमध्ये २० वर्षापासून आज पर्यंत या ठिकाणी १५ ते २० हजार लोखसंख्या झाली आहे या वसाहतीत आरक्षण असल्यामुळे येथील रहिवाशांना कुठल्याही नागरी सुविधा महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येत नाही या भागात १००% वस्ती झालेमुळे आरक्षणाचा उद्देश पुर्ण होऊ शकत नाही त्यामुळे या वसाहतीवरील महापालिकेचे आरक्षण त्वरीत रद्द करण्यात यावे जेणे करून या वसाहतीत राहणाऱ्या रहिवाशांना सर्व नागरी सुविधांचा लाभ मिळू शकेल. तरी कैलासनगर येथील श्मशानभूमीचे आरक्षण रद्द करणे बाबत ठराव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.पी.बी.पैठणकर (माळीबाबा)
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर
दिनांक : ३-१२-९१
**संवाद :**
**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव आरक्षण संदर्भात असल्याने आरक्षणाचे जेवळे प्रस्ताव आहेत ते सर्व एकत्रीत करून ठेवण्यात यावे. त्यावर विशेष सभेत चर्चा करण्यात येईल.
**श्री.अजिजुल्ला बेग :** रद्द करण्याचा प्रस्ताव आहे.
**मा.उप-महापौर :** सहा.संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**श्री.इ.ईस्माईल :** संबंधित प्रस्तावानुसार येथील डी.पी.रोड व स्मशान सोडून मंजुरी द्यावी.
**मा.महापौर :** ठिक आहे डी.पी.रोड व स्मशान भूमीचा भाग सोडून मंजुरी देण्यात येते.
**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणष मो.कैलास नगर ही वसाहत विकास आराखडयात स्मशान मारूतीसाठी आरक्षित करण्यात आलेली असुन या वसाहतीत २० वर्षापासुन १५ ते २० हजारांची लोकसंख्या झालेली आहे. तेंव्हा या भागात १०० टक्के वसाहत झाल्याने आरक्षणाचा उद्देश सफल होत नसल्याने आरक्षण रद्द करून तेथील नागरीकांना सर्व सुविधा मिळण्यासाठी प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २३ :** औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत लाखो रूपये खर्च करून सिध्दार्थ उद्यान येथे पोहण्याचा तलाव बांधला आहे. तरंतु अद्याप या तलावाचे बांधकाम पुर्ण झालेले नसुन बरेज काम होणे बाकी आहे. आतायापर्यंत लाखो रूपयांची गुंतवणूक महापालिकेने या तलावाचे बांधकामासाठी केलेली आहे. तलाव चालु न झाले मुळे महापालिकेचे दरवर्षी हजारो रूपयांचे आर्थीक नुकसान होत आहे.

सदरील तलाव सध्या आहे त्याच स्थितीत वार्षीक भाडे तत्वावर चालवण्यास कुणीही घेण्यास तयार असेल तर निविदा मागवून स्विमिंग पुल त्यास वार्षिक भाडे तत्वावर चालविण्यास देवून जनतेस पोहण्याची सुविधा त्वरीत उपलब्ध करून द्यावी. अन्यथा महानगरपालिकेने सदरील तलाव त्वरीत सुरू करून जनतेस उपलब्ध करून द्यावा.

सुचक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक : डॉ.शांताराम काळे
दिनांक : ४-१२-९१

**संवाद :**
**श्री.मधुकरशिंदे :** या प्रस्तावाचे सुचक नाहीत.
**मा.महापौर :** प्रस्ताव वगळण्यात यावा.
**ठराव :** सदरील प्रस्ताव वगळण्यात येतो.

**विषय : क्रमांक २४ :** गुलमंडी या शहराच्या मध्याभागी नागरिकांना रहदारीस अत्यंत अडचण निमार्ण होत आहे त्यामुळे या भागात वाहन पार्किंग करिता जागा राखुन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे या जागी एका नविन इमारतीचे कामाची परवानगी आपल्याकडे असुन जिचा सि.टी.एस.क्र. ५६९२/१ ५६९३/२ ५६०९२/३ हा आहे. यापैकी काही जागा संसंधिताकडून पार्किंगला घेण्यात यावी करिता प्रस्ताव मंजुरीस्तावसादर

सुचक : श्री.प्रकाश जावळे
अनुमोदक : श्री.एकबालसिंग गिल
दिनांक : ४-१२-९१

**संवाद :**

**मा.महापौर :** सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
**ठराव :** प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्रमांक २५ :** औरंगाबाद शहरात अठरा खेडी नव्याने समाविष्ठ झाल्यामुळे व शहराचा वाढता व्याप लक्षात घेता, महानगरपालिकेकडे कार्यरत असलेल्या स्वच्छता करणाऱ्या मंजुरीची संख्या अत्यंत अपुरी पडत असल्या कारणामुळे शहराची दैंनंदिन स्वच्छता वेळच्या वेळवर होऊ शकत नाही त्यामुळे शहरात रोगराई पसरण्याची शक्यता आहे. औरंगाबाद शहर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवण्याकरिता महानगर पालिकेत १०० पुरूष मजुर व १०० स्त्री मजुरांची नव्याने भरती करण्यात यावी या करिता २०० सफाई मजुरांची पदे निमार्ण करून त्वरीत भरती करण्यास मान्यता द्यावी.

सुचक : श्री.रतनकुमार पंडाकळे
अनुमोदक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल
श्री. गिरजाराम होळनोर
दिनांक : ५-१२-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** मंजुर
**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात अठरा खेडी नव्याने समाविष्ठ झाल्याने शहराचा वाढता व्याप लक्षात घेता महानगरपालिकेकडे स्वच्छता करणाऱ्या मजुरांची संख्या अपुरी पडेत. त्यामुळे दैनंदिन स्वच्छता वेळेवर होऊ शकत नाही व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. तेव्हा मनपामधील आस्थापनेत १०० पुरुष मजुर व १०० स्त्री मजुरांची नव्याने पदे निर्माण करून भरण्यास सर्व नमुते मंजुरी देण्यात येते .वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमाक २६ :** महानगरपालिकेमध्ये गेली चार पाच वर्षा पासुन पाच कर्मचारी तृतीय श्रेणीमध्ये रोजदारीवर काम करित आहे त्यामध्ये अपंग सुध्दा तेव्हा त्यासर्व लोकांना कायम स्वरूपी नौकरीमध्ये घेण्यात यावे.

सुचक : श्री.रशीद मामू
अनुमोदक : श्री.विठ्ठल पेरकर
दिनांक : १२-१२-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** सुचक नसलयाने प्रस्ताव वगळण्यात यावा.
**ठराव :** सदरील प्रस्ताव वगळण्यात येतो.

**विषय क्रमांक २७ :** शीट क्र.४५ मधील मो.शहागंज भाजी मंडी येथील महापालिका विभागीय कार्यालय वि.क्र.३ पासुन मो.शहाबाजार पोलीस स्टेशन रोड पर्यंनाचा सार्वजनिक रस्ता २० ते २५ फुट रूंद करणे बाबत.

शीट क्र.४५ व २० मधील मो.चेलीपुरा पोलिस स्थानकापासुन श्री.प्रल्हाद थोरात यांचे घरापर्यंनाचा सार्वजनिक रस्ता २० ते २५ फुट रूंद करणे बाबात.

शीट क्र.१९ मधील मो.भोईवाडा येथील श्री.बाबुलाल मिस्तरी यांचे घरापासुन ते श्री.देवकर यांचे घरापर्यंनाचा सार्वजनिक रस्ता २० फुट रूदां करणे.

शीट क्र.१९ मधील मो.एस.टी.कॉलनी येथील श्री.बी.पी.मिस्त्रा यांचे घरापासुन ४० फुट रूंद रस्ता तयार करून येथील नाल्यावर पुल बांधून साईट क्र.३४ मधील माध्यमिक शाळा व क्रिडा मैदाना लगतचे ४० फुट रूंद सार्वजनिक रस्त्यास जोडणे बाबात.

सुचक : श्री.नारायण फत्तेलष्कर
अनुमोदक : श्री.तुळशीराम भगुरे
श्री. पींटर वंजारे , सौ,लता दलाल
दिनांक : ४-१२-९१

**संवाद :**

**मा.उप महापौर :** सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**श्री,नारायण फत्तेलष्कर :** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा ठिक आहे प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शीट क्र.४५ मधील मो.शहागंज भाजी मंडई येथील मनपा कार्यालय विभाग क्र.३ पासुन मो. शहाबाजार पोलीस स्टेशन रोड पर्यंनाचा सार्वजनिक रस्ता २० ते २५ फुट रूंद करणे.

शीट क्र.४५ व २० मधील मो.चेलीपुरा पोलीस स्थानकापासुन श्री.प्रल्हाद थोरात यांचे घरापर्यनाचा सार्वजनिक रस्ता २० ते २५ फुय रूंद करणे.

शीट क्र.१९ मधील मो.भोईवाडा येथील श्री.बाबुलाल मिस्तरी यांचे घरापासून ते श्री,देवकर यांचे घरापर्यनाचा सार्वजनिक रस्ता २० फुट रूंद करणे.

तसेच शीट क्र.१९ मधील मो.एस.टी.कॉलनी येथील श्री.बी.पी.मित्रा यांचे घरापासुन ४० फुट रूंद रस्ता तयार करून तेथील नाल्यावर पुल बांधुन साईट क्र.३४ मधील माध्यमिक शाळा व क्रिडा मैदाना लागतच्या ४० फुट रूंद सार्वजनिक रस्तयास जोडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २८ :** सर्व्हे क्र.१०६११ मधील शीट क्र.१९ येथील साईट क्र.३४ मधील खुली जागा महापालिका विकास आराखडयात आरक्षित दर्शविल्याप्रमाणे माध्यमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी भुसंपादन करून या जागी शालेय इमारत बांधणे तसेच शालेस विद्यार्थ्यांना क्रिडा मैदान उपलब्ध करून देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नारायण फत्तेलष्कर
अनुमोदक : श्री.तुळशिराम भगुरे, श्री. पीटर वंजारे सौ. लता दलाल
दिनांक : ४-१२-९१

**संवाद :**

**मा.महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे १०६११ मधील शीट क्र.१९ मधील साईट क्र.३४ मधील खुली जागा मनपा विकास आराखडयात आरक्षित दर्शविल्याप्रमाणे माध्यमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी भुसंपादन करून या जागी शालेय ईमारत व क्रिडा मैदान उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २९:** नौबत दरवाजा ते रंगीन गेट या विकास रस्तयावर गेल्या २५ वर्षापासुन नगर परिषद कार्मचाऱ्यांची पहिली वसाहत अस्तित्वात आली आहे. आस्तित्वात असलेल्या वसाहतिची भौगोलीक स्थिती आणि या वसाहतीच्या उत्तर बाजुने असलेला राज्य मार्ग लक्षात घेता वसाहतीत राहणाऱ्या मालमत्ता धारकाणे घरातील सांडपाणी तसेच पावसाळ्यात रंगीन गेट भागापासुन वहात येणारे पाणी हे या वसाहतीच्या दक्षिण भागाकडून वाहून जाण्यास एकमेव मार्ग आहे. तसेच या वसाहतीत राहणाऱ्या सर्व मालमत्ता धारकांचे ड्रेनेज कनेक्शन हे मॉगोलिक स्थिती लक्षात घेता दक्षिण बाजुनेच काढण्यात आले असल्याने संभाव काळात ड्रेनेज चोक्रअप दुरूस्ती देखभाल आणि पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी या वसाहतीची दक्षिण वाजुस पुर्व पश्चिम असा ३० फुटाचा सार्वजनिक रस्ता आवश्यक आहे. या रस्तयाच्या आखणीमुळे सदर वसाहतीच्या लगत असलेल्या दक्षिण बाजुच्या भुखंडात भविष्यात घेणाऱ्या वसाहतीस सुध्दा या सार्वजनिक रस्त्याचा उपयोग होईल. ही बाब लक्षात घेता अस्तित्वात असलेल्या महापालिका कर्मचारी वसाहतीच्या रेखांकानाच्या सिमेवर दक्षिण बाजुस वरील प्रमाणे ३० फुट सार्वजनिक रस्ता तयार करण्यासाठी जणा संपादन करून सार्वजनिक रस्ता तयार करण्यात यावा.

सुचक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल, श्री. जयवंत ओक
अनुमोदक : श्री.विठ्ठल पेरकर, श्री. गिरजाराम हाळनोर
दिनांक : १२-१२-९१

**संवाद :**

**श्री.आलफखाँ :** या प्रस्तावात दोन चुका दिसुन येतात (१) नौबत दरवाजा जो आहे तो ज्या ठिकाणी तार कार्यलय आहे त्यास म्हणतात तर मनपा कर्मचाऱ्यांची कॉलनी आहे त्यास काळा दरवाजा म्हणतात (२) एखादी जागा लाव्यात घ्यावयाची असल्यास ती इनामी असल्यास वक्फ बोर्डाकडून अशा प्रकारणासाठी परवानगी काढणे आवश्यक असते. जर आपल्याला वाटता असल्यास शासनाचा या संदर्भात आदेश आहे. सदरील प्रस्ताव पेंडींग ठेवण्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्तावात दुरूस्ती करून मंजुर करावा.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** सदरील भाग माझ्या वार्डातील असल्याने या बाबातचा प्रश्न बऱ्याच दिवसांपासुन रेगाळत पडलेला आहे बऱ्याच वेळी मी स्वतः संबंधीत कॉलनिच्या लोकांना भेठून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे गेल्या कित्येक दिवसांपासुन तेथील ड्रेनेज आणि सांडपाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. यासाठी काही तरी करणे आवश्यक आहे मनपाचे मजुर कर्मचारी साफसफाई करण्यासाठी येतात परंतु त्यांनाही हकलून लावतात स.सदस्य श्री.अलफखान जे

म्हणतात इनामी जमीन आहे वक्फ बोर्डाची परवानगी वगैरे असु शकेल माझे दुभत नाही. परंतु त्या भागातील ड्रेनेज व सांडपाण्याची व्यवस्था होणेसाठी त्या एकझीस्टींगला लागुनच ४-५ फुट जागा एकवायर करून हा वाद मिटविणे योग्य राहील आणि त्या जमिनीची मालकी ज्याची असेल त्यांना योग्य तो मोबदला देण्याबाबत कार्यवाही करावी. परंतु या ठिकाणी सर्वत्र घाण असल्याने हा वाद मिटणे आवश्यक आहे.

**श्री.अलफखा :** मी.सुरूवातीस सुचित केल्याप्रमाणे प्रस्तावात चुकी झालेली आहे तो नौबत दरवाजा नसुन त्या ठिकाणची जागा इनामी आहे यासाठी वक्फ बोर्डाकडे यांचे पी.आर कार्ड आहेत ते पाहून कार्यवाही करता येईल.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** स.सदस्य श्री.आलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे इनामी जागा असल्यास वक्फ बोर्डाकडून कायदेशीर विचारणा कार्यालयाने करण्यात यावी परंतु या ठिकाणच्या सांडपाण्याचा प्रश्न आहे त्यासाठी जेवढी काही ४-५ फुट जमीन लागेल ती घेवून बाकी सोडण्यात यावी कारण यांच्या बाजुला मस्जीद आहे. तयामुळे नियमाप्रमाणे कागदपत्रे पाहून कार्यवाही करावी लागेल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** माझे असे म्हणणे आहे की येथील जागा ताब्यात किती घ्यावी या संबंधी इंट्रेस्ट असुन तेथील लोकांना होणारा त्रास वाचविण्यासाठी आपण काय करावयास पाहिजे असा योग्य तो निर्णय देण्याचा प्रयत्न करण्यासाठी विचार व्हावा.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** संबंधीत बाबत प्रस्ताव मंजुर करून नियमप्रमाणे कागदप मागवून जागा जेवढी लागेल तेवढी घेण्यात यावी. बाकीची सोडण्यात यावी.

**श्री.अजीजुल्ला बेग :** या प्रस्तावामध्ये काय सुचित केलेले आहे ३० फुट जागा भुसंपादन करून रोड तयार करण्यात यावा म्हणजे जेवढी जागा लागेल तेवढीच घेऱ्यात यावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री. अलफखान यांनी सुचविल्या प्रमाणे संबंधित बाबतीत जागा विकसीत करण्यासाठी जेवढी जागा लागेल तेवढीच जागा घेण्यात येईल आणि यासाठी लागणारी कागदपत्रे ना हरकत प्रमाणपत्र वक्फ बोर्डाकडून मागविण्यात येईल नंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल,

**ठराव :** प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे नौबत दरवाजा ते रंगीनगेट या विकास रस्त्यावर मनपा कर्मचाऱ्यांनी वसाहत असुन या वसाहतीतील भौगोलीक परिस्थिती लक्षात घेता ड्रेनेज व सांडपाण्याचा विलहेवाट लागण्यासाठी वसाहतीचे दक्षिण बाजुस पुर्व पश्चीम असा ३० फुटाचा सार्वजनिक रस्ता आवश्यक आहे यासाठी संबंधित ठिकाणी जागा विकसीत करण्यासाठी जेवढी जागा लागेल ती विकसीत करून बाकी सोडून देण्यात येईल. यासाठी वक्फ बोर्डाकडून योग्य ती कागदपत्रांची पडताळणी व ना हरकत प्रमाणपत्र मागवून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३० :** औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिका औरंगाबाद व जिल्हा कबडडी संघामर्फत यांचे संयुक्त विद्यमाने कबड्डी खेळाचे आयोजन करण्यात येवून त्यासाठी महापौर चषक विजयी संघास देण्यात यावे.

सुचक : डॉ.चेनकरण संचेती

अनुमोदक : श्री. केशव सोनवणे
दिनांक : १३-१२-९१

**संवाद :**

**श्री.सुदाम वाघमारे :** संबंधित प्रस्तावानुसार मनपातर्फे आंयोजन करून महापौर चषक देण्यात यावे असे असावे इतर संघाचा या ठिकाणी नांव घेण्याचा प्रश्न अद्‌भवत नाही.

**डॉ.चेनकरण संचेती :** या ठिकाणी असे आहे आपल्याकहे जिल्हा कबड्डी संघ आहे त्यानाही विश्वासात घेवुन केल्यास चांगले असते म्हणून हे कसे केलेले आहे.

**श्री.सुदाम वाघमारे :** या प्रस्तावातुन कबड्डी संघाचे नांव वगळ्यात येवुन या खेळास किती खर्च अपेक्षित आहे ते दर्शविण्यात यावे तो पर्यत्न सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येवू नये.

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्रत्येक मनपामध्ये क्रिडा विभाग जो असतो तो अशा प्रकारच्या खेळास उत्तेजन देण्यासाठी असती त्यामुळे सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. मुजीब आलमशा खॉन** : स. नगरसेवकांची स्वेच्छा निधी रपये १५ हजार खर्च करण्यासाठी ठेवलेला आहे. त्यातून खर्च करण्यात यावा.

**डॉ.चेनकरण संचेती :** अशा क्रिडा विभागासाठी शासनाकडून अनुदान मिळते करिता सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.मिर्झा अनवर बेग :** क्रिडा विभाग या कामी आस्तित्वात आहे तेव्हा क्रिडा विभागातून याचा खर्च करण्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्तावास कुणाचाच विरोध नसुन या खेळाचे आयोजनास किती खर्च येणार याचा खुलासा क्रिडा अधिकारी यांनी द्यावा.

**मा.महापौर :** क्रिडा अधिकाऱ्यांनी या बाबत खुलासा करावा.

**हुसैन स.अहमद (रफत) :** ज्याअर्थी कबड्डी खेळाचे आयोजन केलेले आहे त्याच प्रमाणे इतर खेळ आहेत व्हॉली बॉल, खो-खो, इ.चे साठी तशी तरतुद आहे.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.स.अहमद रफत यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो योग्य असुन माझे असे मत आहे की क्रिडा विभागामध्ये महापौर चषकासाठी कोणत्याही प्रकारे तरतुद नाही तेव्हा मी सुचना केलेली आहे की आगामी अंदाजपत्रकमध्ये रूपये ५०,०००/- १ लाख किंवा जे काही सर्वानुमते विचाराधीन होईल ती तरतुद महापौर चषकासाठी खेळवाईज योजना रद करण्यात यावी तो पर्यन्ता सदरील प्रस्ताव दुरूस्त करून ठेवण्यात यावा . सदरचा प्रस्ताव तोपर्यंता स्थगीत ठेवण्यात यावा.

**ठराव :** सदरील प्रस्ताव दुरूस्ती होवून येईल पर्यंत स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्रमांक ३१ :** फिरते शौचालय उपलब्ध होण्या संदर्भात हा ठराव सादर करण्यात येत आहे शहरात संभाजीनगरात विविध प्रकारचे संमेलने अधिवेशने आणि मेळावे होत असतात अशा ठिकाणी पुरेशी स्नानगृहे आणि शौचालय उपलब्ध नसतात काही वेळा अशा प्रकारची संमेलने किंवा मेळावे मोकळ्या मैदानात तंबु उभारून भरवले जातात अशा ठिकाणी स्वच्छतेची गॅरसोय होते आणि वातावरण दुषित होवून जनसामान्यांचे आरोग्य धोक्यात येत ही बाब लक्षात घेवून महानगरपालिकेने फिरत्या शौचालयाची स्वयंचलित वाहने खरेदी करून गैरसोय टाळवी उदा

अशा प्रकारची स्वयंचलित फिरती शौचालये पुणे, मुंबई महानगापालिकाकडे उपलब्ध आहे.ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जयवंत केशवराव ओक
अनुमोदक : श्री.प्रभाकर विधाते
दिनांक : ९-१२-९१

**संवाद :**

**श्री. अलफखॉ :** मी या प्रस्तावाबद्दल सुचक इच्छितो की, या शहराचे नांव औरंगाबाद असे असुन संभाजीनगर नावाचा उल्लेख प्रस्तावात का होती व दुसरे फिरते शौचालया बाबत प्रस्ताव मांडण्याचा उद्देश काय आहे आपण फिरते शैचालय घेवुन कुठे फिरणार आहात या प्रस्तावात काही सुधारणा करून ठेवला असता तर चालले असते परंतु असे प्रस्ताव ठेवणे योग्य नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पुणे, मुंबई महानगरपालिके मध्ये अशा प्रकारचे फिरते शौचालये आहेत पक्षांचे अधिवेशन किंवा काही कार्याच्या वेळी या शौचालयाचा उपयोग होतो.

**श्री.तकीहसन खान :** संभाजीनगरला फिरते शौचालया करावे परंतु औरंगाबादला करू नये याची काही आवश्यकता नाही आणि आश संभाजीनगर नावाचे प्रस्ताव सभेमध्ये घेऱ्यात येवू नये,

**मा.महापौर :** संभाजीनगर नावाचा उल्लेख असल्याने प्रस्तावात दुरूस्ती करून पुढील बठकीत ठेवावे तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**श्री.मुजीब आलमशा खान :** संभाजीनगर नावाचा प्रस्ताव या अजडंयामध्ये कसा टाकळा गेला या बाबत सुचिवावर कार्यवाही करावी.

**श्री.प्रकाश जाबळे :** भंगी मुक्ती कार्यक्रम शासनातर्फे राबविला जाणा असल्याने अशा फिरते शौचाल्यावर कामे कोणी करावी तेव्हा असे प्रस्ताव रद्द करण्यात यावे.

**सौ.लता दलाल :** या ठिकाणी माजी सभापती रतनकुमार पंडागळे आणि प्रकल्प अधिकारी उपस्थित आहेत मागील वर्षी एका कंपनीने अशा प्रकारच्या योजनेची माहिती कार्याल्यात दाखविली होती त्यामुळे जी योजना राबवीणे योग्य वाटले त्या दुष्टीने प्रस्तावास्व विरोध करणे योग्य नाही.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.
**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र.३२ :** संभाजीनगर ( औरंगाबाद) शहराची लोखसंख्या दिवसे दिवस वाळन असुन सुमारे पावणेसहा लाख लोक संख्या आहे. आपली महानगरपालिका दि.८-१२-८२ रोजी स्थापन झाली ९ वर्ष पुर्ण होवून दहाव्या वर्षात पर्दापण करीत आहे तरी देखील आपल्या महानगरपालिकेकडे एक रूग्नावहिका व एक शववाहीका असणे जरूरी आहे. म्हणून संभाजीनगर मधील (औरंगाबाद) नागरीकांना व विशेष करून येथील गरीब व गरजु लोकांना (रूगणांना) गैरसोय होत तरी ही गैरसोय दुर होण्याकरिता ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जयवंत के.ओक (बंडू)

अनुमोदक : श्री.प्रभाकर विधाते
दिनांक : ९-१२-९१

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संभाजीनगर नांव असलेले प्रस्ताव या ठिकाणी आपल्याला ठेवावेच लागणार आहेत.

**श्री.शंकर मगर, श्री.जयवंत ओक, श्री.मधुकर शिंदे, श्री.सुदाम वाघमारे :** संभाजीनगर (औरंगाबाद) असा प्रस्ताव घेणे आवश्यक आहे अन्यथा ऊर्दुतुन इतिवृत्त वाटप बंद करावे औरंगाबादचे एक प्रमुख दैनिक आहे त्यामधुन सुध्दा संभाजीनगर नावाचा उल्लेख असतो आपल्याला जर पटत नसेल तर आपण लिहू नका.

**श्री.अलफखान :** स.सदस्य श्री.प्रदिप जैस्वाल यांनी म्हण्टलया प्रमाणे मी सुचवितो की प्रस्ताव इंग्रजी किंवा मराठी भाषेत यावयास पाहिजे परंतु त्यावर चर्चा करतांना भारतातील ज्या १४ प्रमुख भाषा आहेत त्यापैकी प्रादेशिक भाषावर करू शकते एवढेच नाही तर ऊर्दुतून सुध्दा करता येऊ शकते लोकसभेमध्ये अशाच प्रकारची पध्दत आहे.

**श्री.शंकर मगर :** प्रस्तावाचा अजंडा मराठीतूनच काढावा ऊर्दुतून काढण्यात येवू नये.

**मा.महापौर :** या ठिकाणी संभाजीनगर किंवा ऊर्दुचा भाषाचा प्रश्न नाही आहे अशा प्रकारची चर्चा कृपया सभागृहात करण्यात येवू नये सदरील विषय स्थगित ठेवण्यात यावा.

ॲम्बुलन्स करिता प्रस्तावाची गरज नाही यासाठी अंदाजपत्रकात तशी तरतुद आहे ज्यावेळी मनपाला वाटले त्यावेळी संबंधित कंपनीकडून कोटेशन मागवून शववाहिका किंवा रूग्नावाहिका घेतल्या जावू शकते यासाठी या सभेत मंजुरीची आवश्यकता नसुन मा.आयुक्त बिगर मंजुरीने घेवू शकतात.

**श्री.जयवंत ओक :** मा.महापौर आपण किती दिवसात ॲम्बुलन्स मागवून देणार याची माहिती द्यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** प्रस्ताव आपल्याला घेणे आवश्यक आहे स.सदस्यांनी जो प्रस्ताव टाकला तो मनपाचे नियम ६६ प्रमाणे असुन योग् आहे कारण मनपाची मंजुरी यास मिळणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** रूपये २ लाखाची या रूग्न व शव वाहिकेची किंमत असल्याने रूपये ५ लाखा पर्यंताचे अधिकार स्थायी समितीस आहेत तेव्हा सदरील प्रस्ताव स्थायी समितीकडे ठेवण्यात यावा.

**श्री.शंकर मगर :** मा.महापौर हा प्रस्ताव अंदाजपत्रकाचा नाही आहे तेव्हा सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :** स्थायी समितीस अधिकार असुन आठ दिवसात या सभेस मंजुरी मिळू शकते.

**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावे.

**विषय क्रमांक ३३ :** संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिके तर्फे शहरामध्ये सार्वजनिक शौचालय व स्नानगृह असणे नितांत गरजेचे आहे शहरात विविध विभागीय पातळीवरील शासकीय कार्यालय, उच्च न्यायालय (खंडपीठ) विद्यापीठ, शैक्षणिक संस्था तसेच प्रेक्षाणिक स्थळे

व औद्योगिकरण,बाहेर गावचे प्रवाशी, पर्यटक, उद्योगपती, रोजगार लोक व व्यवसायीक लोक इत्यादी सतत येत असतात विशेषात पर्यठकांची कुचंबना होत असते या सर्वीची गैरसोय टाळण्यासाठी गरज म्हणून मुंबई पुणे व सोलापुर इ. महानगरपालिके प्रमाणेच आपल्या शहरात महानगरपालिकेने सोय करावी मंजुरीस्तव ठराव सादर.

**टीप :** शहरात खालील ठिकाणी अशा प्रकारची शौचालय व स्नानगृह करता येतील (१) बसस्टँड समोर (२) रेल्वे स्टेशनाच्या आसपास (३) हडको-सिडको बसस्टँड (४) शहराच्या मध्यवर्ती भागात इत्यादी

सुचक : श्री.जयवंत ओक (बंडू)
अनुमोदक : श्री.प्रभाकर विधाते
दिनांक : ९-१२-९१

**संवाद :**
**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.
**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्रमांक ३४ :** औरंगाबाद शहराचा झपाटयाने विकास होत आहे. त्या बरोबरच लोकसंख्येत देखील या दशफात दुपटट्ीने वाढ झाली वाढती लोखसंख्या व प्रत्यक्ष झालेला विकास लक्षात घेता आमखास मैदान व आसिफिया कॉलनीच्या उत्तरेस १९८० नंतर ७ ले आऊटला मंजुरी झ ाालेली असुन त्यात आरेफ कॉलनी हे समारे २२६ प्लॉट दिलरस कॉलनी ७०, गुलशन कॉलनी ३५ व बिसमिल्ला कॉलनी, बुरहानी कॉलनी, आसेफ बाग व इतर ले आऊटच्या प्लॉटावर वसाहती मिळून ८ ते १० हजार लोकसख्या आहे या भागात बहुतांशी मुस्लीम समाजाचे लोक राहतात व अत्यावश्यक सेवे अतंर्गत या भागातील लोकांना त्या भागाच्या परिसरात कब्रस्थान नाही व डेव्हलेपमेंट प्लॉनमध्ये तसे रिझव्हेशन नाही येथील लोकांना दफणविधीसाठी फार लांब जावे लागते मागील वर्षा महानगरपालिकेने अशाच एका वसाहतीसाठी भावसिंगपुरा भागात सर्व्हे नं.४८ मधुन स्मशानभुमी व अपोच रोडसाठी जागा संपादन करण्याचा ठराव मंजुर करून तेथील अडचण दुर केली त्याप्रमाणे आता या भागात ही महानगरपालिकेने कब्रस्थानासाठी आरीफ सोसायटीच्या उत्तरेस या संपुर्ण वसाहतीला जवळच असलेले सर्व्हे नं.३३ हिमायत नगर क्षेत्र १ हेक्टर ९९ आर कब्रस्थान व ६० फुट रूंद डी.पी.रोडसाठी भूसंपादन करावे. कारण ६० फुट डी.पी. रोड याच सर्व्हे क्र.३३ मधुन जात असुन रोडसाठी आपल्याला भाग भुसंपादन करावेच लागणार आणि बाकीची जमीन कब्रस्थानासाठी घ्यावयाची अत्यंत गरज आहे तसेच या ६० फुट रूंद टी.बी. किलनीक ते मकबरा बायपास रोड पर्यंत रस्ता रूंद होण्यास मदत होईल व दफनविधीसाठी देखील जागा उपलब्ध होईल तरी वरील प्रमाणष भुसंपादन करणेस प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.मिर्झा अजिजुल्ला बेग
अनुमोदक : श्री. अलफखान हुसैन खान
दिनांक : १६-१२-९१

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे असीफिया या कॉलनीच्या उत्तरेस १९८० नंतर ७ ले आउटला मंजुरी असुन त्यात ८ ते १० हजार लोकसंख्येची वसाहत आहे या भागा लागत कब्रस्तान नसुन विकास योजनेत आरक्षण नाही त्यामुळे येथील लोकांना दफनविधीसाठी लांब जावे लागते ज्याअर्थी भावसिंगपुरा भागात सर्व्हे नं.४८ मधुन स्मशानभूमी व अप्रोच रोडसाठी जागा संपादन करण्याचा ठराव मंजुर करून अडचण दुर झाली त्याचप्रमाणे या भागासाठी ही आरीफ सोसायटीच्या उत्तरेस व या संपुर्ण वसाहतीला जवळच असलेले सवर्हे नं.३३ हिमायत नगर क्षेत्र १ हेक्टर ९९ आर कब्रस्तान व ६० फुट रूंद डी.पी.रोड साठी भुसंपादन करणे असल्याने बाकीची जमिन कब्रस्तानासाठी ठेवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३५ :** नेहरू रोजगार योजना राबविण्याची जबाबदारी शासनाने महानगरपालिकेवर टाकलेली आहे. या संदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये माहिती देण्यात यावी. तसेच ही योजना राबविण्यासाठी जी कमेटी स्थापन करण्यात आली आहे त्या कमेटी मध्ये दोन नगरसेवक घेण्यात यावे.

सुचक : श्री.अजिजुल्ला बेग
अनुमोदक : श्री.फैय्याजखान
दिनांक : १६-१२-९१

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यापम्राणे नेहरू रोजगार योजना राबविण्याची जबाबदारी शासनाने महापालिकेवर टाकलेली आहे. यासाठी एक कमिटी स्थापन करण्यात आली असुन त्या कमिटीवर दोन नगर सेवकांना घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६:** देवगिरी हायस्कुल समोरील जागा सध्या मोकळी पडलेली आहे. सदरील जागा वार्ड क्र.४३,४४,४५,४६ मध्ये येते व सदरील भागाची लोकसंख्या कमीत कमी ५० हजार असुन येथील एकही (Play Ground) नाही खेळाडूंना खेळण्यासाठी मनपा तर्फे सदरील जागा (Play Ground) करिता रिझर्व्ह करण्यात यावे म्हणजे सदरील ठिकाणी नागरीकांना क्रिडांगणाची सोयी होईल करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशोर थोरात
अनुमोदक : श्री.विठ्ठल पेरकर
श्री. अजीम खान दादामियाँ
दिनांक : १०-१-९२

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यापम्राणे देवगिरी हायस्कुल समोरील जागा मोकळी पडलेली आहे ती जागा वार्ड क्र. ४३,४४,४५,४६ मध्ये येते असुन या भागातील लोकसंख्या ५० हजाराची आहे या भागासाठी खेळण्याचे ग्राऊंड कुठही नसुन सदरील जागा मनपातर्फे खेळण्याचे ग्राऊंडसाठी आरक्षित करून क्रिडागणाची सोय करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७ :** आपल्या महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग मध्ये वर्ग-१ व वर्ग -२ वर पदा करिता प्रतिनियुक्ती करण्यात यावी.

सुचक : श्री.बंडू प्रधान
अनुमोदक : श्री.प्रकाश जावळे
श्री.रतनकुमार पंडागळे
दिनांक : १३-१-९२

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सभागृहात कोरम नाही आहे त्यामुळे सभा तहकुब करण्यात यावी.

**मा.महापौर :** सभेत कोरम पुर्ण असुन सभा तहकूब करण्याचा प्रश्नचा उदभवत नाही. सर्व स.सदस्यांना विनंती करण्यात येते की सभा चालु आहे, कुनिही उठून जावू नये.

**श्री.बंडू प्रधान :** विषय क्र.२५ मंजूर करण्यात यावा.

**श्री.मधुकर शिंदे :** सदरील विषयाचे अनुमोदक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात यावा.

**मा.महापौर :** ठिक आहे. अनुमोदक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात येते.

**श्री.बंडू प्रधान :** मा.महापौर या विषयाचे अनुमोदक आहेत.

**मा.महापौर :** ठिक आहे. अनुमोदक असल्याने प्रस्तावावर चर्चा करण्यात यावे.

**श्री.मधुकर शिंदे :** आपण एकदा निर्णय दिलेला असल्याने पुन्हा यावर चर्चा नको.

**मा.महापौर :** या प्रस्तावावर आपले कायमत आहे ते नोंदवावे अन्यथा कोणताही प्रस्ताव वेळ पडल्यास मतदानाला घ्यावे लागले (यावेळी काही स.सदस्य पोल पोल असी आरेडतात)

**श्री.बंडू प्रधान :** मला एक सांगवसे वाटते की आपल्या महानगरपालिकेचे सिडको येथे जो दवाखाना आहे त्या दवाखान्यात २२ खाटांची व्यवस्था आहे. आणि सिडकोच्या भागासाठी हा दवाखाना उघडण्यात आलेला असुन याचा फशयदा बऱ्याचशा सिडको नागरीकांना होतो काही स.सदस्य त्या भागातील जनतेचा वेगळा प्रश्न हाताळून लोकांना सुलयाता देता परंतु त्यांच्या अरोग्य विषयी काही ही चिंता नाही तेव्हा त्या दवाखानयामध्ये प्रतिनियुक्तीवर डॉक्टरांची आवश्यकता असुन या प्रस्तावास मंजुरी दयावी अन्यथा सदरील दवाखाना चालवावयाचा नसल्यास पतर घ्यावा दुसरे असे की काही चतुर्थ व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांचे रिइंम्बार्समेंटसाठी फाॅल दाखल करताटत तेव्हा त्यांना योग्य तो मोबदला मिळत नाही काही हितचिंतकांच्या कर्मचाऱ्यांनाच या फायदा होतो जर आपन वर्ग-१ साठी प्रतिनियुक्तीवर डॉक्टरांचे पद भरल्यास कार्यालयीन कामे सुरळीत होतील सघ्याचे डॉक्टर (वार्ड वाईज) दवाखान्यात फिरून कधी पाहत नाही त्यामुळे प्रतिनियुक्तीवर वर्ग-१ पदाचे डॉक्टरांची नेमणुक केल्यास प्रशासनाचा कार्यभार सुरळीत चालेल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सुरवातीला लोकंप्रतिनिधी निवडून आल्याबरोबर सन ८८ पासुन औरंगपुरा येथे दवाखाना व्हावा म्हणून प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. परंतु तो मनपाचे

आर्थिक बाब म्हणून काहीही कार्यवाही झालेली नाही तेव्हा सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावी.

**श्री.बंडू प्रधान :** एका डॉक्टरांच्या प्रतिनियुक्तीने मनपावर आर्थिक बोजा पडणार आहे काय ? मनपातील डॉक्टरांची आपण कामाची पाहणी केल्यास असे दिसुन येईल की ते कधी ही फिरून पाहणी करीत नाही कुणाला कर्मचाऱ्यांना साधे इंजेक्शन तपासुन देवू शकत नाही तर मनपामध्ये फुकट बसुन पगार घेतात या डॉक्टरा बद्दल कित्येक औषधीचा गैरवापर केल्याचे दिसुन येते तेव्हा त्यांनी केलेल्या उधळपट्टीचा आपण मोजमाप करित नाही काय यासाठीच प्रतिनियुक्तीवर दुसरे डॉक्टर मागविण्यासाठी हा प्रस्ताव मंजुर करावा.

**सौ.लता दलाल :** स.सदस्यांनी या ठिकाणी जे भाषा केलेले आहे ते योग्य नसुन त्याबाबत भी काही बोलु इच्छित नाही परंतु आरोग्याच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यात शासन कडून रूपये ९ लाख या विभागासाठी यावयाचे होते. त्यातुन आरोग्य विभागाचा खर्च दवाखान्याद्वारे करावयाचे होते. त्याप्रमाणे प्रथम ते अनुदान शासनाकडून आणावे आणि नंतर प्रतिनियुक्तीवर डॉक्टरांचे पदे भरावीत दुसरी बाब म्हणजे स.सदस्यांनी जे आरोप केलेले आहेत ते चुकिचे असुन अधिकारी म्हटले तर शासनाचे नियमानुसार त्यांना सर्व फॅसिलिटी मिळणार वैयक्तीक बाबीत कुनिही बोलु नये आणि शासन सर्व खर्च करते तर आपल्याला बोलण्यात काहीच अर्थ नाही. मला वाटते प्रतिनियुक्तीवर डॉक्टांची पदे भरण्यापुर्वी जो ठराव यापुर्वी पास झालेला आहे औरंगापूरा व जवाहर कॉलनी येथील दवाखान्यासाठी पदांची मंजुरी घेवुन दवाखाना सुरू करण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री.बंडू प्रधान :** मी आपल्याला सांगु इच्छितो महापौर साहेब १ ऑगस्ट १९९१ ला श्रीमती डॉ.कोसळगे आणि त्यांचे मिस्टर जाईन होण्यासाठी माजी आयुक्त मा.जयरथ यांच्याकडे गेले असता संबंधित डॉक्टरांनी त्यावेळी सांगितले की आपल्याकडे बजट नाही आहे त्यामुळे सध्या आवश्यकता नाही. येथील दवाखान्यासाठी दोन डॉक्टरांनी पदास मंजुरी दिलेली आहे.

**मा.महापौर :** स.सदस्य आपल्याला सुचित करण्यात येते की, सभागृहात तुम्ही तुमच्या भावना मांडता लक्षात घेता सभागृहाची मंजुरी असल्यास प्रस्तावास मंजुरी मिळेल,

**श्री.तकिहसन खान :** प्रतिनियुक्तीवर डॉक्टर घेण्याबाबतच्या प्रस्तावापुर्वी सिडको येथील दवाखान्यात डॉक्टर जॉईन झालेले आहे त्यांना आपण काय करणार जर प्रतिनियुक्तीवर दोन डॉक्टर्स घ्यावयाचे ठरल्यास जे पुर्वीच डॉक्टर जॉईन झ ाालेले आहेत त्यांना आपण काढू शकत नाही मग त्यांचाही प्रश्न पयार्याने उभा राहील यासाठी मा.आयुक्त यांनी योग्य ती चौकशी करून पुढील कार्यवाही करावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मनपाच्या कामाचा व्याप लक्षात घेता जसे अतिरिक्त शहर अभियंता यांचे पदाचे बाबतीत जसे प्रस्ताव केला त्याच प्रमाणे शहराचा वाढता व्याप लक्षात घेता अतिरीक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी पद निर्माण करून भरण्यास हरकत नाही.

**श्री.अविनाश कुमावत :** विषयानंतर होत आहे.

**श्री.मोहम्मद ईस्माईल :** सिडको येथील दवाखाना सुरू करण्याचे कारण हेच की, सिडको लोकसंक्या लक्षात घेता त्या ठिकाणा वरून शहरात इमरजन्सी अथवा ऑपरेशनचे केस असल्यास ती तात्काळ अत्यावश्यक सेवा म्हणून करणेसाठी सेवा उपलब्ध व्हावी आणि त्यासाठी एखाद्या सर्जनची नेमणूक व्हावी. यासाठी तेथील दवाखान्याचा योग्य ती उपयोग होत जाईल अन्यथा नाही.

**श्री.अविनाश कुमावत :** त्या ठिकाणी ऑपरेशन होवु शकत नाही. या बोलण्यात काहीच दम नाही.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** मनपाच्या आरोग्य केंद्रामध्ये लेडीज डॉक्टर्स आहेत याबाबत विचारणा केली असता संबंधित डॉक्ट भुलथापा देवुन सांगतात की, लेडीज डॉक्टराची भरती दवाखाण्यात करणे बाबत शासनाचा जी.आर.असल्याचे सुचवितात परंतु मनपामध्ये विवारण केली असता असे काहीही नसुन जनरल कॅटेगिरी पाहिली जाते या मध्ये याच महापालिकेत लेडीज डॉक्टर भरण्याचे भुलथापा का मारल्या जाते या बाबत मा.आयुक्तांना चौकशी करावी.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवावा किंवा काय याबाबत सभागृहात मत होणे आवश्यक आहे. (यावेळी सेना सदस्यांतर्फे पोल पोल असा आवाज)

**श्री.अलफखान :** प्रशासनाचे काय मत आहे. त्याबाबतचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री.बंडू प्रधान :** सदरील प्रस्ताव मंजुर करावा जर या प्रस्तावा बाबत काही त्रुट्या असतील तर प्रशासकीय प्रस्ताव आणावा.

**श्री.चेनकरण संचेती, श्री. रतनकुमार पंडागळे, श्री.प्रकाश जावळे :** या प्रस्तावा बाबतचा पुर्ण अभ्यास करून प्रस्ताव पुढील बैठकित ठेवावे.

**श्री.गजानन बारवाल :** सभागृहात या बाबत मतदान घ्यावे. (यावेळी काही स.सदस्य पोल पोल असे आरडतात)

**मा.महापौर :** ठिक आहे सभागृहाच्या मताप्रमाणे पोल करण्यात येते की विषय स्थगित ठेवावा किंवा नाही. ( यापैकी हात वर करून पोल झाले असता प्रस्ताव रद्द करणे बाबत एकमत झाले )

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावे.

**श्री.बंडू प्रधान :** मा.महापौर आपण सभागृहात योग्य तो निर्णय घेवु शकत नाही हे यावरून सिध झाले काही मंडळी सिडको बाबत फार काही करतो असे आच आणून जनतेची दिशाभुल करतात त्यांच्या आरोग्य विषयी काही लक्ष देत नाही या ठिकाणी जनतेचे प्रतिनिधीत्व राहून ही व्यर्थ आहे. (यावेळी सभागृहासमोर स.सदस्य निघुन जातात)

**ठराव :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** सभागृहामध्ये कोरम पुर्ण नाही.

**मा.महापौर :** कोरम आहे आता अजंडयातील जे विषय आहेत ते पुर्ण करावयाचे आहेत कृपया आपण खाली बसावे.

**विषय क्रमांक ३८ :** वार्ड क्र,१६ हर्षनगर झोपडपट्टी येथे गेली अनेक वर्षापासुन वसाहत झाली आहे सदरील वसतीत अनेक गोर गरीब व हात मजुरी करणारे लोक (स्त्री पुरूष) राहत आहेत त्यांना दररोज कामासाठी सकाळी ७ पासुन सायंकाळी ७ वाजे पर्यंत पोट भरणेसाठी जावे लागते त्यामुळे त्यांची मुले बाळे इकडे तिकडे भटकतात कारण लहान मुलांचा बरोबर घेता येत नाही तरी सदरील भागात मनपा मार्फत एक पाळणाघर सुरू करण्यात यावे व पुढील वर्षा ९२-९३ सालाच्या आर्थिक तरतुद करण्यात यावी.

सुचक : श्री.जावेद हसन खान
अनुमोदक : श्री.किशोर गोविंदराव थोरात
दिनांक : १५-१-९२

**संवाद :**
**मा.महापौर :** सुचक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात यावा.

**ठराव :** प्रस्ताव वगळण्यात यावा.
**विषय क्रमांक ३९ :** हर्षनगर झोपडपट्टी येथे मनपा तर्फे नविन आरोग्य केंद्राची शाखा उघडण्यात यावी.
सुचक : श्री.जावेद हसनखान
अनुमोदक : श्री.किशारे गोविंदराव थोरात
दिनांक : १५-१-९२

**संवाद :**
**मा.महापौर :** सुचक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात यावा.
**ठराव :** प्रस्ताव वगळण्यात यावा.

# *ऐनवेळचा प्रस्ताव*

**विषय क्रमांक ४० :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा त्यांनी प्रस्ताव सादर केला की औरंगाबाद शहरासाठी पुर्नरचीत वितरण व्यवस्था टप्पा-१ ह्या १८६२-३४ लक्ष रूपये योजनेस औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव क्र.१२३८ दिनांक २५-३-१९८६ नुसार मान्यता दिलेली आहे.

सदरील योजना महानगरपालिके तर्फे राबविण्यात येणार असुन तिचे काम महाराष्ट्र पाणी पुरावठा व जलनिसारण मंडळातर्फे करण्यात येत असुन सदरील योजनेचा आळतीबंध खालील प्रमाणे आहे.

(१) शासकीय अनुदान रूपये ४३४.५१ लक्ष
(२) आयुर्विमा कज; रूपये ५११.२२ लक्ष
(३) खुल्या बाजारातील कर्ज रूपये ७३०.३७ लक्ष

(४) लोक वर्गणी रूपये १८६.२४ लक्ष

एकुण रूपये रूपये १८६२.३४ लक्ष

महाराष्ट्र पाणी पुरवठा महामंडळास शासकीय अनुदानाची रक्कम शासनाकडून प्राप्त झाली असुन आयुर्विमा मंडळाकडून ही मनपाने घेतलेल्या व मंजुर केलेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.५५२ दि.२-११-८७ व ठराव क्र.(१७) दिनांक १६-६-९० नुसार संपुर्ण रूपये ५११.२२ लक्ष कर्ज प्राप्त झाले आहे. तसेच खुल्या बाजारातुन अन्ये करावयाचे कर्ज रक्कम रूपये ७३०.३७ पैकी रूपये ३००.०० लक्षासाठी महानगरपालिकेने यापुर्वी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.(१९) दिनांक १६-६-९० नुसार संमत करून कार्यालयाचे पत्रक क्रमांक एएमसी/ईई/पा.पु./२७५/९० दिनांक २६-६-९० नुसार महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण महामंडलाबरोबर कारनामाही करून दिलेला आहे.

शिल्लक राहिलेल्या खुल्या बाजारातुन उभे करावयाचे कर्ज रक्कम रूपये (७३०.३७ - ३००.००) = ४३०.३७ लक्ष) सदरील रक्कम रूपये ४३०.३७ लक्ष रूपयेचे कर्ज खुल्या बाजारातुन उभारव्यासच महानगरपालिकिने सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.५८/२० दिनांक २९-८-९० ला मंजुर केलेले आहे. सदरील कर्ज मंजुर झालेले असुन त्याबाबत महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण महामंडळासी त्यांचे शर्ती व अटीस अधिन राहून करारनामा करणेसच सर्वसाधारण सभेचा ठराव संमत करून कळविणणेस्तव अधिक्षक अभियंता प.अ.वि.औरंगाबाद ह्यांनी त्यांचे पत्र क्र. ईईसीए/ बीयुडी/ युआरबीएन /ओण्मबी/ एलओएएन/ १९-९२/७०३८/दिनांक १-११-९१ नुसार कळविले असुन सदरील कर्जाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे आहे.

(१) कर्ज दहा सारख्या वार्षीक हप्त्यात परत करण्यात येईल व कर्जाचा हप्ता दरवर्षी एक जुन रोजी देय असेल.

(२) उर्वरीत कर्जावर व्याजाचा दर हा दरसाल दर शेकडा १२.५० टक्के असेल हया व्याजाचा दर रूपये १.० रूपये १०० असलेल्या गरंटी फिस धरून आहेत.

(३) व्याज हे दरवर्षी एक जुन व एक डिसेंबर रोजी देय असेल.

(४) उशिरा परतफेड केलेल्या कर्जावर व व्याजा सह २ टक्के व सा.द.शे. जास्तीचे व्याज आकारले जाईल.

(५) महानगरपालिका वरील अटी मान्य असल्याचा सर्वसाधारण सभेत ठराव होईल.

(६) महानगरपालिका महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण महामंडळा बरोबर रूपये १०/- च्या स्टॅम्प पेपर वर प्रचिलित अटीनुसार कर्जा बद्दलचा करार करेल.

तरी खुल्या बाजारातुन रक्कम रूपये ४३०.३७ लक्ष कर्ज महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण महामंडळा हयांच्या वरील शर्ती व अटीस अधिन राहून घेण्यासाव व करार नामा करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.अजिजुल्लाह बेग :** ऐनवेळी प्रस्ताव घेता येत नाही.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव प्रशासनातर्फे असुन अत्यंत महत्वाचा आहे आणि पाणी पुरवठयाबाबत प्रशासकिय प्रस्ताव असुन तो मंजुर करून पाठविणे आवश्यक आहे.

**श्री.अजिजुल्लाह बेग :** परंतु प्रस्ताव घेता येत नाही.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरासाठी पुर्नरचीत वितरण व्यवस्था टप्पा क्र.१ या योजनेसाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.५८/२० दि.२९-८-९० अन्वये ४३०.३७ लक्ष रूपयांचे कर्ज खुल्या बाजारातुन घेण्यास दिलेल्या मंजुरी नुसार अधिक्षक अभियंता म.अ.वि.औरंगाबाद यांचे कडील पत्र क्र.ईईसीए/बीयुडी/युआरवीएन/ओएमवी/एलओएन/९१-९२/७०३८/ दि.१-११-९१ मध्ये दर्शविलेला नियम व अटीस अधिन राहून दि.२९-८-९०च्या ठरावा नुसार खुल्या बाजारातुन कर्ज घेऱ्यास आवश्यक तो करारनामा करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१ :** औरंगाबाद शहरासाठी वाठीव पाणी पुरवठा योजना टप्पा-२ व औरंगाबाद शहरासाठी पुर्नरचित वितरण व्यवस्था टप्पा-१ या दोन्ही योजनेचे १० टक्के वर्गणी रक्कम रूपये २३५.३२ लक्ष रूपये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळास औरंगाबाद महानगरपालिकेस देणे आहे. सदरील थकबाकीची रक्कम खुल्या बाजारातुन कर्ज उभारून मिळणे बाबत महापालिकेने सर्वसाधारण सभा २२-११-९०ला ठराव क्रमांक ८३/७ नुसार ठराव संमत केला होता व सदरचा ठराव उप सचिव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन मुंबई हयांना अ.शा.पत्र क्रमांक २४९/९१ दिनांक १७-१-९१ ला पाठविलेले आहे.

उप सचिव नगर विकास विभाग मुंबई हयांनी त्याचे पत्र क्रमांक ओपमबी-१०९१/११४८/प्रक्र-८३/९१ नवि३१ दिनांक १२-११-१९९१ द्वारे कळविले आहे की औरंगाबाद महानगरपालिकास वित्तीय वर्ष ९१-९२ मध्ये खुल्या बाजारातुन कर्ज उभारणी मर्यादा रूपये एक कोटी निश्चित करण्यात येवून ती रिर्झव बँकेच्या संबंधित शाखेस कळविण्यात आली आहे.

तरी सदरील एक कोटी रूपयांचे पुर्ततेसाठी खुल्या बाजारातुन कर्ज औरंगाबाद महानगरपालिका शासनाच्या शर्ती नियम व अटीस अधिन राहून घेणा आवश्यक आहे सदरील एक कोटी लोकवर्गणीची थकीत रक्कम भरण्यासाठी वापरले जातील प्रस्ताव विचारर्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद वाठीव पाणी पुरवठा योजना टप्पा-२ व औरंगाबाद शहर पुर्नरचित वितरण व्यवस्था टप्पा-१ या दोन्ही योजनेसाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलानिःसारण मंडळाकडे भरावयाच्या १०/- लोक वर्गणीची रक्कम रूपये २३५.३२ लक्ष रूपया पैकी सन १९९१-९२ वित्तीय वर्षा मध्ये उप-सचिव नगर विकास मुंबईयांचे कडील पत्र क्र,ओएमबी/१०९१/११४७/प्र.क्र.८३/९१ नवी ३१ दिनांक २१-१२-९१ अन्वये शासनाचे नियम व अटीस अधिन राहून व आवश्यक तो करारनामा करून खुल्या बाजारातुन रूपये एक कोटी लोकवर्गनीची रक्कम म्हणून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडे भरणा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

जन गण मन राष्ट्रगिताने सभा संपली

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालीका औरंगाबाद*

**दिनांक १९-२-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत बुधवार दि.१९-२-९२ रोजी मा.महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजे ११.५० वाजता वंदे मातरम् या गिताने सभेस सुरूवात झाली या सभेस मा.आयुक्त, उप आयुक्त तथा अधिकारी व स.सदस्यउपस्थित होते.**

१) मा.श्री.थोरात किशोर गोविंदराव
२) मा.श्री.यादव अशोक सायन्ना
३) मा.श्री.शेळक अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
५) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
६) मा.श्री.गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा.श्री.सोनवणे केशव काशिनाथ
८) मा.श्री.भगुरे तुळशिराम छगन
९) मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीक
१०) मा.श्री.पाटील नरेंद्र यादवराव
११) मा.श्री.घडामोडे मोतीराम नारायणराव
१२) मा.श्री.म.आयुब गुलाम जिलानी
१३) मा.श्री.मुजीब आलमशा खान
१४) मा.श्री.प्रधान बंडू गोविंदराव
१५) मा.श्री.नारायण मोहनफत्तेलष्कर
१६) मा.श्री.तकीहसन खान कासीम हसन खान
१७) मा.श्री.स.अ.एकबालुद्दिन स.मो.कुतूबुद्दीन
१८) मा.श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१९) मा.श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२०) मा.श्री.वंजारे पीटर प्रभाकरराव
२१) मा.श्री.अ.रशीदखान (मामू) अ.हमीद खान
२२) श्रीमती दलाल लता श्रीनिवास
२३) मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२४) मा.श्री.खैरे चंद्रकांत भाऊराव
२५) मा.श्री.हाजी मो.हफिजोद्दीन
२६) मा.श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
२७) मा.श्री.कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) मा.श्री.डॉ.संचेती चेनकरण गणेशलाल
२९) मा.श्री.म.इस्माईल अ.करीम
३०) मा.श्री.फैय्याजखान अहमद खान
३१) मा.श्री.अलीम बेग मिर्झा कलीम बेग

३२) मा.श्री.मोहसीन अहमद बशीर अहमद
३३) मा.श्री.स.हुसैन स.अहमद
३४) मा.श्री.मानकापे नामदेवराव शामराव
३५) मा.श्री.पैठणकर पांडूरंग भिकाजी
३६) मा.श्री.सुग्रीव हिरालाल रिडलान
३७) मा.श्री.अलफखान हुसैनखान
३८) मा.श्री.वाघमारे सुदाम भानुदास
३९) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
४०) मा.श्री.अजिमखाँ दादामियाँ अ.रहेमान
४१) मा.श्री.सावे मोरेश्वर दिनानाथ
४२) मा.श्री.डॉ.काळे शांताराम यशवंतराव
४३) मा.श्री.दत्त प्रदिपकुमार एस.
४४) मा.श्री.बारवाल गजानन रामकिसन
४५) मा.श्री.जहागिरदार अजिज मुख्तार अहेमद
४६) मा.श्री.मोटे राधाकृष्णा तुळशिराम
४७) मा.श्री.जावळे प्रकाश शिवराम
४८) मा.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
४९) मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५०)
५१) मा.श्री.परदेशी सुभाष शिवलाल
५२) मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

संवाद :

**श्री.अजिजुला बेग :** ऑल इंडिया कॉन्सील ऑफ मेअर्सची जो परिषद बैंगलोर येथे त्या परिषदेत मा.महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांची अखील भारतीय पद्कीवरील उपाध्यक्षपदी महापौरांच्या परिषदेत एकमतावे निवड झाली. त्याबद्दल मी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो.

**श्री.अजिज जहागिरदार, श्री.नरेंद्र पाटील :** मा.महापौरांची अखील भारतीय महापौरांच्या परिषदेत उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल आनंदाची बाब आहे त्यास आमचे अनुमोदन आहे.

**श्री.चंक्रकांत खैरे :** स.सदस्यांना सुचित केल्याप्रमाणे मा.महापौरांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**श्री.केशव सोनवणे :** स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांना मागील सभेमध्ये तीन महिन्यासाठी निलंबित केलेले आहे आणि या महिन्यातील सभेचा अजंडा स.सदस्यांना वाटप झालेला नाही आहे आणि त्यामुळे मिटींग विभागाच्या चुकिने स.सदस्य आज सभागृहात हजर झाले आणि काही फनिचरची तोडफोड झालेली आहे. जर स.सदस्यांना अगोदरचा पुर्वसुचना दिली असती की, आपले तीन महिन्यासाठी सदस्यत्व रद्द केलेले आहे कृपया आपण सभेला येण्याची तसदी घेवु नये तर आज हा प्रकार सभागृहात छडला नसता यास सर्वस्वी प्रशासनाची चुक असुन

तेच कारणीकृत आहेत आणि या प्रकारामुळे वर्तमाणपत्रातून नगरसेवकांची बदनामी उद्याला लोकांसमोर दिसुन येते तेव्हा याबद्दल आपण काय कार्यवाही करणार?

**श्री. कचर नवपुते :** बैठकीला सुरवात होण्यापूर्वीच येथील सेक्युरेटी गार्डसने स. सभास्यांना पकडून बाहेर नेले. जर सभा चालू असतांना पकडून नेले असते तर आम्ही समजू शकलो असतो.

**श्री.अविनाश कुमावत :** स.सदस्यांना अजंडयाची प्रत पाठवून निमंत्रीत केलेले आहे.

**मा.महापौर :** स.सदस्यांचे तीन महिन्यासाठी सभासदत्व रद्द केलेले आहे ते एक सभासद आहेत तर पुर्वपने सभासदत्व रद्द केलेले नसुन नियमाप्रमाणे अजंडा पाठविण्याची कार्यवाही करावी लागते.

**श्री.सुदाम वाघमारे :** मुर्गी नाल्यावरी एका उघडया अवस्थेतील विहिरीमध्ये सात वर्षे वयाची छायाबाई सरेव नावाची मुलगी पडून मृत्युमुखी पडलेली आहे तिच्या पालकास मनपातर्फे रूपये पाच (५०००/-) हजाराची मदत द्यावी अशी मी सुचना मांडतो सदरील मुलगी मनपातील कर्मचाऱ्याची असल्याचे समजते.

**मा.महापौर :** संबंधित कुटूंबियाचा अर्ज आलेला नाही त्यामुळे काहीच करता येणार नाही.

**श्री.सुदाम वाघमारे :** सभागृहामध्यें मनपा स.सदस्य व अधिकारी यांचे अतिरिक्त एक अनोळखी अधिकारी बसलेले आहेत त्यांचा बाबतीत महिती द्यावी.

**सचिव :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे सभागृहामध्ये जे नविन अधिकारी बसलेले आहेत त्यांचे नांव श्री.जी.एल.अकोडे असुन ते अमरावती महानगरपालिकेचे सचिव असुन त्या महानगापालिकेला थोडक्यात दिवसात निवडणूक होत आहेत तेव्हा महानगरपालिकेच्या कामकाजीची माहिती घेण्यासाठी ते येथे आलेले आहेत आणि मा.महापौरांची त्यांनी सभागृहात बसण्याची परवानगी घेतलेली आहेत.

**श्री. प्रकाश जावळे :** स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांचे तीन महिन्यासाठीचे सभासदत्व निलंबित केलेले आहे. तरंतु त्यांना या महिन्याच्या बैठकिचा अजंडा वाटप केलेला असुन त्या बैठकिचे इतिवृत्तव अद्याप कायम करण्यात आलेले नाही तेव्हा स.सदस्यांना सभागृहात बसु देण्याची परवानगी द्यावी.

**सौ.लता दलाल :** माझी एक हक्कमंगाची सुचना अशी आहे की सचिवांनी नियमाप्रमाणे काम करावे किंवा नाही मला माहिती नाही कारण ज्या स.सदस्यांना बैठकिचा अजंडा वाटप करावयास पाहिजे होता त्यांना दिलेला नाही व ज्या स.सदस्यांना अजंडा नको होता त्यांना दिला म्हणजे मी सततच्या बैठकिला उपस्थित राहुन ही कोणत्याही प्रकारची नोटीस वगैरे नसतांनाही गेल्या तीन महिन्यापासुन मला अजंडा मिळत नाही तेव्हा सचिवावर काय कार्यवाही करणार आहात?

**श्री.विठ्ठल पेरकर :** स.सदस्य व सचिवांवर काय कार्यवाही करावयाची तो मुद्दा वेगळा आहे परंतु गेल्या दोन बैठकीपासुन या सभागृहातील मालमत्तेचे जे नुकसान होत आहे त्याबाबत आपण काय कार्यवाही करणार? कारण ही जनतेची प्रॉपर्टी आहे याची नुकसान भरपाई कोन देणार ?

**मा.महापौर :** कार्यवाही केलेली आहे आणि निर्णय अलेला अता इतिवृत्तास सुरूवात करावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सभेला सुरूवात झाल्यानंतर प्रथमःत प्रश्नोत्ताराचा तास घ्यावा.

**श्री.बंडू प्रधान :** इतिवृत्त कायम जो पर्यंत होत नाही तो पर्यंत स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांना सभागृहात बसु द्यावे.

**श्री.नरेंद्र पाटील :** गेल्या ३ वर्षापासुन जसे प्रस्ताव मंजुर होत आहेत तसेच या सभेतील इतिवृत्त मंजुर झाले असे सभागृहातील सर्व स.सदस्यांनी समजुन मान्य केले तर बरे होईल असे मला वाटते.

**श्री.बंडू प्रधान :** ज्या वार्डाचे प्रतिनिधीत्व स.सदस्य श्री.घडामोडे सध्या करित आहेत त्यांचे काय म्हणने आहे याबाबत त्यांनी पेपरवर छापुन आनलेले आहे कृपया सर्व स.सदस्यांना वाटण्याची परवानगी द्यावी.

**मा.महापौर :** पाच मिनिट आपण गप्प बसावे.

**श्री.अलफखान :** स.सदस्य श्री.घडामोडे यांनी सभागृहात जे काही केले ते योग्य नाही परंतु सचिवांनी काय कार्यवाही केली या बाबतचा खुलासा नियम ३० (तीस) अन्यवे निधी सल्लागारांनी करावा.

**श्री.मुजीबखान :** विना परवानगीने स.सदस्य श्री.बंडू प्रधान सभागृहात पत्रके वाटत आहेत हा सभागृहाचा अपमान आहे या बाबत स.सदस्यांवर कार्यवाही व्हावी.

**श्री.शांताराम काळे :** स.सदस्य श्री.केशव सोनवणे यांनी सुचित केल्याप्रमाणे मागील सभेच्या वेळी स.सदस्य श्री.घडामोडे यांचे कायमचे सदस्यत्व रद्द करावे अशी शिवसेना सदस्यांची मागणी होती आणि आज त्यांच्या बाबतीत फार जिव्हाळा व सहानुभुती दाखवितात याचे उत्तर अगोदर त्यांनी द्यावे.

(यावेळी सेना सदस्य एकदम उठून जोराने बोतात काहीही ऐकूयेत नाही)

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्यांनी पक्षाचे नांव घेवू नये आम्ही सिडको हडकोच्या करास विरोध दर्शविला आहे.

**श्री.बंडू प्रधान :** निर्णय लागेपर्यंत स.सदस्यांचे पत्रक सभागृहात वाटप करण्यासाठी परवानगी द्यावी.

**श्री.केशव सोनवणे :** स.सदस्य श्री.घडामोडे बाबत जी प्रशासनामार्फत चुकी झाली त्या बाबत आपण काय कार्यवाही करणार याची माहिती द्यावी.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रथमत विधीसल्लागार यांना खुलासा करू द्यावा.

**मा.महापौर :** विधीसलागारांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागर :** एखादया स.सदस्यांचे जर कायमचे सभासदत्व रद्द करावयाचे असेल तर त्याला १२ प्रमाणे कार्यवाही करता येवु शकते परंतु यामध्ये मागील बैठकिमध्ये सभापतीनी तीन महिन्यासाठी सदस्यत्व निलंबित करण्यात येते असे सुचविले याबाबत स.सदस्य श्री.अलफखान यांचे सुचनेनुसार जो मुद्दा होता तो १२ व १३ चा तो लागु होणार नाही तर कायमचे सददस्यत्व रद्द करावयाचे असेल तर त्या पध्दतीप्रमाणे सदस्यत्व रद्द करता येईल.

**श्री.केशव सोनवणे :** आपण जो निर्णय दिला की स.सदस्यांचे तीन महिन्यासाठीचे सदस्यत्व निलंबित करण्यात येते या बाबतचे इतिवृत्त कायम करणेसाठी गरज असते काय याचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** काही गरज नाही केवळ शिक्षा म्हणुन तसे करण्यात आलेले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** मग मिटींग विभागंनी याबाबत स.सदस्यांना कळविणे आवश्यक होते की आपले सदस्यत्व तीन महिन्यासाठी रद्द केलेले आहे उद्या कुणीही सदस्य उठेल आणि सभागृहाची नासघुस करेल त्यास जबाबदार कोण ? आपण याबाबतीत कोणती कार्यवाही करणार ?

**मा.महापौर :** स.सदस्यावर योग्यती कार्यवाही चालु आहे.

(यावेळी स.सदस्य श्री.घडामोडे यांचा अचानक सभागृहात प्रवेश व हातातली पत्रके सभागृहात भिरकावतात त्यावेळी त्यांच्या मागे सिक्युरिटी गार्ड धावून येतात व पकडून बाहेर नेण्यासाठी घरतात त्यावेळी स.सदस्य श्री.घडामोडे महापौरांचा धिककार असो अशा घोषणा देतात व त्यांना सिक्युरिटी मार्फत बाहेर काढल्या जाते)

**मा.उप-महापौर :** फोटोग्राफरला सभागृहात परवानगी देण्यात येवू नये.

**मा.महापौर :** फोटोग्राफरला सभागृहात येण्याची परवानगी नाही कृपया त्यांनी बाहेर जावे.

**श्री.नरेंद्र पाटील :** मागील बैठकित स.सदस्यांचे तीन महिन्यासाठी सदस्यत्व निलंबित केले होते त्यामुळे आत इतिवृत्त कायम करण्याचा प्रश्नच उदभवत नाही आणि सभागृहात येण्याची काही ळक गरज नाही.

**श्री.अलफखान :** स.सदस्यांना अजंडा वाटप झालेला आहे काय ?

**मा.महापौर :** सदस्य असल्याने वाटप झालेला आहे. कवेळ ३ महिन्यासाठी निलंबित केलेले आहे

**मा.उप-महापौर :** सभागृहात फोटोग्राफरला आपण परवानगी दिलेली नाही.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** फोटोग्राफरला परवानगी दिलेली नसल्यास कॅमेरामधील रोल मागवून द्यावा.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी शांतात राखावी आणि सभागृहात फोटोग्राफरला फोटो काढण्याची परवानगी नसुन त्यांनाही माझी विनंती आहे की मागील वेळेस या बाबत वाद झालेला आहे तेव्हा आता तसे काहीही करू नये नसता कार्यवाही करण्यात येईल.सिक्युरिटींना सुवविण्यात येते की त्यांनी फोटोग्राफर कडील रोल काडून द्यावा व सभागृहा बाहेर जाऱ्यास सांगावे.

**श्री.मुजीबखान :** स.सदस्य श्री.घडामोडे व सुग्रीम रिडलान यांनी सभागृहात जो गोंधळ घातला व सिक्युरिटी स.सदस्याना बाहेर काढून देण्यास मज्जाव केला त्याचे बाबतीत कार्यवाही व्हावी.

**मा.महापौर :** आता विषय क्र.१ ला सुरूवात करावी.

**विषय क्र.१ :** दिनांक २०-१-९२ रोजी तहकुब झालेल्या व दि.३१-१-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.प्रकाश जावळे :** संघटीत कामगारांनी स.सदस्य श्री.प्रदिप दत्त यांच्या घरावरती सामुदायीक हल्ला केला त्याचे निषेधार्थ सभागृहात निषेधाचा प्रस्ताव मंजुर व्हावा अशी मी विनंती करतो.

**श्री.प्रभाकर विधाते :** यास माझे अनुमोदन आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** प्रस्ताव मंजुर करावा.

**मा.महापौर :** ठि आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** पान क्र.२१ वर विषय क्र.७४/११ च्या संवादामध्ये संबंधीत प्रस्तावानुसार बाहेरून पदे भरण्याऐवजी आपल्या महानगरपालिकेतील जेष्ठता यादीनुसार पदे भरण्यास हरकत नाही असे सुचविले परंतु सदरील ठरावामध्ये मा.महापौरांच्या रूलिगमध्ये तसे काहीही दिसुन येत नाही तेव्हा तशी दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे तशी दुरूस्ती करण्यात यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पान क्र.३६ विषय क्र.९७/३४ च्या ठरावातील खालच्या ओळीमध्ये ६० फुट रूंद च्या बाधीत होणारी मिळकत डी.पी.रोडसाठी भुसंपादन करणे असल्याने बाकीची जमीन कब्रस्तानासाठी भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी. अशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** ठिक आहे दुरूस्ती करण्यात यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** इतिवृत्तातील पान क्र.२ मध्ये स.सदस्य श्री.रशीद मामु यांचे वाक्यात नाचुन गाऊन किं दारू पिऊन लाग द्यावा असे शब्द आलेले आहे कृपया अशे शब्द इतिवृत्तातील वगळण्यात यावे.

**श्री.रशीद मामू :** संबंधित वाक्य बोलतांना चुकी झालेली आहे भुल झाली तेव्हा मी उच्चारलेले पुर्ण वाक्य इतिवृत्तातून वगळल्यास योग्य होईल.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे इतिवृत्तातील ते पुर्ण वाक्य वगळण्यात यावे अशी दुरूस्ती करण्यात येते.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** इतिवृत्तातील पान क्र.२९ च्या प्रस्तावात तथा पा.क्र.३० च्या ठरावमध्ये स.क्र.१०६११ असे आहे परंतु त्यामध्ये पुन्हा स.नं.१०६१० व १०६१२ सुध्दा असल्याने तशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** मुळ प्रस्ताव तसे नाही.

**श्री.मुजीब खान :** प्रस्तावात तसे नसल्याने पुन्हा प्रस्ताव ठेवाण्यास हरकत नाही संबंधीत प्रस्ताव आपण वाचुन दाखववावा.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** (प्रस्ताव वाचुन दाखविला परंतु वाचतांता सुधारून म्हणजे स.क्र.१०६१०, १०६११ व १०६१२ असे वाचुन दाखविले) सदरील दुरूस्ती शिट क्र.१९ मधील साईट क्र.३४ मधील खुली जागा मनपा विकास आराखडयात आरक्षित दर्शविण्याप्रमाणे शाळा व खेळाच्या मैदानासाठी उपलब्ध जमीन भुसंपादन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते अशी दुरूस्ती व्हावी.

**श्री.मुजीब खान :** सदरील प्रस्तावातील मुळ प्रस्ताव लक्षात घेता दुरूस्ती करण्यात येवू नये आणि दुरूस्ती ऐवजी प्रस्ताव सुधारून पुन्हा ठेवण्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्य श्री.फत्तेलष्कर यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रस्तावात दुरूस्ती करण्यास हरकत नाही.

**डॉ.चेनकरण संचेती :** साईट क्र.३४ मनपाची आहे ती एक्यीझीशन (तपासणी ) करावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** साईट क्र.३४ मधील सि.स.नं.मध्ये तीन क्रमांक येतात ती दुरूस्ती व्हावी.

**श्री.मुजीब खान :** या प्रस्तावातील साईटची पुर्णवने पाहणी करण्यात यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रस्तावातील ३४ साईट क्रमांकची फक्त दुरूस्ती करण्यात येते. सर्व्हे नंबरची नाही सर्व्हे नंबरची दुरूस्ती करावयाची झाल्यास पुन्हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री.रशीद मामु :** इतिवृत्तातील पा.क्र.२८ मधील विषय क्र.८९ च्या प्रस्तावा संबंधी वगळण्यात आला या ऐवजी स्थगित करून पुढील बैठकित घेऱ्यात येईल अशी दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे विषय क्र.८९ रद्द करण्या ऐवजी स्थगित असुन पुढील बैठकित घेण्यता येईल अशी दुरूस्ती व्हावी.

**श्री.नरेंद्र पाटील :** इतिवृत्तातील पान क्र.१६ मध्ये विषय क्र६८ मधील मालमत्ता कराचे संदर्भात ठरावा मध्ये सिडको-हडको वगळून मंजुर करणे आवश्यक आहे असे असावयास पाहिजे कारण स.सदस्य श्री.घडामोडे यांनी गेल्या दोन बैठकापासून जे चालविलेले आहे ते सर्व याच कारणामुळे आहे आणि मा.महापौर व उप आयुक्त यांनी सुध्दा चर्चेत सांगितलेले आहे की सिडको-हडको वगळून मालमत्ता कर आकारणी करावयाची आहे तेव्हा या ठिकाणी सिडको-हडको वगळून मालमत्ता कराचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारावे अशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील आपणास सुचित करण्यात येते की कोणताही प्रभाग वगळून कर आकारणी करावी असे करता येत नाही उद्याला कुणी म्हणेल की सिल्कमिल कॉलनी वगळावी हे कसे शक्य आहे ?

**श्री.नरेंद्र पाटील :** आजपर्यंत ज्या प्रभागांना (एरियाला) टॅक्स लागलेला नाही व कोणत्याही प्रकारचे प्रयोजल नाही त्यांचे वरती आपण कोणतेही निर्बंध टाकू नये व सिडको-हडको वगळून घेण्यात यावे.

**मा.महापौर :** आपली ही जनरल पॉलीसी आहे त्यामुळे कोणताही प्रभाग वगळण्याचा प्रश्नच उदभवत नाही बजटच्या पुर्वी प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक असतो करिता प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

**श्री.अजिज जहागिरदार :** माझ्या वार्डातील लोकांकडून कोणत्याही प्रकारचा टॅक्स वसुल करण्यात येवू नये.

**श्री.केशव सोनवणे :** मालमत्ता कराच्या संदर्भात स.सदस्य श्री.घडामोडे पाटील आणि शिवसेनेचे सर्व सदस्य जो पाठपुरावा करून सिडको हडकोसाठी लावलेला कर वगळण्यात यावे असे सुचवित आहेत व मागणी करित आहेत त्यामुळे टॅक्स लागलेला आहे किंवा नाही आम्हाला माहिती नाही.

**श्री.नरेंद्र पाटील :** टक्स लावलेला नाही ज्या ठिकाणी विहिरच खोदलेली नाही तिथे पाणी घुसे भरणार सिडको-हडको भागासाठी लावलेला कर वगळण्यात यावा असा स्पष्ठ उल्लेख असावा कारण मनपातर्फे या बाबत नोटीस बजावण्यात येत आहेत याचा अर्थ काय ?

**मा.महापौर :** मी यापुर्वीच सुचित केलेले आहे की ही जनरल पॉलीसी आहे याच्यामधून कोणत्याही भागाचा कर वगळण्याचा प्रश्न येत (नाही) नसुन तो महानगरपालिका हद्दीपर्यंत समाविष्ठ असलेल्यासाठी आहे आणि २० तारखेपर्यंत प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे त्यामुळे सिडको-हडकोचा या ठिकाणी उल्लेखच नाही आपण विनाकारण परेशान होवू नये यापुर्वीच शिवसेना सदस्यांनी याबाबतीत

सभात्याग केलेला आहे आत आपण सर्वांनी शांतता बाळगावी केवळ कुणाला दुरूस्ती वगैरे सुचवायची असुन ती सुचवावी आणि ज्या नोटीस सिडको- हडको वासीयांना देण्यात येत असतील त्या प्रशासकीय लेव्हलवर देण्यात येत आहेत.

**श्री.नरेंद्र पाटील :** आपण आताय कबुल केलेले आहे मा.महापौर त्याप्रमाणे बदलु नये **श्री.प्रदिप जैस्वाल** अन्यथा आमचा विरोध राहील.

**श्री.अजिज जागीरदार :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी सुचित केल्याप्रमाणे सिडको-हडकोसाठी जो टॅक्स लावावयाचा आहे तो वगळण्याचा प्रश्नच उदभवत नाही परंतु त्याचबरोबर ज्या १८ खेडयांचा समावेश मनपामध्ये करण्यात अलेला आहे त्यांना व माझ्या वार्डातील नागरीकांना टॅक्स लावण्यात येवु नये.

**श्री.केशव सोनवणे :** मनपा हद्दीमधये समाविष्ठ झालेल्या त्या १८ खेडयांना टॅक्स लावण्यात आलेला आहे स.सदस्य चुकीची माहिती देत आहेत.

**मा.महापौर :** होय त्या १८ खेडयांना टॅक्स लावण्यात आलेला आहे तदवतच सिडको हडकोसाठी टॅक्सच्या नोटीसा पाठविल्या जात आहेत.

**श्री.अलफखान :** प्रशासनाने या वर्षाचा कर वाढवून देणे बाबत सुचित केलेले आहे तेव्हा त्यावर चर्चा व्हावी. विनाकारण या भागासीं किंवा त्या भागासाठीचा प्रश्नच येत नाही.

**श्री.नरेंद्र पाटील :** मागील एक दोन वर्षापासून सिडको -हडकोच्या नागरिकांना टॅक्स कशा पध्दतीने लावावयाचा याबाबत माजी आयुक्तासोबत वाटाघायी करण्याबाबत चर्चा झाली होती परंतु त्यावर काहीही निर्णय लागलेला नाही जोपर्यंत काही निर्णय होत नाही तो पर्यंत टॅक्स लावण्यात येवु नये आपल्याला हा अधिकार नाही.

**श्री.अजिज जागिरदार :** सिडकोतील बरेचसे नागरीक टॅक्स भरीत आहेत.

**श्री.प्रकाश जावळे :** स.सदस्य श्री.अजिज जागीरदार यांनी सुचित केल्याप्रमाणे सिडको-हडकोतील बरेचसे नागरीक टॅक्स भरीत आहेत या बाबतीतचा पुरावा माझ्याकडे आहे.

**मा.महापौर :** टॅक्स वाढवून देणे बाबतचा प्रस्ताव विचाराधीन आलेला होता त्यावर आपल्याला निर्णय द्यावयाचा होता यामध्ये कोणत्याही भागाचा उल्लेख नसुन पुर्ण शहरासाठी आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सदस्य मी.अजिज जागिरदार हे बेजबाबदारपणे बोलत असुन त्यांना याबाबत कोणतिही माहिती नाही जर सिहको-हडको बाबत आपण काही निर्णय देत नसाल तर मी निषेध म्हणून सभात्याग करतो (वेळ अंदाजे १२.१५ वाजता)

**श्री.केशव सोनवणे :** मा.महापौर आपण सांगा की टॅक्समधुन सिडको-हडको वगळणार किंवा नाही.

**मा.महापौर :** यामध्ये तसा काही उल्लेख नाही पुर्ण शहरासाठी हा लागु आहे.

**श्री.केशव सोनवणे :** तुम्ही नाही म्हणू नका, नसता आम्ही सर्व सदस्य निषेध म्हणुन सभात्याग करतो (वेळ अंदाजे १२.२७ वाजता)

**श्री.अलफखान :** पान क्र.१६ मध्ये मा.महापौर आपल्या वकतव्यात सभाव्याहाच्या समतीने तीन महिन्यासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते असे आहे त्याऐवजी सभासदत्व स्थगित करण्यात येते अशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** ठिक आहे रद्द ऐवजी स्थगित ३ महिन्यासाठी करण्यात येते अशी दुरूस्ती व्हावी.

**श्री.एकबालसिंग गिल :** इतिवृत्तातील पान क्र.५ मधील विषय क्र.६५/२ व विषय क्र.६६ याबाबत बरीच चर्चा झालेली असुन मागील बैठकित दोन्हीही प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेले होते तेव्हा आता संबंधित विषयावर चर्चा न करता मंजूर करण्यात यावा.

**श्री.रशीद मामू :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.मुजीब खान :** सदरील विषय पुढील बैठकित ठेवण्यात यावा आणि जे विषय स्थगित आहेत ते सर्व एकत्रीत ठेवण्यात यावा.

**मा.उप-महापौर :** यापुर्वीची बरेचसे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेले आहेत तेव्हा संबंधित प्रस्तावा बाबत एक विशेष बैठक बोलावुन सदरील प्रस्ताव घेण्यात यावा.

**श्री.म.इस्माईल :** मा.महापौरांचा निर्णय या दोन प्रस्तावावर असा होता की इतिवृत्तातील सर्व विषय संपल्यानंतर शेवटी सदरील विषयावर चर्चा करण्यात येईल. तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा संबंधित विषय स्थगित असल्याने दुसऱ्या बैठकित घेण्यात येईल स्थगित विषय काधिही घेता येवू शकतो.

**श्री.बंडू प्रधान :** संबंधित स्थगिते झालेला प्रस्ताव तीन महिन्यानंतर घेण्यात यावा.

**मा.महापौर :** सदरील विषय स्थगित ठेवण्यात येवून पुढील बैठकित घेता येवू शकतो व इतिवृत्तास मंजुरी देण्यात येते (यावेळी सर्व सभा सदस्यांचा सभागृहात प्रवेश वेळ १२.३० वाजता अंदाजे)

**ठराव :**

(१) इतिवृत्तातील पान क्र.२ मध्ये स.सदस्य श्री.रशीद मामू यांच्या वाक्यातील संपुर्ण वाक्य इतिवृत्तातून वगळण्यात येते.

(२) पान क्र.२१ मध्ये विषय क्र.७४ मधील ठरावामध्ये लघु टंकलेखकाचे पद भरीत असतांना जेष्ठता यादी नुसार पद भरण्यास हरकत नाही. अशी दुरस्ती करण्यात येते.

(३) इतिवृत्तातील पान क्र.३६ मध्ये विषय क्र,९७ मधील ठरावामध्ये खालील ओळीमध्ये सर्व्हे नं.३३ हिमायतनगर क्षेत्र १ हेक्टर ९९ आर कब्रस्तान व ६० फुट रूंद डी.पी. शेडसाठी भुसंपादन करणे असल्याने बाकीची जमीन कब्रस्तानासाठी भुसंपादन करण्यात यावी तसेच ६० फुट डी.पी. रोडकरिता बाधीत होणारी जमीन भूसंपादन करण्यात यावे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

(४) स.सदस्य श्री.नारायण फत्तेलष्कर यांनी सुचित केल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.२९ विषय क्र.९१ मधील साईट क्र,३४ फक्त खुली जागा विकास आराखडयात आरक्षित दर्शविल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यात येते यामधील सर्व्हे नंबर मध्ये कोणतीही दुरूस्ती नाही.

(५) इतिवृत्तातील पान क्र.२८ मध्ये विषय क्र.८९ चे सुचक नसल्याने प्रस्ताव वगळण्यात आला या ऐवजी स्थगित ठेवण्यात यावा अशी दुरूस्ती करण्यात येते.

(६) पान क्र.१६ मध्ये स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांचे सभासदत्व तीन महिन्यासाठी रद्द करण्यात येते असे आहे त्याऐवजी तीन महिन्यासाठी स्थगित करण्यात येते व विषय क्र,१ दिनांक २०-१-९२ रोजी तहकुब झालेल्या व दिनांक

३१-१-९२ रोजी संपन्न झालेल्या इर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमाकं २ :** स्थायी समीतीसभा दि.२४-१-९२ ठराव क्र.३०४ अन्वये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी सन ९१-९२ या वर्षात ज्या दराणे जकात कर वसुली करण्यात येते होतर त्याच दराने सन ९२-९३ या वर्षात जकात कर वसुल करण्यात सर्वानुमते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी सन ९१-९२ या वर्षात ज्या दराने जकात कराची वसुली करण्यात येत होती त्याच दराने सन ९२-९३ या वर्षात जकात कर वसुल करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३:** प्रस्ताव सादर करण्यात येते की शासन अधिसुचना क्र.एईओ ११९१/१०६-९१/दहा दिनांक २८/११/९१ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई अन्वये श्री.जी.एम.गारे यांची आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद मह्णून नियुक्ती झाली आहे व ते दिनांक ११-११-९१ रोजी मध्यान्हानंतर आयुक्त पदावर रूजु झाले आहेत.
करिता श्री.जी.एम.गारे यांच्या दि.११-११-९१ पासुन झालेली नियुक्ती सर्वसाधारण सभेस माहितीस्तव व निर्णयास्तव सादर.

**संवाद**

**श्री.अजिजुल्ला बेग :** सदरील प्रस्तावामध्ये मा.आयुक्ताचा कालाधवी किती राहील याचा उल्लेख नाही.

**मा.महापौर :** शासनाने नियुकती केलेली असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.२८-११-९१ अन्वये मा.आयुक्तांची नियुक्ती झ ाालेली आहे व ते दि.११-११-९१ रोजी मध्यान्हानंतर आयुक्त पदावर रूजु झाले आहेत म्हणजे शासनाच्या आदेशाचे १६ दिवस पुर्वीच कसे ?

**सचिव :** शासनाचे आदेश दि.२८-११-९१ चे आहेत व दि.११-११-९१ ला कामावर रूज झाल्याची आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** रूजु झाल्याची तारीख आदेशाच्या पुर्वी कशी ?

**श्री.महादेव सुर्यवंशी :** शासनाच्या आदेशाची तारीख दि.२८-१०-९१ अशाी आहे ती दुरूस्ती व्हावी व प्रस्ताव मंजुरी देण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन अधिसुचना क्र.एईओ-११९१/१०६/९१ दहा दि.२८-१०-९१ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई अन्वये श्री.जी.एम.गारे यांनी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद म्हणून नियुक्ती झाली आहे व ते दि.११-११-९१ रोजी मध्यान्ह नंतर आयुक्त पदावर रूजु झाले आहेत करिता श्री.जी.एम.गारे यांनी दिनांक ११-११-९१ पासुन आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद या पदावर झालेल्या नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन आदेश क्र.पीओजी/११९१/२१४/(४)/सेवा-१ मंत्रालय मुबंई दि.२८-१०-९१ अन्वये श्री.के.जी.पाटील यांची महानगरपालिके मध्ये शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे त्या नुसार श्री.के.जी.पाटील हे दि.९-१-९२ रोजी मध्यान्ह पुर्व शहर अभियंता या पदावर रूजु झाले आहेत.

करिता श्री.के.जी.पाटील यांच्या शहर अभियंता या पदावरील दि.९-१-९२ पासुन प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मान्यता देण्या करिता प्रस्ताव मान्येस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.अजिजुल्ला बेग :** या प्रस्तावामध्ये शासनाच्या सेवा व अटीची पुर्ततेची प्रत जोडलेली नाही.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शशसन आदेश क्र,पीओजी-११९१/२१४/(४)/सेवा-१, मंत्रालय मुंबई दि.२८-१०-९१ अन्वये श्री.के.जी.पाटील यांची महानगरपालिका औरंगाबाद येथे शहर अभियंता पदावर प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री.के.जी.पाटील हे दि.९-१-९२ रोजी मध्यान्हापुर्व शहर अभियंता या पदावर रूजु झाले आहेत करिता श्री.के.जी.पाटील यांच्या शहर अभियंता या पदावरील दि.९-१-९२ पासुन प्रतिनियुक्तीच्या कालावधीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की चिकलठाणा येथील विभागीय कार्यालया शेजारील इमारत पाडून पुन्हा नविन बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन१९९१-९२ च्या दरसुचीनुसार २ रूपये ५,५१,२३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे सदरचा खर्च सन १९९२-९३च्या अर्थ संकलपातून इतर ईमारती व उर्वरीत कामे या सदरातून करण्यात येईल. अंदाज पत्रक प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** सदरील ईमारत ही चिकलठाणा येथील झोन क्र.५ ची आहे त्या झोनचे कार्यालय ज्या ठिकाणी आहे त्याच्या बाजुला पोस्ट ऑफिस आणि बँक अशी ईमारत आपल्या मालकिची असुन ती जुनी झालेली आहे ती पाडून नवीन बांधकाम करावयाचे आहे त्याबाबतचे संबंधित प्रस्तावाचे अंदाजपत्रक आहे.

**मा.महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जो चिकलठाणा येथील विभागीय कार्यालय शेजारील ईमारत पाडून पुन्हा नविन बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुचिनुसार रक्कम रूपये ५,५१,२३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पातून इतर ईमारती व उर्वरीत कामे या सदरातुन खर्च करण्यास व सदरील अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६ :** न.भु.क्र.२९२९/१, २९२४/२, २९३०/११, २९३०/१२ ही जागा नागेश्वरवाडी येथील रेखांकना (ले आऊट) मधील मोकळी जागा असुन त्याचे पी.आर.कार्ड महानगरपालिकेच्या नांवे आहे सदरील पी.आर.कार्डाप्रमाणे वरील जागेचे क्षेत्रफळ १५४४.७ इतके आहे.

वरील जागेवर महानगरपालिकेतर्फे संरक्षित भिंत बांधण्याचे काम सुरू केले असता श्री.विजयेंद्र काबरा यांनी दा.क्र.१०८६/९० दाखल करून मनाई हूकूम घेतला होता त्यामुळे संरक्षित भिंत उभारणीचे काम अपुर्ण ठेवावे लागाले नंतर मा.कोर्टाने दोन्ही बाजु एकून दि.१४-६-९१ ला मनाई हुकूम रद्द केला तथापी मालकी हक्काचा वाद न्यायालयात पडून आहे वरील आदेशाच्या विरूध्द वादीने जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले आहे.

श्री.विजयेंद्र काब्रा यांनी दि.११-१२-९१ रोजी पत्रदेवून विनंती केलेली आहे की वरील न.भु.क्र. मधील जागेवर महानगरपालिका जे लहान मुलांसाठी बाल उद्यान विकसित करीत आहे त्या श्रीमती राजुंवर काब्रा बाल उद्यान असे नांव द्यावे सदरील बाल उद्यानाच्या विकासाठी ते महानगरपालिकेला २५०००/- रूपये देणगी देणेस तयार आहेत तसेच ते पंधरा दिवसाचे आत कोर्टातून दावा काढून घेण्यास तयार आहे करिता वरील जागेवर महानगरपालिकेतर्फे तयार होणाऱ्या बालउद्यानास वरील अटीवर श्रीमती राजकुंवर काब्रा उद्यान असे नांव देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

(यावेळी स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांचा सभागृहात प्रवेश अंदाजे वेळ १२.४० वाजता)

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** या प्रस्तावा मध्ये संबंधित उद्यानास रूपये २५/- हजार देवुन नांव दयावे असे आहे तर हे कोणत्या नियमात बसते याचा खुलासा व्हावा .म्हणजे कुणीही पैसे दयावे आणि नांव लावुन घ्यावे याला नियम वगैरे आहे किंवा नाही ?

**श्री.नरेंद्र पाटील :** सध्या मनपामध्ये या प्रस्तावा संबंधात बोली चालु आहे बोली चालणे योग्य आहे काय ?

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील आपण कृपया खाली बसावे ज्यांचे नांव संबंधित उद्यानास द्यावयाचे आहे त्या जुन्या सभागृहाच्या सदस्या आहेत आपल्याला वैयक्तिक काय बोलयाचे ते बोलावे याची आपण नोंद घ्यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या ठिकाणी कोर्टातून केस काढून घेतो व मग आमचे नांव द्यावे हा मुद्दा योग्य नसुन एक प्रकारची दादागिरी होय सध्या कोर्ट प्रकरण चालु असल्याने कोर्टा तर्फे ज्यावेळी निकाल लागेल त्यानंतर योग्य कार्यवाही व्हावी उद्या कुनीही उठावे आणि माझ्या वडीलाचे नांव द्या असे म्हणावे ते योग्य नाही.

**श्री.अजिज जागिरदार :** प्रस्तावात मालकी हक्काचा वाद न्यायालयात पडून असल्याचे म्हटलेले आहे. मग हा वाद कोणत्या कारणासाठी व कुणाचा मालकीसाठी आहे जर सदरील न्याप्रकरणात मनपाची मालकी असुनही ती केस मनपा हरणार असेल तर श्री.विजयेंद्र काब्रा यांचे कडून पैसे घेवुन संबंधित उद्यानास नाव देण्यास हरकत नाही परंतु यासंबंधिचा वाद असल्याने कुनाच्या मालकिची जागा आहे याबाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**श्री.अलफखान :** श्रीमती काब्रा या जुन्या सदस्या असुन या प्रस्तावातील जागेबाबत ले-आऊटचा न.भु.क्र. चुकीने पडलेला असल्याने बदल झाला तेथील काही जागा मनपाची खुली जागा असुन त्या न.भु.क्र.च्या बदलाने श्री.क्राबरा यांनी कोर्ट प्रकरण केले व आता ते स्वतः मिटविण्यास तयार असुन त्या खुल्या जागेवर मनपाचे उद्यान करून त्या उद्यानास संबंधित नांव देण्यास काहीच हरकत नसुन रूपये २५ हजार मनपास देणगी मिळत आहेत त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी म्हणज सगळा वाद संपुष्टात येईल.

**सौ.लता दलाल :** स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचविल्याप्रमाणे पुर्विचा काही घोळ होता सदरील जागा माझ्या वार्डातील कक्षेत येत असल्याने मी त्या बाबत विचारणा केली आणि त्या जागेचे न.भु.क्र. प्रमाणे सिटी सर्व्हे कार्यालयातुन नामकरण करवून घेतले नंतर मनपाने त्या जागेवर रूपये दिड लाखाचे वॉल कॉम्पाऊंड बांधण्याचे काम हाती घेतले तेंव्हा संबंधितीनी कोर्टातून स्टे आणला आणि उच्च न्यायालयात या बाबत अपील केले त्यावेळी मी स्वतःनगर सेविका या नात्याने त्यांचे जवळ गेले व काही समेट घडवून आपणा अशी चर्चा माजी आयुक्ता समवेत केली तेंव्हा श्री.काबरा यांनी संगितले की सदरील बालउद्यान तयार करून त्यास माझ्या सासुबाईचे नांव देण्याची माझी इच होती परंतु माझी पत्नी स्वतः समाजसेविका होती व माजी नगरसेविका असल्याने त्यांचे नांव बालउद्यानास द्यावे व सदरील बालउद्योनासाठी लागणाऱ्या खेळणीसाठी रूपये २५ हजाराची मदत म्हणून मी देण्यास त्या आहे त्यांनी सुचित केले यामध्ये माझ्या वैयक्तिक कोणताही इंट्रेस्ट नसुन कृपया कुणीही गैरसमज करून घेऊ नये आणि स.सदस्यांना माझी विनंती आहे की, मनपाचा आर्थिक खर्च न करता इतरांकडून मनपास आर्थिक लाभ कसा होईल याकडे लक्ष दिलयास अधिक चांगले होईल.

**श्री.विठ्ठल पेरकर :** सदरील जागे संदर्भात मनपा श्री.विजयेंद्र काबरा बरोबर कोर्टात केस हारणार काय याचा खुलासा करावा. कारण मालकी हक्काचा प्रश्न असल्याने प्रस्ताव मंजुर करता येणार नाही रूपये २५ हजाराने आपण करप्शन करता काय यासाठी त्या मालकी हक्कावर कोर्टात निकाल लागणार असुन विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**श्री.सुदाम वाघमारे :** विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** श्री.विजयेंद्र काबरा यांच्या जमिनिचा ले-आउट १९५६ मध्ये मंजुर झालेला होता आणि त्यानंतर १९६३ मध्ये निवाईज ले-आऊट मंजुर झालेला आहे त्यावेळेला ले-आऊट प्रमाणे जी ओपन स्पेश ठेवलेली होती ती त्या विभागाच्या लोकांचा सुविधा पुरविणेसाठी ठेवलेली होती तथापी १९८६ मध्ये मनपाने एक नोटीफिकेशन काढले आणि त्यात नमुद केले की संस्थे मधल्या ज्या ज्या ओपण स्पेसेस आहेत त्याच्या बाबतीत कुणीही कुणाला आब्जेकशन असल्याचे तक्रारी करावीत अन्यथा त्या जागा मनपाच्या नांवे करण्यात येतील त्या पध्दतीप्रमाणे या जागेचे पी.आर.कार्ड आज महानगरपालीकेच्या नांवे आहे त्यानंतर मनपातर्फे सदरील जागा संरक्षित करण्यासाठी कंपाऊंडवाल बांधकामाचे काम हाती घेतले आहे कपाऊंडवालचे काम हाती घेतलेले असले तरी कोर्टात जावून स्टे दाखल

केला आणि त्या जागेबाबत मनपाची जागा होवु शकणार नाही कारण ती जागा त्या भागातील रहिवाशानसाठी उपयोगातील असल्याने ती जागा त्यांची होणार नाही आणि मनपाच्या नांवे पी.आर कार्ड केलेले आहे ते रद्द करावे असा त्यांनी दावा दाखल केला आपल्या विरूध्द अपील दाखल केले ते पडून आहे पी.आर.कार्डच्या बेसिसवर न्यायालयाने हा मनाई हुकूम रद्द केला आणि तो आपल्या बाजुने आहे त्यानंतर त्यांनी जिल्हा न्यालयात अपील केलेले आहे आणि अपील प्रलंबित आहे त्याचा निर्णय काय येईल त मला आज सांगता येणार नाही प्रस्तावाच्या संदर्भात संबंधितांनी जो अर्ज दिलेला आहे त्या बाबत सभागृहानी निर्णय घ्यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्तावास आमचा विरोध नाही परंतु प्रस्ताव लक्षात घेता त्यामध्ये असे कुठेच नाही की त्यांनी विनंती केली.

**मा.महापौर :** श्री.काबरा यांनी दिलेले निवेदन आहे आणि स.सदस्या सौ.लता दलाल यांनी केलेला खुलासा आपण ऐकला नाही वाटते.

**श्री.शांताराम काळे :** श्री.विजयेद्र काबरा यांनी विनंती केलेली नसेल तर तसे पत्र घेऊन या बाबतचा वाद मिटवावा.

**श्री.स.हुसैन स.अहमद :** मुख्य कार्यालयाकडून झोन कार्यालयांना एक नोंद पाठवित जावे जेणे करून कुणी कोणत्या प्रकारचे नळ कनेक्शन घेतलेले आहे याची नोंद झोनमध्ये राहू शकेल. अन्यथा झोनमध्ये ३/४ वर्षापासुनच्या नोंदी दिसत नाही.

**श्री.विठ्ठल पेरकर :** मालकी हक्काचा वाद असुन प्रकरण कोर्टात असल्याने याबाबत आमचा विरोध आहे प्रस्ताव मंजुर करू नये.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** लोकांचा कायदेशीर प्रश्न असुन पैसे देवुन नाव देण्यात येवू नये.

**मा.महापौर :** आताच खुलासा केल्याप्रमाणे स.सदस्य श्री.विठ्ठल पेरकर यांनी सुचित करण्यात येते की, श्रीमती काबरा या एक सदस्या होत्या त्यांनी बराच काळ समाजसेवा केली आणि या प्रस्तावा संदर्भात तशी कोर्टातून केस काढून घेण्यात येणा असुन तशी चर्चा झालेली आहे आणि रूपये २५ हजार या बालउद्यानास देणगी म्हणून देण्यास तयार आहेत यामध्ये आता वाद नसुन प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री.बंडूप्रधान :** शहरातील बऱ्याचश ओपन स्पेस आहेत त्यांचे पी.आर.कार्ड उद्यापही तयार झ ालेले नाहीत.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** एखादयाने रूपये २६०००/- दयावयास तयार झाल्यास आपण त्यांना सदरील बालउद्यानास नांव देण्यास विचार कराल काय ?

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजुर झालेला आहे. अता चार्च करण्यात येवू नये संबंधित जमीन त्यांचे ताब्यात असल्याने आपल्याला ते करवून घ्यावयाचे आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र. २९२९/१. २९२४/२, २९३०/११, २९३०/१२ ही जागा नागेश्वरवाडी येथील रेखांकना (ले-आऊट) मधील मोकळी जागा असुन त्यांचे पी.आर.कार्ड मनपाच्या नांवे आहे व सदरील पी.आर.कार्ड प्रमाणे वरील जागेचे क्षेत्रफळ १५४४.७ इतके आहे. या जागेवर सरक्षित भिंत बांधण्याच्या कामास मनाई हूकूम होता नंतर कोर्टाने दोन्ही वाजु ऐकूण घेवून दि.१४-६-९१ ला मनाई हुकूम रद्द केला तथापी मालकी हक्कात वाद न्यायालयात पडुन आहे. श्री.विजयेंद्र काबरा यांनी दि.११-१२-९२ रोजी पत्रदेवून विनंती केली की त्यानसुार वरील न.भु.क्र.मधील जागेवर मनपा लहान मुलांना जे बालउद्यान विकसीत करीत आहे त्यास श्रीमती

राजकुंवर काबरा बाल उद्यान असे नांव द्यावे व या बालउद्यानाच्या विकासासाठी मनपाला रूपये २५०००/- हजार देणगी देण्यास तयार आहेत तेव्हा पंधरा दिवसाचे आत कोर्टातून दावा काढून घेण्याच्या अटीवर श्रीमती राजकुंवर काबरा बाल उद्यान असे नमाकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यास येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७ :** महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळाच्या वाळुज येथील औद्योगीक वसाहतीत अग्निशमन केंद्र फायर ट्रेडर्स व कर्मचाऱ्यांनी निवासस्थाने तयार आहेत तरंतु कर्मचाऱ्यांच्या बभावामुळे ते केंद्र कार्यान्वीत होवू शकलो नाही. सदरील अग्नीशमन केंद्र चालु करण्याबाबत विभागीय आयुक्त जिल्हाधिकार औरंगाबाद व मुख्य कार्यकारी अभियंता म.औ.वि.महामंडळ यांचे सुचनेनसुार वाळुज येथील औद्योगीक वसाहतीतील अग्निशमन केंद्र औरंगाबाद महानगरपालिकेने चालवावे या करिता वेळोवेळी लागणारा संपुर्ण खर्च म.औ.वि.महामंडळ देण्यात तयार आहे असे सुचविले त्या अनुषंगाने महानगरपालिका औरंगाबाद तर्फे रक्कम रूपये ६.८० लाखाच्या खर्चाचे अंदाजपत्रक म.औ.वि.महामंडळास दिलेले आहे . यापुर्वी वाळूज औद्योगीक वसाहतीस अग्निशमन सेवा मनपा औरंगाबाद तर्फे पुरविल्या जात आहे.

तसेच वाळूज येथील अग्शिमन केंद्रासाठी लागणारा आवश्यक तो सर्व कर्मचारी वर्ग भरण्यासाठी त्या त्या कर्मचाऱ्यांची पदे निमार्ण करून त्या पदावर पात्र उमेदवारांच्या नेमणूका करण्यात खालील दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यात यावी.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वेतन श्रेणी** | **पदाची संख्या** |
|---|---|---|---|
| १) | स्टेशन ऑफिसर | १४०० ते २३०० | एक |
| २) | सब ऑफिसर | १२०० ते १८०० | चार |
| ३) | प्रमुख अग्शिमन | ९५० ते १४०० | चार |
| ४) | अग्निशमन | ८२५ ते १२०० | पंधरा |
| ५) | ड्रायव्हर ऑपरेटर | ९५० ते १४०० | चार |
| ६) | टेलिफोन ऑपरेटर | ९५० ते १४०० | चार |

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.चंक्रकांत खैरे :** संबंधित प्रस्तावातील कर्मचारी वर्गाचे पगार व भत्ते तसेच मनपाला लागणारा एकदरीत सर्व्हीस चार्जेसचा खर्च कोण करणार याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** याबाबत मला माहिती आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या वाळुज येथील औद्योगीक वसाहतीत अग्निशमन केंद्र मनपाने चालविण्यास ताब्यात घेतल्यास वेळवेळी लागणारा खर्च व कर्मचाऱ्यांच्या पगारासहीत संबंधित मंडळाने देण्यास तयारी दर्शविलेली असल्याने आपण घेऱ्यास तयार झालो आणि आपली नैतिक जबाबदारी म्हणून सेवा करण्याची संधी आपल्याला प्राप्त झाली आहे बाकीचा संपुर्ण लागणारा खर्च ते स्वत: करणार आहेत असे पत्रातही नमुद केलेले आहे आणि त्याही पलिकडे जर आपल्याला माहिती जास्त पाहिजे असल्या अतिरिक्त शहर अभियंता हे स्पष्ट करतील.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संबंधित बाबतीत पदे भरीत असतांना योग्य ती पडताळणी करणे आवश्यक आहे कारण मागील वेळेस माझ्या माहितीप्रमाणे एक लातूर येतील कर्मचाऱ्यास या अग्निशमन दलामध्ये नौकरीत सामावून घेण्यात आले आणि त्यापुर्वी बऱ्याचशा उमेदवारांनी त्याच पदासाठी अर्ज करूनही त्याचे अनुभव लक्षात न घेता मुलाखतीस बोलविण्यात आले नाही तेवहा यावेळेस ज्या उमेदवारांना संबंधित पदासाठी अर्ज केलेले असतील त्यांनाही प्राधान्याने बोलवाने अशी ठरावा मध्ये नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे तशी नोंद घेण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळशच्या वाळुज येथील औद्योगिक वसाहतीतील अग्निशमक केंद्र औरंगाबाद महानगरपालिकेने चालवावे या करिता वेळोवेळी लागणारा संपुर्ण खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ देण्यास तयार आहे त्या अनुषंगाने रूपये ६.८० लाखाच्या खर्चाच अंदाजपत्रक संबंधित महामंडळशस दिलेले आहे या वाळूज येथील अग्निशमन केंद्रासाठी लागणारा आवश्यक तो कर्मचारी वर्ग भरण्यासाठी त्या त्या कर्मचाऱ्यांची पात्र उमेदवारांच्या नेमणूका करीता असतांना ज्या उमेदवारांनी संबंधित पदासाठी अर्ज कार्यालयात दाखल केलेले असतील त्यांनाही मुलाखतीस प्राधान्याने बोलवावे आणि खालील दर्शविल्याप्रमाणे पदास व वेतन श्रेणीस आस्थापनेने कार्यवाही करण्यास

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वेतन श्रेणी** | **पदाची संख्या** |
|---|---|---|---|
| १) | स्टेशन ऑफिसर | १४०० ते २३०० | एक |
| २) | सब ऑफिसर | १२०० ते १८०० | चार |
| ३) | प्रमुख अग्शिमन | ९५० ते १४०० | चार |
| ४) | अग्निशमन | ८२५ ते १२०० | पंधरा |
| ५) | ड्रायव्हर ऑपरेटर | ९५० ते १४०० | चार |
| ६) | टेलिफोन ऑपरेटर | ९५० ते १४०० | चार |

सर्वानुमने मंजुरी देण्यात घेते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्रमांक ८ :** सन १९९० मध्ये जे मालमत्ता करा बाबत रिव्हीजन चालु होते ते रद्द करण्यात आले कारण की जो पर्यंत करयोग्य मुलयामध्ये बदल होत नाही तो पर्यंत त्या घराचा अथवा मकानाचे भाडयामध्ये वाढ होत नाही या मध्ये ज्या मालमत्ताधारकांनी आक्षेप घेतले व त्यांचे आक्षेपावर महापालिकेने सुनावणी करून सामान्य कराबाबत चिवार केला पण ज्या घरमालकांनी आपला अर्ज वाढलेले करयोग्य मुक्त व ज्यांचे घरात कोणत्याही प्रकारचा फेरबद्दल दुरूस्ती केली नाही ते तसेच राहिले त्यासाठी त्यांना ठराविक मुदत आक्षेप नोंदविण्यासाठी देण्यात यावी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.अलफखाँ हुसैनखाँ

अनुमोदक : श्री.अजिज जहागिरदार
श्री. हाजी हाफिजोद्दीन
दिनांक : १७-१-९२

**संवाद :**

**श्री.अलफखान :** संबंधित प्रस्तावानुसार मला असे सांगावयाचे आहे की, मालमत्ता कराच्या बाबतीत मनपाने फार चुका केलेल्या आहेत ज्यामुळे नागरीकांना याचा फटका बसतो सन १९८१-८२ वर्षाच्या काळामध्ये कर कसे आकारले होते त्यावेळेसची एन.आर.व्ही.काय होती आणि त्यावेळी किती घरे होती आतील किती घरे नव्याने असतील त्या सर्वांची कर आकराणी करतांना एन.आर.व्ही.कसी लावतो याची योजनाच करणे आवश्यक आहे कारण आज शहरात ज्या नोटीस नागरिकांना दिलेल्या आहेत त्यामुळे कोणत्या एन.आर.व्ही.च्या आधारे कर आकारला याचा बोध होत नाही. त्यामुळे नागरीक परेशन आहेत. याबाबत आमचे म्हणने असे आहे की सन १९८१-८२ च्या वर्षाप्रमाणे एन.आर.व्ही मध्ये काही बद्दल झाले काय ? याची पाहणी करावी शिवाय कार्यालयातील कर आकारणी विभागात एक रजिस्ट आहे ते आणि संबंधित झोनमधील कर आकारणीचे रजिस्ट या दोहांची पडताळणी करावी आणि नव्याने काय बद्दल झालेला आहे त्याची पाहणी करावी जर बद्दल झालेला असल्यास योग्य त्या दुरूस्त्या कराव्या परंतु बद्दल झालेला नाही घरे तेच एन.आर.व्ही.तीच आणि कर मात्र जास्त हे कसे काय ? यासाठी मनपाचे या बाबत चुकी झालेली असल्याने जोपर्यंत करयोग्य मुल्यामध्ये बदल होत नाही तो पर्यंत त्या घराच्या भाडयामध्ये वाढ होता कामा नये.

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्रस्तावात योग्य नसुन यामध्ये थोडाकर बदल करण्यात यावा सन १९९० मध्ये मालमत्ता कराबाबतचे रिव्हीजन चालु होते ते तसे नसुन सन १९८७ मध्ये चालु होते व दि.१-४-८९ पासुन त्याची सुरूवात झाली स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणष ज्यावेळे पासुन हे रिव्हीजन चालु झाले त्यावेळेसचे संबंधित झोन कार्यालयातील समरी रजिस्टर व मुक्य कार्यालयातील रजिस्टर व ही दोन्ही रजिस्टर एकत्र करून त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे आणि जर त्यामध्ये काही बदल झाले नाही असे दिसुन आल्यास किंवा काही फेरबद्दल व दुरूस्ती झालेली असल्यास त्या रजिस्टर मध्ये नोंद घेवून पुढील कार्यवाही करणे आवश्यक होईल ज्यामुळे सध्या नागरिकांना ्या नोटीसा दिल्या आहेत त्यामुळे बऱ्याच नागरिकांना काहीही समजत नाही यासाठी प्रशासनाने याबाबत खुलासा करणे महत्वाचे ठरते.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** स.सदस्य श्री.अजिजल्ला बेग यांनी सुचविल्याप्रमाणे मला असे म्हणारयाचे आहे की, मनपा अधिनियमाचे चॅप्टर ८ च्या १५ अन्वये संबंधित मालमत्ता धारकांसाठी एक नोटीफीकेशन काढून १५ दिवसाचे आत आपणआपले आक्षेप देण्याबाबत सुचविले होते परंतु काहीही झालेले नाही त्याला जबाबदार आपण आहेत काय ?

**श्री.अलफखान :** यामध्ये मला असे सुचवाण्याचे आहे की चुका मनपाच्या झालेल्या आहेत त्या आपण दुरूस्त करावयास पाहिजे कारण आपण प्रत्येक्षात जावून एन.आर.व्ही

मध्ये काही बदल झालेला आहे काय ? याची पडताळणीच केलेली नाही आणि ज्या ठिकाणी ५० लावावयास पाहिजे त्या ठिकाणी ८० लावले. हे जे आहे ते कोणत्या आधारे आपण लावले याचा हिशोब असणे आवश्यक आहे मला नियमावलीतील २० काय आहे. किंवा १५ काय आहे ते सर्व माहिती आहे परंतु बदल काय झाला याची माहिती द्यावी व यासाठी दुरूस्ती करण्यासाठी जी चुकी मनपाने केली त्याबाबत आपण कार्यवाही करावी.

**श्री.स.अहमद स.रफत :** स.सदस्य श्री.प्रदिप जैस्वाल यांनी सुचविल्याप्रमाणे १५ दिवसाचे आत आक्षेपाबाबत नोटीस दिल्या परंतु माझ्या माहिती प्रमाणे असे आहे की ७५ टक्के लोकांना नोटीस मिळालेल्या नाहीत व त्यांना टॅक्स भरावे किंवा नाही याची कल्पना नाही फक्त काही मंडळी संबंधित नगरसेवक व अधिकारी वर्गांना हाताशी धरून टॅक्स बाबतची कार्यवाही पुर्ण करित असतात बाकी सर्वसमान्यांना मुळीच कल्पना नाही यासाठी सन १९८१ ची जी एनआरव्ही आहे जी घरे आहेत ती ३-४ वर्षा पासुनची नविन तयार केलेली आहेत ती परवानगी घेवून परंतु त्यांनाही अद्याप टॅक्स लावलेला नाही तेव्हा अशा घराबाबत लावकरात लवकर टॅक्स लावून घ्यावा जेणे करन मनपाचा आर्थिक फायदा होईल.

**श्री.अशोक सायन्ना :** जरी नागरीकांच्या चुका होत असल्या तरी आपण सांभाळून घेतले पाहिजे. आपण जनतेच्या कामासाठी निवडून आलेलो आहोत तेव्हा सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :** शहरातील नागरीकांना टॅक्स कमी जास्त असल्यास त्यांचे बाबतीस काही चुका झ ाालेल्या निदर्शनास आल्यास त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.शांताराम काळे :** टॅक्स बाबत बऱ्याच स.सदस्यांनी चर्चा केली आणि यामध्ये चुका झाल्याचे सुचित केले तरंतु मला म्हणावयाचे आहे की त्यात चुका झाल्या की जाणून बुजुन चुका करण्यात आल्या याचा शोध अगोदर घ्यावा. कारण त्या चुकामुळे सर्वसामान्य जनता भरडली जात आहे.

**श्री.म.ईस्माईल :** टॅक्सचा प्रश्न आहे या पुर्वी मा.आयुक्ता बरोबर चर्चा झालेली आहे ज्या घरांच्या एनआरव्ही मध्ये कोणताही बदल झालेला नाही त्यांनाही बदल म्हणून नविन कर आकारणी करण्यात आलेली आहे. आणि मा.आयुक्तांनी या बाबतीत सुचित केले होते की आक्षेप ज्यावेळी घेण्यात येईल त्यावेळी योग्य ती मुल्यावर आधारीत कर आकारणी केली जाईल परंतु आजही सर्वसामान्य नागरीकांना याबाबत काहीच कल्पना नाही नागरीक फक्त आमच्या सारख्या नगरसेवकांकडे बार बार चकरा माऊन कामे करून घेतात परंतु जे शहरातील गरीब व अडाणी व्यक्ती आहे त्यांच्या त्याबाबीत काम आहे त्यानंतर काहीच समजत नाही ते लोक परेशान आहेत यासाठी सबंधीत प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक असुन ज्यामुळे जे राहिलेले असतील त्या सर्वांना याचा फायदा होईल.

**श्री.मुजिब खान :** टॅक्सच्या संदर्भात मी गेल्या दिड वर्षापासुन आजम कॉलनी, करीम कॉलनी, मुजिब कॉलनी, गणेश कॉलनी, रशीद पुरा, नुर कॉलनी, आलमगीर कॉलनी येथील घरांना टॅक्स लावणे बाबत लेखी लिहून दिलेले असुनही अद्यापही काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही यासाठी विशेष एका अधिकाऱ्याची

नियुक्ती करण्यात यावी आणि संबंधित विभागामध्ये फाईल दाखल करून ही त्या वेळेवर मिळत नाही.

**श्री.अजिज जहागिरदार :** सबंधित प्रस्ताव मंजूर करून १० मार्च पर्यंत मुदत द्यावी.

**श्री.अलफ खान :** स न१९८१ च्या प्रमाणे एनआरव्ही मध्ये काही बदल असल्यास तशी दुरूस्ती करावी कार्यालयातील डिमांड रजिस्टर व झोन मधील रजिस्टर या मध्ये तपासणी करून त्या रजिस्टर मध्ये घरांच्या एनआरव्ही मध्ये बदल झालेला आहे काय याची दुरूस्ती पाहून तेथेच करायला पाहिजे आणि झालेली नसल्यास प्रत्यक्षात जावून बदल झालेल्या असल्याची कर आकारणी केल्यास आमची काहीही तक्रार नाही परंतु जुन्या कर योग्य मुल्यावर आधारीत पाहणे आवश्यक आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे सन १९८१ची एन.आर.व्ही.बदल लेखी नाही तर माझ्या वार्डामध्ये अशी परिस्थिती आहे की आणि जे सध्या १८ खेडी नव्याने समाविष्ट झालेले आहेत तेथेही सन १९१च्या वेळेस चार रूम्स होत्या आता त्या ठिकाणी केवळ एकच रूम आहे आणि तेथील बांधकाम हे कच्च्या मतीचे आहे तेव्हा एन.आर.व्ही मध्ये बदल झालेला असुन घराचे बांधकामावर सुधारीत कर आकारणी करून कर आकाणी करण्यात यावी व प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.अजिजुल्ला बेग :** एन.आर.व्ही मध्ये काही बदल झालेला नसल्यास शहरातील नागरीकास एक नोटीस पंधरा दिवसाचे आत पाठवुन कळविण्याचे आदेश द्यावेत.

**श्री.नरेंद्र पाटील :** संबंधित प्रस्ताव मंजुर करावा यास कुनाचेही दुमत नाही परंतु शहरातील औद्योगिक परिसराचा सर्वात जास्त टॅक्स या ठिकाणी वसुल होतो या बाबत मला एक सांगावयाचे आहे की औद्योगित परिसराच्या ठिकाणी समजा एकाच साईजचे २० शेड बांधलेले आहेत परंतु त्या २० शेड पॅकी १९ शेडला वेगळे टॅक्स आणि एकाला वेगळा टॅक्स कसा आकरला जाते याचीही बाजु आपण तपासणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** प्रशासनाने खुलासा करावा.

**मा.उप-आयुक्त :** संबंधित प्रस्ताव जो आलेला आहे तो वास्तविक पाहता त्याचवेळी आला असता तर थोडासा वेळ देता आला असता परंतु आता परिस्थिती अशी आहे की आपण जवळपास सर्व हिअरींग संपविलेली आहे फक्त ४ ते ५ % माझ्या माहिती प्रमाणे आक्षेप राहिलेले आहेत बाकी सर्व झालेले आहे आणि संबंधित झ ोनला रजिस्टर पाठवून देण्यात आलेले असुन माहे मार्च पर्यंत रिकव्हरी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत प्राब्लेम जेव्हा ही केस झालेली होती तेव्हा असे ऑर्डरहोते की जेथे मुळीच केस नाही तेथे लाल शाईने एनआरव्ही किंवा हिरव्या शाईने करेक्शन करण्याची पुर्वी पध्दत होती. त्यानुसार ते करेक्शन करून झोनला पाठविण्यात आलेले आहेत म्हणजे तिथे प्रशासनाची एन.आर.व्ही.वाढविलेली होती परंतु बदल नव्हता अशा प्राप्रर्टी मध्ये आपण ऑलरेडी करेकशन करून संबंधित झोनला रजिस्टर पाठविण्यात आलेले आहेत. यामध्ये हिअरिंगची वगैरे काही तरतुद केलेली नव्हती परंतु ज्या ठिकाणी आवजबीरित्या केंद्रित नसतांनाही आमच्या कर्मचाऱ्यांनी जास्त रेट दाखविला

आहे. तशा बाबत आपण हिअरींग घेतलेली होती प्रश्न असा आहे की हिअरींगसाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमा अन्वयेच्या तरतूदी प्रमाणे असा नियम आहे की या वर्षीय हिअरिंग त्यावर्षा घेतली पाहिजे तर नियम २० प्रमाणे जरी घेतली तरी सन १९९१-९२ ची हिअरींग आपण घेवू शकतो. त्यासाठी कुणाचे काही आब्जेक्शन असतील तर नियम २० प्रमाणे घेवु शकतात परंतु यामध्ये आता सन १९८९-९० व १९९०-९१चे हिअरींग घेणे कायद्याप्रमाणे बरोबर नाही या मध्ये स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचित केले होते की, दुरूस्ती त्याच्यामध्ये करेकशन रेकॉर्ड मधील रजिस्टर मध्ये करावे. त्यामध्ये हिअरींग घेण्याची आवश्यकता नाही आणि आपण जर ओपन ऑब्जेकशन बोलविले तर सगळेच लोक आक्षेप घेतील आणि वसुली कुणीच देणार नाहीत आणि मग हिअरींगला अजुन दोन चार महिने लागतील व जसे १९८९ला जशी रिकव्हरी झाली नाही तशी परिस्थिती आपल्याला होईल व आपले बजेट विनाकरण फुगलेला दिसेल व पुन्हा रिकव्हरी होणार नाही ज्या ठिकाणी खरेच अन्यथा झालेला असे त्याठिकाणी तो नजरेस आणून दिला तर संबंधित नगरसेवकांनी त्या रजिस्टरवर करेक्शन केले तर बरे होईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल कारण कायदयाप्रमाणे पाठीमागील असल्यास हिअरींग तसे कारणे बरोबर होणार नाही.

**श्री.अलफखाँ हुसैनेखॉन :** आम्हाला टॅक्स चुकिने आकारण्यात आलेला आहे आणि चुकी मनपाची झालेली आहे झोन मधील रजिस्टर आणि कार्यालयातील रजिस्टर दोन्ही मध्ये पडताळणी करावी आम्ही कोणत्या एन.आर.व्ही. प्रमाणे कर आकाणी केलेला आहे त्यामधये काही निदर्शनास आल्यास रजिस्टर मध्येच दुरूस्ती करावी आणि दुरूस्ती नसल्यास आक्षेप घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही यासाठी लोकांना एकदा चान्स द्यावा की सन १९८१८२ च्या रजिस्टर वरून योग्य ती पाहणी करून करयोग्य मुल्यांवर आधारीत कर आकारणी केलेली आहे. किंवा नाही जर चुका असतील तर कार्यवाही व्हावी. परंतु हे सर्व कार्यालयीन करण्यात यावे कुणालाही आक्षेप घेवुन बोलावू नये.

**श्री.स.अहमद स.रफत :** जे जुने स.नगरसेवक आहेत त्यांना शहरातील प्राप्रटी टॅक्स बाबत योग्य ती माहिती आहे आणि कशा पध्दतीने कार्यवाही करावी याची ही कल्पना आहे सन १९७८ ते १९८२ पर्यंतचे लोकांचे सार्वजनिक हित लक्षात घेता कश्या पध्दतीने टॅक्स लावावा याबाबत त्यावेळी नगरसेवकांनी प्रयत्न केलेल आहेत. आता सुध्दा तोच दृष्टीकोन समोर ठेवावा माझ्या वार्डातील बरेचसे लोक टॅक्स भरावयास तयार आहेत तरंतु योग्य ती पध्दत अवलंविल्यास.

**श्री.प्रकाश जावळे :** जुन्या पध्दतीप्रमाणे नविन कर आकारणी शहरातील स्लम विभागासाठी करित असतांना सामान्य कर म्हणून १५% आकारावा.

**श्री.शांताराम काळे :** ज्या लोकांनी सन १९८१-८२ चार टॅक्स नविन दराने कमी होईल परंतु काही ८०% लोकांनी नविन दराने टॅक्स भरला त्यांचे बाबत आपण काय निर्णय घेणार आहात याचा खुलासा सभागृहात द्यावा.

**श्री.अलफखान :** स.सदस्य श्री.काळे यांनी म्हटल्या प्रमाणे असे की शासनचे एन.आर.व्ही.बदलल्याने लोकांचे पैसे परत करणे बाबत ॲडजस्ट केले तसेच ॲडजेस्ट केले जाईल.

**मा.महापौर :** आता चर्चा झालेली आहे जी काही दुरूस्ती आहे ती एक महिन्या पर्यंत दोन्ही रजिस्टर (झोनमधील व कार्यालयातील पाहून कार्यवाही करावी.)

**श्री.शांताराम काळे :** ज्या मालमत्ता धारकांचा एन.आर.व्ही. प्रमाणे कमी टॅक्स होईल आणि त्यांनी पुर्वीच पैसे जास्तीचे भरलेले असल्यास त्यांचे आपण पैसे परत करणार काय ? ॲडव्हान्स पोटी पैसे ॲडजस्ट करणार काय ?

**मा.महापौर :** ज्या लोकांवर अन्यथा झाला आहे त्यांचे बाबतीत ही कार्यवाही होत आहे तसे करता येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत विभागातील रजिस्टर तपासणी करून ज्या इमारतीमध्ये वाढीव बांधकाम फेरबद्दल वापरा बद्दल भाडेवाढ झालेली नाही, याबाबत तपासणी करून त्या ईमारतीचे जुने करयोग्य मुल्या कायम करणे व ज्या ईमारतीत वाढीव बांधकाम, वापरात बद्दल फेरबद्दल व वाढीव भाडे आढळून आले अशा इमारतींना तेवढया हद्यीपर्यंत नविन दराने करयोग्य मुल्य वाढणे व ते जुन्या करयोग्य मुल्यात समाविष्ठ करणे व त्यावर कर अकारणी करणे अशा प्रकारे दुरूस्ती करण्यात यावी त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९ :** (१) हत्तेसिंगपुरा येथील स.क्र.२९ मधील एस.टी.कॉलनीचा ले-आऊट मंजुर करतांना कट कट दरवाजा ते सिडको १०० फुटी रस्ता हया कॉलनीस जोडून होता. परंतु सद्या परिस्थितीत हा १०० फुटी रस्ता एस.टी. कॉलोनी जोडलेला नसल्याने एस.टी.कॉलनीचे संपुर्ण रस्ते बंद झाले आहे हा रोड दुसऱ्या बाजुने वळविल्या गेल्याने सोसायटी आणि जमीन मालक यामध्ये विनाकारण वाद निर्माण झाला आहे तरी हा रोड विकास आराखडयात असल्याप्रमाणेच ठेवण्यात यावा (२) हत्तेसिंगपुरा येथील १०० फुटी रोड स.नं.३ व ४ मधुन गेलेला आहे .विकास आराखडयात हा रस्ता सरळ दर्शविण्यात आला आहे. तरंपु सद्या परिस्थितीत हया रस्तयाने वळणे घेतलेली आहे. तरी हा रस्ता डी.पी. प्लॉन प्रमाणे सरळ करण्यात यावा (३) स्काऊट गाईड कार्यालय ते गणेश कॉलनीकडे जाणारा रस्ता हा डी.पी.प्लॉन मध्ये असल्याप्रमाणेच ठेवण्यात यावा. कारण असे निर्दशनास आले आहे की एस.टी.कॉलनी बाजु रस्त्याची रूंदी कमी करण्यात येत आहे ज्यामुळे विभागीय आयुक्तांच्या निवासस्थाना समोर बनविण्यात येणाऱ्या आयलैंड (वाहतुक बेट) ची रूंदी कमी होणार आहे तसेच आयलैडच्या सुंदरते मध्ये फरक पडणार आहे. तरी सदरील रोड हा.डी.पी.प्लॉनामध्ये आहे . त्या प्रमाणे ठेवण्यात यावा.

सुचक : श्री.मुजीब आलमशा खान<br>
अनुमोदक : श्री.नरेंद्र पाटील<br>
श्री.हाजी मो.हफिजोद्दीन<br>
दिनांक : ५-२-१९९२

**संवाद :**

**श्री.मुजिब खान :** हत्तेसिंगपुरा येथील स.नं.२९ मधील एस.टी.कॉलनीचा ले-आऊट मंजूर करिता असतांना कटकट दरवाजा ते सिडको या दरम्यान होणारा रोड १०० फुटी डी.पी.रोड मध्ये येतो परंतु सध्या परिस्थितीत सदरील रोड हा एस.टी.कॉलनीस जोडलेला नसल्याने या कॉलीनेचे रस्ते बंध झाले आहे तेव्हा नियमाप्रमाणे

विकास आराखडयाप्रमाणे १०० फुटी रस्त्याची कार्यवाही व्हावी आणि ही बाब मा.आयुक्त यांच्या अखत्यारीतली असुन त्यांनी या बाबत कार्यवाही करावी दुसरा १०० फुटी रोड सर्व्हेक्षण ३ व ४ मधून गेलेला आहे विकास आराखडयात हा रस्ता सरळ दर्शविण्यात आलेला आहे. परंतु सध्या परीस्थितीत हा रस्ता वळण होवून पुढे नेलेला आहे तेव्हा तो प्लॅन प्रमाणे १०० फुटी सरळ करण्यात यावा तर स्काऊट गाईड कार्यालय ते गणेश कॉलनीकडे जाणारा रस्ता हा डी.पी.प्लॅन प्रमाणेच ठेवण्यात यावा. यामध्ये स.सदस्य श्री.बंडू प्रधान यांच्या वार्डीतून येणाऱ्या रस्त्याला एस.टी.कॉलनीतला रस्ता मिळतो व तो रस्ता मा.विभागीय आयुक्तांच्या निवास स्थानासमोर एका आयलँड (वाहतुक बेट) तयार होणार आहे त्यास येवुन मिळतो परंतु ज्यामुळे तो रस्ता रूंदिने कमी पडणार आहे तेव्हा आयलँडच्या सुंदरतेमध्ये फरक पडण्याची शक्यता आहे यासाठी डी.पी.प्लॉनप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा.महापौर :** याबाबत सहा संचालक नगर रचना व अतिः शहर अभियंता यांना सुचविण्यात येते की संदर्भाय प्रस्तावानुसार कार्यवाही करून सभागृहात माहिती द्यावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार (१) हत्तेसिंगपुरा येथील स.नं.२९ मधील एस.टी.कॉलनीचा ले-आऊट मंजुर करित असतांना कट कट दरवाजा ते सिडको हया १०० फुटी डी.पी.रस्ता विकास आराखडयानुसार तयार करावे (२) हत्तेसिंगपुरा येथील १०० फुटी रोड स.नं.३ व ४ मधुन गेलेला असल्याने विकास आराखडयानुसार रस्ता सरळ करण्यात यावा आणि (४) स्काऊट गाईड ते गणेश कॉलनीकडे जाणारा रस्ता डी.पी.प्लॅन प्रमाणे ठेवण्यात यावा. ज्यामुळे मा.विभागीय आयुक्तांच्या निवास्थानासमोर होणाऱ्या (वाहतुक बेल्ट) आयलैंडच्या सुंदरते मध्ये फरक पडणार नाही अशी कार्यवाही करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १० :** चिकलठाणा गावामधून जालनाकडे जाणारा सार्वजनिक रस्ता अत्यंत अरूंद आहे या रस्त्या वरून अहोरात्र वाहनांची वर्दळ असते त्या मुळे या रस्त्यावर वेळोवेळी अपघात होतात मंजुर विकास योजने नुसार सदर रस्त्याचे रूंदीकरण करून रस्ता विकसित करणे आवश्यक आहे रस्ता रूंदिकरणासाठी रस्तया लागतची जागा संपादन करण्यात यावी व हा रस्ता विकास योजने नुसार रूंद करून विकसित करण्यात यावा.

सुचक : श्री.कचरू नवपुते
अनूमोदक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल
दिनांक : ६-२-१९९२

**संवादः**

**श्री.नरेंद्र पाटील :** हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवण्यास पाहिजे होता कारण गेल्या दहा वर्षापासुन प्रशासनाने या गावीतील रोड बाबत कोणतिही कार्यवाही केलेली नाही ते पुर्वीच व्हायाला पहिजे होते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा गावामधुन जालनारोड जाणारा रस्ता अत्यंत अरूंद असुन या रस्त्यावर वाहनांची वर्ईळ असते त्यामुळे अपघात होताता तेव्हा मंजुर विकास

योजनेनुसार रस्त्याचे रूंदिकरण करून रस्ता विकसित करणे व रस्त्या लगतची जागा संपादन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११ :** औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत सध्या शहरामधील मंदिरे मस्जिद, गुरूद्वारा, चर्च इ. धार्मिक प्राथणा स्थळांना मालमत्ता तथा पाणी कर आकाराण्यात येतो. तसेच यार्मोक स्थळशंचे उत्पन्नासाठी बांधलेली दुकान, निवासस्थाने आदि वरही महापालीका मालमत्ता कर व पाणी पट्टी आकारते ही सर्व धर्मयांची धार्मिक स्थळे असल्यामुळे त्यांना मालमत्ता कर व पाणी पट्टी कर लावण्यात येवू नये, तसेच चालू वर्षात धार्मिक स्थळांवर आकारलेला वरील कर रद्द करण्यात यावा व यापुढे शहरामधील सर्व धर्मियांचे धार्मीक स्थळांना मालमत्ता कर व पाणी पट्टी करामधुन वगळण्यात यावे.

सुचक : श्री.अजिज जहागिरदार
डॉ.चेनकरण संचेती
अनुमोदक : श्री.धनंजय गंगाखेडकर
श्री.प्रदिपकुमार जैस्वाल
दिनांक : ६-२-१९९२

**संवाद :**

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** या प्रस्तावा संर्दभात असे म्हणावयाचे आहे की जी मंदिरे,मस्जिद, गुरूद्वारा व चर्च आहेत त्या प्रार्थना स्थळापासुन काही उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांचा मालमत्ता तथा पाणी कर आकारण्यात येवु नये.

**मा.महापौर :** माझ्या माहिती प्रमाणे आता पर्यन्त जी काही मंदिरे, मस्जिद, गुरूद्वाररा, चर्च वगैरेंना कर अकारण्यात येत नाही आणि ज्याच्या पासुन उत्पन्न मिळतो त्यांनाच कर आपण अकारातो.

**श्री.बंडू प्रधान :** ज्यांचे ट्रस्ट आहेत आणि ज्यांचे शॉपिंग कॉम्पलेक्स वगैरे असतात त्यांना कर लाववयास पाहिजे.

**श्री.मोहम्मद ईस्माईल :** मंदिरे, मस्जिद, गुरूद्वारा व चर्च पासुन कोणत्याही प्रकारचे उत्पनाचे साधन असुन त्यार्व ठिकाणी नळांची व्यवस्था असते तेव्हा पाणी पट्टी (कर) त्या स्थळांकडून घेण्यात येवू नये.

**श्री.अजिजुल्ला बेग :** स.सदस्य श्री.महंमद ईस्माई यांच्या सुचने नुसार ज्या ठिकाणी पार्थना होता मग ते कोणतेही मंदिरे, मस्जिद, गुरूद्वारा किंवा चर्च असे त्या ठिकाणीच फक्त कर आकारण्यात येवु नये कारण मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमात अशी कुठेही तरतुद नाही की मंदिरे मस्जिद, वगैरंना टॅक्स आकारण्यात येवू नये केवळ दुकाने वगैरे असतात ज्यापासुन उत्पन्न मिळते त्यांना टॅक्स आकारणे आवश्यक असते.

**श्री.अजिज जहागिरदार :** नियम १३२ ब प्रमाणे तसा कायदयात नियम दिलेला आहे. (नियम वाचुन दाखविला)

**मा.महापौर :** संबंधित प्रार्थना स्थळांना सुट मिळते काय याबाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** कलम १३२ प्रमाणे जी सार्वजनिक स्थले आहेत व ती धर्मादाय आयुक्तांकडून पंजिकृत (रजिस्टर्ड) झालेली आहेत किंवा पुजा स्थळे आहेत अशा ठिकाणी सर्वसाधारण कर माफ केल्या जातो पन जर त्या प्रिमायेरस पासुन काही उत्पन्न किंवा काही व्यवसाय चालक असल्यास त्या भागाला आपला टॅक्स लावता येतो १३२ ब प्रमाणे आणि स.सदस्यांनी ठरावाच्या पुर्वी जी चर्चा केली त्या वेळीही मी त्यांना सांगितले त्याचे प्रोव्हीजन मी वाचुन दाखवितो. (प्रोव्हीजन वाचुन दाखविला)

**श्री.अलफखान :** स.सदस्य श्री.महमद इस्माईल यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रार्थना स्थळांसाठीचे पाणी पट्टी कर माफ करावयास पाहिजे तसेच नगर परिषद असतांना जसा कर संस्थाना माफ केला त्याच पध्दतीने या प्रस्तावासाठी करण्यात यावा आणि काही ठिकाणी संस्थांना ३ % साफसफाई कर न लावण्याचा प्रस्ताव मंजुर करूनही प्रशासन तो लावीत आहेत याचा अर्थ काय ? प्रस्ताव मंजुर करूनही कर का लावल्या जातो त्याची अमलबजावणी का होत नाही.

**श्री.स.अहमद स.रफत :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा जे मोठ्या प्रापर्टीवाले असतात त्यांच्याकडे वॉचमन, साफसफाई करणारे कर्मचारी आणि लाईट व नळांची सुविधा असतात परंतु त्यामानाने त्यांचेकडे उत्पन्न काहीच नसते त्याबाबत विचार व्हावा दुसरे असे की शासनाकडे प्रस्ताव पाठवावा की ज्या संस्था असतात शैक्षणिक वगैरे प्रायव्हेट नसतात परंतु त्यांनाही आपण शिक्षण कर रोजगार हमी योजना कर वगैरे आकारणी करतो तो माफ करण्याबाबत मंजुरी मिळावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पाणी पट्टी माफ करण्याचा शासनाला अधिकार नसुन तो अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. तसा विधी सल्लागारांना खुलासा करण्यास सांगावे.

**मा.महापौर :** कोणत्या नियमाप्रमाणे आहे ते दाखवावे जेणे करून मंजुर केल्यानंतर अमलबजावणी त्वरीत होवु शकेल. याबाबत मा.आयुक्तांनी कमी जास्त काम करता येईल ते करावे.

**श्री.अलफखान :** याबाबतचा अधिकार सर्व साधारण सभेला असुन आम्ही शासनाच्या २२% बाबत बोलत नसुन केवळ पाणी पट्टी व ३% माफ करणे बाबत सुचित करतो.

**श्री.धनंजय गंगाखेडकर, श्री.अजिजउल्ला बेग :** आपण योग्य तो निर्णय द्यावा प्रशासन जे करेल ते करेल आपण निर्णय द्यावा.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो या प्रस्तावाबाबत मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिके मार्फत सध्या शहरातील मंदिरे, मस्जिद, गुरूद्वारा, चर्च इ.धार्मीक प्रार्थना स्थळांना मालमत्ता तथा पाणी कर चालु वर्षापासुन लावण्यात येवू नये यास सर्वानुमते मंजुरी देवून मा.आयुक्तांकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२ :** औरंगाबाद येथे ब्रॉडगेज रेल्वे सुरू झाल्यामुळे हमालवाडा व सिल्कमिल कॉलनी येथे राहणाऱ्या लोकांना शहरात जाण्यासाठी फार तास सहून करावा लागत आहे लहान लहान मुला मुलींना शाळेत जाण्यासाठीसुध्दा त्रास घेत आहे तर दक्षिण मध्ये रेल्वेने ताबडतोब

पदचाऱ्यासाठी एक फुट ओव्हर ब्रिज बांधण्याची व्यवस्था करावी. तरी ठराव मंजुर करून संबंधित रेल्वे खात्याच्या अधिकाऱ्यांना ठरावाची प्रत पाठविण्यात यावी व त्याचा पाठपुरावा करावा.

सुचक : श्री.अलफखाँ हुसेनखाँ
अनुमोदक : श्री.धनंजय गंगाखेडकर
दिनांक : ७-२-१९९२

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद येथे ब्रॉडगेज रेल्वे सुरू झाल्यामुळे हमालवाडा व सिल्कमिल कॉलनी येथे राहणाऱ्या लोकांना शहरात येण्या जाण्यासाठी फार त्रास सहन करावा लागतो व शाळेतील लहान मुलांना सुध्या जाणेयेणेसाठी त्रास होतो. तरी दक्षिण मध्ये रेल्वेने ताबडतोब पादचाऱ्यासाठी एक फुट ओव्हरब्रिज बांधण्याची व्यवस्था करावी व संबंधित रेल्वे खात्याच्या अधिकाऱ्यांना कळविण्यास प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३ :** औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या एक उप आयुक्त कार्यरत आहेत त्यांचेवर दिवसेदिवस कामाचा बोजा वाढत आहे यासाठी उप आयुक्त यांच्या दोन नविन जागा निर्माण करणे अत्यंत जरूरी आहे ज्यात सामान्य प्रशासन व शहरातील वाढत चाललेल्या मालमत्तासाठी तसेच न्यायालयीन दाव्यासाठी एक उप आयुक्त असणे अत्यंत आवश्यक आहे व दुसरी जागा मालमत्ता व जकात कर वसुलीसाठी आवश्यक आहे तिसरी जागा शहरातील स्वच्छता व आतिक्रमण तसेच संपादित जामिनिवीर नियंत्रण ठेवणेसाठी असावयास पाहिजे यासाठी उप आयुक्तांची दोन नवीन पदे निर्माण करणेव शासनास शिफारस करणेस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.अलफखाँ हुसेन खॉ.
अनुमोदक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल
दिनांक : ११-२-१९९२

**संवाद :**

**श्री.बंडू प्रधान :** मागील सभेच्या वेळेस मी प्रस्ताव ठेवला असता प्रशासनातर्फे प्रस्ताव मांडण्यात यावा असे म्हटले होते मग आजचा सदरील प्रस्ताव प्रशासनातर्फे ठेवण्यात यावा.

**श्री.अलफखॉ हुसैन खाँ :** सन १९८५ मध्ये प्रशासक म्हणून श्री. मनमोहनसिंग होते त्याच वेळेस प्रशासनातर्फे प्रस्ताव या संदर्भात पाठविण्यात यावा परंतु लोकल बॉडी सन १९८८ ला अस्तित्वात आल्याने प्रस्ताव तेव्हा पासुन प्रशासनाने शासनकडे पाठविण्यासाठी सभेमध्ये ठेवला नाही ही चुकी प्रशानाची आहे म्हणून संबंधित प्रस्ताव नगर सेवका तर्फे मांडण्यात आलेला आहे. त्यासाठी की या ठिकाणी दोन पदे उप आयुक्तांची करण्यात यावी कारण औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात होता प्रापर्टी टॅक्स साफसफाई कर, बांधकामे इत्यादी संबंधी एक

उप-आयुक्त यांच्यावरील जबाबदारी अपुरी पडते यासाी आणखी एक उप आयुक्त पदाची गरज असुन या दोन पदांची मान्यता मिळाविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**श्री.अजिजुल्ला बेग :** शासनाकडून लोकल बॉडी तर्फे उप आयुक्त पदाचा प्रस्ताव मंजुरीस्तव पाठवावा असे पत्र सन १९८५च्या नंतर आलेले असल्यास पत्र सभागृहा समोर ठेवावे व शहराचा वाढता व्याप लक्षात घेता उप आयुक्त यांचे ३ तीन पदे पाहिजेत त्याच बरोबर पशुधन विकास अधिकारी व इतर विभागाकडे कामाचा व्याप वाढलेला असल्याने कार्यकारी अभियंताचे पदास मंजुरी द्यावी व त्यासाठी प्रशासनाचा अभिप्राय द्यावा.

**मा.महापौर :** आपल्याला केवळ या प्रस्तावावर काय मत मांडयाचे आहे तो मांडावे इतर बाबतीत काहीही बोलू नये.

**श्री.बंडू प्रधान :** ज्यावेळेस मी प्रस्ताव मांडला त्यावेळी विरोध का केला ? प्रशासनातर्फे प्रस्ताव मांडण्यात यावा असे सुचित का केले मग या प्रस्तावावर चर्चा घडवून आनु नाये.

**श्री.प्रकाश जावळे :** मागील सभेमध्ये स.सदस्य श्री.बंडू प्रधान यांनी प्रस्ताव मांडलेला असतांना आपणच प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडण्यात यावा. असे सुचविले. आमचा प्रस्तावास पदे भरित असतांना एक पद शासनातर्फे डेपूटेशनवर आणि एक पद जेष्ठता सुचीनुसार कार्यालयातुन भरण्यात यावे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** मागे असेच म्हटंले होते की उप-आयुक्तांचे पदास आवश्यक असल्यास मंजुरी द्यावी. परंतु आज प्रशासनास पद भरणे आवश्यक असल्याने दोन्ही पदास मंजुरी द्यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्रशासकिय खुलासा यासाठी होणे आवश्यक आहे कारण प्रशासनाचे काय मत आहे ते सभागृहाला माहित होणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** संबंधित प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविला जाईल आणि शासनाकडून काही विचारणा आल्यास प्रशासन योग्य तो खुलासा होईल.

**श्री.प्रकाश जावळे :** दोन उप आयुक्तांच्या पदासाठी एक पद शासनाचे प्रतिनियुक्तीने भरावे आणि दुसरे जेष्ठता सुचिनुसार पदोन्नतीने भरावे.

**मा.महापौर :** एक पद उप आयुक्तांचे शासनाचे प्रतिनियुक्तीवर आहेत त्याच बरोबर दोन पदे उप आयुक्तांचे भरावयाचे आहे असा प्रस्ताव आहे त्यामधून जेष्ठता सुचीनुसारही पदे पदोभतीने भरण्यात येतील

**श्री.रशीद मामू :** उप-आयुक्तांचे एक पद मागासवर्गीय यांचेसाठी व एक पद ओपन मध्ये असावे यासाठी संबंधित प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठवावा.

**श्री.पिटर वंजारे** : शहरातील आरोग्याच्या दुष्टीने विचार करता एक डॉक्टरांचे पदास मंजुरी द्यावी.

**श्री.बंडू प्रधान :** सदरील प्रस्ताव मंजुर करिता असतांना आरोग्य विभागात वर्ग-१ व वर्ग-२ चे पदास मंजुरी देण्यात येईल अशी अट घालण्यात यावी.

**श्री.स.अहमद एकबालोद्दीन :** उप आयुक्तांच्या दोन ऐवजी तीन पदास मंजुरी द्यावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी केवळ या प्रस्तावा पुरते बोलावे कुणाला इतर विभागाबाबत बोलवयाचे झाल्यास त्यांनी तसा प्रस्ताव मांडावा आता जास्त चर्चा न करता प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कामाचा बोजा वाढत असल्याने ज्यामध्ये सामान्य प्रशासन व शहरातील वाढत चाललेल्या मालमत्तासाठी न्यायालयीन कामासाठी एक उप आयुक्त व दुसरे मालमत्ता व जकात कर वसुलीसाठी तिसरे शहरातील स्वच्छता व अतिक्रमण तसेच संपादित जमिनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी असे एकूण तीन पदे आवश्यक असल्याने नविन दोन उप आयुक्तांची पदे निमार्ण करून मनपा कर्मचाऱ्यातुन जेष्ठतेनुसार पदोन्नतीद्वारे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४ :** मो.नारेगाव प्रभाग क्र.९ येथील पाण्याच्या टाकी लगताचे महापालिकेच्या ताब्यातील हॉल मध्ये सर्व सोयींनी युक्त असे वाचनालय सुरू करण्यात यावे जेव्हा करून या भागातील रहिवाशंना त्याचा लाभ होता येईल व त्यांचे ज्ञानात भर पडेल.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री.शंकर मगर
श्री.प्रदिप जैस्वाल
श्री.केशव सोनवणे
दिनांक : ११-२-१९९२

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नारेगांव प्रभाग क्र.९ येथील पाण्याच्या टाकी लागतची महापालीकेच्या ताब्यातील हॉलमध्ये सर्व सोयीयुक्त असे वाचनालय तेथील रहिवासी यांना त्याचा लाभ होवून ज्ञानात भर पडणेसाठी वाचनालयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५ :** मो.आंबेडकर नगर या भागात गेल्या १५ वर्षापासुन अस्तित्वात असलेली स्मशानभूमी अधिकृतरित्या स्मशानभूमी म्हणून घोषित करण्यात यावी सदर स्मशानभूमीस सरक्षित भिंत उभारण्यात यावी स्मशानभूमीत शेड उभारण्यात यावे जेणे करून या भागातील नागरिकांना स्मशानभूमीचा अंत्याविधीसाठी लाभ होता येईल.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री.शंकर मगर
श्री.प्रदिप जैस्वाल
श्री.केशव सोनवणे
दिनांक : ११-२-१९९२

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकर नगर या भागात गेल्या १५ वर्षापासुन आस्तित्वात असलेली स्मशानभूमी अधिकृतरित्याघोषीत करून त्या ठिकाणी सरक्षित भिंत व शेड उभाणण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६ :** रेल्वेस्टेशन हा भाग दिवसेदिवस मोठ्या प्रमाणात विकसीत होत असुन त्या भागातील नागरिकांना उद्यानाची अत्यंत आवश्यकता आहे या भागात हिराखान जिनिंग कंपनीची मोठी जागा उपलब्ध असुन त्यापैकी उद्यान करिता आवश्यक असलेली तितकी जमीन मनपाने आरक्षित करून तेथे त्वरीत उद्यान उभारावे व शहराच्या सौंदयात भर पाडावी करित प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सूचक : श्री.प्रकाश जावळे
अनुमोदक : श्री.एकबालसिंग गिल
दिनांक : १२-२-१९९२

**संवाद :**
**श्री.अजिज जहागिरदार :** अनुमोदक नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवावे.
**मा.महापौर :** ठिक आहे अनुमोदक नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्रमाकं १७ :** औरंगाबाद शहरात स्वांतत्र्यवीर सावरकारांचा एकही पुतळा नाही मो.समर्थनगर येथील भुषण कॉम्पलेक्स समोरील चौकात प्रशस्तजागा असुन या जागी स्वातंत्र्यवीर सावरकरयांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याते यावा तसेच या चौकास स्वातथ्यवीर सावरकर चौक असे नांव देण्यात यावे जेणे करून हा परिसर सुशोभीत होईल व शहराचे सौंर्दयात अधिक भर पडेल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.विठ्ठल पेरकर
श्री. विजय पालीवाल
अनुमोदक : श्री.नारायण फत्तेलष्कर
सौ. लता दलाल
श्री. कचरू नवपुते
दिनांक : १३-२-१९९२
**संवाद :**
**सौ.लता दलाल :** मला असे समजले की आम्ही प्रत्येक वेळेस या संबंधिचा प्रस्ताव सन १९८८ पासुन मांडीत आहोत तरंतु पुतळा कमिटी आहे त्यांच्या कडे पाठविण्यात यावा असे सांगितल्या जाते तेव्हा पुतळा कमिटी सध्या आस्तीत्वात आहे काय ? विनाकारण कमिटीचे नांव सांगुन प्रस्ताव पडलेला असतो. करिता एक मत्ताने प्रस्ताव मंजुर व्हावा ही विनंती.
**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात मो.समर्थनगर येथील भुषण कॉम्पलेक्स समोरील चौकात स्वातंत्रवीर सावरकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारून त्या चौकास स्वातत्रवीर सावरकर चौक नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १८ :** औरंगाबाद महानगरपालिकेत मालमत्ता करा बाबत ५/६ वार्ड आहेत प्रत्येक वार्डात ब्लॉक नबंर व घर नंबर आहेत उदा जर एका घराचा क्र.२-१०-१२ असा आहे व तेथे जर काही नविन घरे बांधली गेली तर अशा धरावर मकान क्रमांकाचा हवालातर अशा धरांवर मकान क्रमांकाचा हवाल देते वेळी २-१०-१२ ते २-१०-१२/३०० अथवा ४०० क्रमांका पर्यंत घरांना क्रमांक देण्यात येतात. मालमत्ता कर वसुलीचे दुष्टीने यावर विचार करणे अत्यंत आवश्यक आहे यासाठी औरंगाबाद शहरातील घरांना पुन्हा नविन घर क्रमांक योग्य रितिने पध्दतशीरपते देण्यात यावे जेणे करून मालमत्ता कराचे डिमांड रजिस्टर व मालमत्ता कर वसुली तसेच नगर भु.मापनासाठी सोयीचे होईल प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अलफखॉ हुसैन खॉ
अनुमोदक : श्री.विठ्ठल पेरकर
श्री.अजिज जहागिरदार
दिनांक : १३-२-१९९२

**संवाद :**

**मा.महापौर :** संबंधित प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष माहे एप्रिल पासुन कामास सुरूवात करण्यात येणार आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालमत्ता कराबाबत जे काही वार्ड शिल्लक आहेत त्या वार्डातील घरांचे नंबर लिहिणे महत्वाचे असल्याने या कामास मनपाचे आर्थिक वर्ष माहे एप्रिल सुरूवात करण्यात येणार आहे.

**विषय क्रमांक १९ :** नगरपालिका व महानगरपालिकाने शहरात बऱ्याच जनिनी संपादन करून आपल्या ताब्यात घेतल्या आहे परंतु पाहणी अंती असे समजले की ज्या जमीनी आपण ज्या उद्देशासाठी संपादित केलेल्या आहेत तो उद्देशे पुर्ण झाला आहे. अथवा जमीनी आपल्या ताब्यात आहेत किंवा नाही यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणेसाठी एक उप अभियंताचे पद निर्माण करणष अत्यंत आवश्यक आहे जेणे करून संपादित जमिनीचा वापर योग्य उद्देशासाठी होईल व यापुढे महानगरपालिकेमार्फत संपादीत केल्या जाणाऱ्या जमिनीवर योग्य नियंत्रण ठेवले जाईल प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अलफखाँ हुसैन खाँ
श्री.विठ्ठल पेरकर
श्री.अजिज जहागिरदार
दिनांक : १३-२-१९९२

**संवाद :**

**श्री.अलफखाँ हुसैन खाँ :** शहरातील वाढते अतिक्रमण लक्षात घेता मनपातर्फे अनेक वेळा अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रक्रिया चालविली जाते. बरेच रोड असे आहेत की ५० फुटाचे आहेत परंतु दोन्ही बाजुने निरिक्षण केले असता असे लक्षात की, रोडच्या कडेला दुकानांची अतिक्रमण झालेली असतात ते हटविण्यात मनपा यशस्वी झालेली नाही. रोड केवळ ३० फुटाचा दिसुन येतो यासाठी शहरातील ज्या जमिनी आहेत त्या जमिनी संपादित केल्यानंतर त्यावर योग्य ते नियंत्रण

मनपाचे नसल्याने या बाबत एक उप-अभियंत्याचे पद निमार्ण करून भरण्यात यावे. जेणे करून मनपाची प्रापर्टी अबाधित राहील व वेळोवेळी कार्यवाही करणे सुलभ होईल तेव्हा उप अभियंत्याचे पद भरणे जरूरीचे आहे.

**श्री.स.हुसैन स.रफत :** आपण उद्यान उप अभियंत्याचे पद निर्माण करणार आहात तर त्या बरोबर याचीही निर्मिती व्हावी.

**मा.महापौर :** बरेचसे उप अभियंते असे आहेत की, त्यांना कामे करावयास काम नाही तेव्हा जे असे उप अभियंता खाली आहे त्यांचेवर कोणतेही जबाबदारी नाही त्यांना या कामासाठी सुचविण्यात येईल केवळ पदे निर्माण करून भरणे योग्य नाही

**श्री.तकीहसन खान :** सभागृहात कोरम अपुर्ण असुन सभा संपविण्यात यावी.

**मा.महापौर :** बरे ठिक आहे. सभा समाप्त करण्यात येते.

**जन गण मन राष्ट्रगिताने सभा समाप्त झाली**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*Ü

**मंगळवार दिनांक १७-३-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे**
**इतिवृत्तात मंगळवार दि.१७-३-९२ रोजी मा.महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजे ११.३० वाजता वंदे मातरम या गिताने**
**सभेस सुरूवात झाली. या सभेस मा.आयुक्त, उप-आयुक्त, अधिकारी आणि खालील स.सदस्य उपस्थित होते.**

१) मा.श्री.यादव अशोक सायन्ना
२) मा.श्री.शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
४) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
५) मा.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) मा.श्री.गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा.श्री.सोनवणे केशव काशिनाथ
८) मा.श्री.भगुरे तुळशिराम छगन
९) मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडली
१०) मा.श्री.पाटील नरेंद्र यादवराव
११) मा.श्री.म.अयुब गुलाम जिलानी
१२) मा.श्री.मुजीब आलामशा खान
१३) मा.श्री.प्रधान बंडू गोविंदराव
१४) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
१५) मा.श्री.जावेद हसनखान कासीम हसन खान
१६) मा.श्री.तकिहसन खान कासीन हसन खान
१७) मा.श्री.स.अहमद एकबालोद्दीन स.मो.कुतूबूद्दीन
१८) मा.श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१९) मा.श्री.ओक जयवंत केशवराव
२०)मा.श्री.अ.रशीद खान (मामू) अ.हमिदखान
२१) सौ.दलाल लता श्रीनिवास
२२) मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२३) मा.श्री.हाजी मोहमद हाफिजोद्दीन
२४) मा.श्री.छापरवाल रमेश नारायण
२५) मा.श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
२६) मा.श्री.डॉ.संचेती चेनकरण गणेशलाल
२७) मा.श्री.म.इस्माईल अ.करी
२८) मा.श्री.फैय्याज खान अहमद खान
२९) मा.श्री.अलीम बेग मिर्झा कलीम बेग
३०) मा.श्री.मोहसीन अहमद बशीर अहमद
३१) मा.श्री.स.हुसैन स.अहमद

३२) मा.श्री.मगर शंकर जिजाराम
३३) मा.श्री.मानकापे नामदेवराव शामराव
३४) मा.श्री.पैठणकर पांडूरंग भिमाजी
३५) मा.श्री.आलफखान हुसैन खान
३६) मा.श्री.वाघमारे सुदाम भानुदास
३७) मा.श्री.सावे मोरेश्वर दिनानार्थ
३८) मा.श्री.बारवाल गजानन रामकिशन
३९) मा.श्री.जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४०) मा.श्री.जावळे प्रकाश शिवराम
४१) मा.श्री.गाडे गंगाधर सुरवदेव
४२) मा.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
४३) मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४४) मा.श्री.नवपुते चकरू चंद्रभान

**संवाद :**

**श्री.प्रदिप जैस्वाल :** गेल्या दोन तीन दिवसापुर्वीच वर्तमानपत्रा मध्ये स.सदस्य श्री.केशव सोनवणे यांनी दिलेल्या बातमीच्या संदर्भात एक प्रश्न विचारलेला होता की मनपातील ज्या स.सदस्यांचे नातेवाईक या कार्यालयात काम करित असतील त्या स.सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे. तेव्हा याबाबत सभागृहात प्रथमत चर्चा व्हावी किंवा खुलासा मिळावा.

**श्री.कचरू नवपुते :** माजी महापौर स.सदस्य श्री.शांताराम काळे यांच्या मत्तोप्रीचे दु:खद निधन झाले आहे. तेव्हा सभागृहात त्यांना श्रध्दांजली वाहव्यात यावी.

सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन स्वर्गीय पद्माबाई यशवंतराव काळे यांना श्रध्दांजली वाहव्यात आली.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे असे संगाण्यात येते की तो प्रश्न आजच्या अजंडया वरील नसल्याने चर्चेत घेता येत नाही आता केवळ सर्व स.सदस्यांनी इतिवृत्तावर चर्चाकरावी.

**प्रदिप जैस्वाल :** मी यासाठी सदरील प्रश्न उपस्थित केलेला आहे की संबंधित बातमी वर्तमान पत्रामध्ये छापून आल्याने मनपाची बदनामी होवु नये या दुष्टीने सभागृहात खुलासा व्हावा किंवा माहिती द्यावी.

**श्री.तकीहसन खान :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर जास्त चर्चा ना करता विधी सल्लागाराकडून खुलासा करण्यात यावा. म्हणजे प्रश्न मिटतो.

**श्री.सुदाम वाघमारे , श्री. केशव सोनवणे :** नियमाप्रमाणे इतिवृत्तावर चर्चा होण्या आधी संबंधित प्रश्नावर चर्चा होवून खुलासा व्हावा.

**श्री.अजीजुल्ला बेग, श्री.अलफखान :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत इतिवृत्ताशी निगडीत नसल्याने चर्चा करण्याचा काही एक संबंध नाही दुसरा मुद्दा म्हणजे स.सदस्यांनी जर मा.आयुक्तांकडे पत्राने विचारणा केली त्यात कोणत्या नियमानुसार सदस्त्व रद्द करण्यात येते याचा उल्लेख नाही तर प्रश्न विचारावयाचे झाल्यास नियमाप्रमाणे सार्वसाधारण सभेतील प्रश्नावलीत प्रश्न

टाकून विचारण्यात आला पाहिजे तरच त्याची माहिती देण्यात आली असतील परंतु स.सदस्यांनी अशा प्रकारचा प्रश्न विचारणे योग्य नसुन मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम प्रकरण १० तील सब सेक्शन २ अन्वये कोणत्याही स.सदस्यांचे नातेवाईक मपनामध्ये नौकरीत असल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द होत नाही ते यावरून दिसून येते. कारण यामध्ये अेमडमेंट झालेले आहे कृपया ते पहावे (यावेळी अमेंडमेंट झाल्याचे नियम वाचुन दाखवितात.

**श्री.नरेंद्र पाटील :** स.सदस्य श्री.अलफखान यांनी जो नियमावलीतील नियम वाचुन दाकविला त्या पुर्वीच मनपातील संबंधित अधिकाऱ्यांनी याचा आधारे घेवून खुलासा केला असता तर बरे झाले असते.

**श्री.केशव सोनवणे :** संबंधित प्रश्नाची माहिती सदस्याकडून मागविलेली नसून मुबंई प्रांतिक मनपा अधिनियमा अन्वये पुस्तीकेत दर्शविल्याप्रमाणे योग्य तो खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** दि.११-३-९२ रोजी स.सदस्य श्री.केशव सोनवणे यांनी प्रशासनास दिलेल्या पत्राप्रमाणे ज्या नातेवाईक मनपामध्ये नौकरीस आहेत त्या स.सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे. त्यानुसार प्रशासनाचे वतीने खालील प्रमाणे खुलासा कायद्या प्रमाणे करण्यात येत आहे. मुबंई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ११(१) (क) मध्ये अशी परतुद आहे की पोट कलम २ च्या तरतुदीच्या अधिनतिचा महानगरपालिके बरोबर मनपाने किंवा मनपाच्या वतीने दिलेल्या कोणत्याही करारात किंवा मनपाच्या नौकरीत तिचा स्वतःचा किंवा भागरीदारीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कोणताही भाग अथवा हितसंबंध असेल असा पालीका सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा पालीका सदस्य म्हणून राहण्यास (Disayalitied)होईल हे १० (१) (क) मध्ये दिलेले आहे वरील तरतुद पोटकलम २ च्या अधीन असल्यामुळे पो कलम १० (२) (ओ) (अ) १९६७ मध्ये महाराष्ट्र अधिनियम कलम ३५ मध्ये सुधारीत केलेले आहे व त्याप्रमाणे ते कलम खालील प्रमाणे आहे तिच्या सदस्यांचा कोणताही नातलग महानगरपालिकेत नौकरीत आहे किंवा मनपाने किंवा तिच्या वतीने त्या नातलगास आपल्या अधिकारी / कर्मचारी म्हणून नौकरीस लावले आहे केवळ याच कारणा करिता पोट कलम १ खंड (फ) अन्वये सदस्यांचे (Disayalitied)वरून घेतले आहे असे मानले जाणार नाही वरील दोन्ही तरतुदीचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की कोणत्याही मनपाच्या सदस्याचा कोणताही नातेवाईक मनपामध्ये नौकरीस असला किंवा मनपाने तिच्या वतीने आपला अधिकारी / कर्मचारी म्हणून त्यास नौकरीस लावले असले तरी अशा सदस्याचे मनपाचे सदस्यत्व रद्द होत नाही असे प्रशासनातील विधी सल्लागार म्हणून माझे मत आहे.

**श्री.केशव सोनवणे :** आताच विधी सल्लागारांनी अमेंडमेंट झाल्याची कायदयाची बाजु मांडली परंतु माझी या बाबत माहिती विचारण्यात दुष्टीकोन वेगळा होता अशा प्रकारे मनपा मध्ये स.स्दस्यांचे नातेवाईक नौकरीस आहेत काय ? आणि असल्यास त्याची माहिती द्यावी त्याचबरोबर अमेंडमेंट झाल्याची प्रत सभागृहात सर्व स.सदस्यांना देवून या बाबत काय कार्यवाही करता येईल कायदयाप्रमाणे ते आपण करावे अशी मी विनंती करतो.

**मा.महापौर :** त्याची माहिती देण्यात येईल तरंतु ही वेळ चर्चेची नाही.

**श्री.केशव सोनवणे :** मुबंई प्रांतीक मनपा अधिनियमाध्ये अमेंडमेंट होत असते तेव्हा त्याच्या प्रति जर आम्हाला दिल्यास अशा प्रकारचे प्रश्न उदभवणार नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला नसता परंतु आपले वकील स.सदस्य श्री.मोहसिन अहमद यांची पत्नी परभणी जिल्हामधून मनपामध्ये बदलीने रूजु झाली त्यामुळे त्याबाबत चौकशी व्हावी.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** दि.८-२-९२ रोजी कु.छायाबाई अशोक सरोदे नावाची मुलगी एका विहिरीत पडून मृत पावलेली आहे तेव्हा तिच्या पाल्याला मनपातर्फे आर्थिक मदत द्यावी सदरील प्रश्न स.सदस्य श्री.जावेद खान यांच्या वार्डातील प्रश्न आहे.

**श्री.रशीद मामु :** स.सदस्य श्री.मोहसिन अहमद यांची पत्ती लग्नापुर्वी नौकरीस होती त्याचप्रमाणे माझा एखदा भाऊ इतर कार्यालयात नौकरीस आहे आणि डेपुटेशनवर या कार्यालयात आला तर ती चुकी झाली असे नाही ना तेव्हा त्या पुर्वीपासून नौकरीस होत्या त्याबाबत मी माहिती देत आहे.

**श्री.रतनकुमारे पंडागळे :** मी केलेल्या सुचनांची नोंद घेतली काय ?

**मा.महापौर :** होय नोंद घेतली मा.आयुक्तांकडे शिफारीस करून पत्र पाठविण्यात आले आहे.

**श्री.केशव सोनवणे :** पाणी प्रश्नावर अगोदर चर्चा व्हावी.

**मा.महापौर :** अता इतिवृत्तावर चर्चा करावी इतर बाबीवर चर्चा सभागृहात कृपया करू नये. अशी मी स.सदस्यांना विनंती करतो.

**श्री.केशव सोनवणे :** मी सुचित केल्याप्रमाणे पाणी प्रश्नावर अगोदर चर्चो व्हावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचविण्यात येते की पाणी आणि लाईट प्रश्नावर सभागृहात यापुर्वी चर्चा झालेली आहे आणि सदरील चर्चा पुन्हा एकदा करावयाची झाल्यास लवकर संपणार नाही तेव्हा अगोदर अजंडयातील प्रस्तावानंतर चर्चो करावी.

**श्री.नामदेव मानकापे :** शहरातील साफ सफाई बाबत आमच्या कडील महिन्यातुन दोनदा सफाई होण्याची व्यवस्था व्हावी.

**मा.महापौर :** करू, तुमच्या सुचनेचा आवश्यक विचार करू.

**श्री.मुजीब खान :** एक चतुर्थश्रेणी कर्मचारी मनपामध्ये कार्यरत होता अचानक हृद्यच विकाराच्या झटकयाने त्याचे निधन झाले त्याच्या मागे लहान मुले आहेत तेव्हा त्याच्या पत्नीस त्यांचे जागी नौकरीस लावुन घेण्याचे करावे त्याचप्रमाणे मनपातर्फे आर्थिक मदत द्यावी.

**मा.महापौर :** आपल्याकडे अनुकंपा धरतीवर वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना सामावून घेता येते त्याचप्रमाणे आर्थिक मदतीबाबत तसे कागदपत्रे कार्यालयात दाखल करावीत नियंमाप्रमाणे प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही होईल.

**श्री.शंकर मगर :** यापुर्वी सोनवणे नावाचा एक ड्रायव्हर कर्मचारी होता त्याचे निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीस अद्यापही लावून घेतल्या गेलेला नाही.

**मा.महापौर :** ठिक आहे तसे पाहून आपणास सांगता येईल.

**श्री.जयवंत ओक :** मागील बैठकित आपण सांगितले होते की माझ्या प्रसावा नुसार मनपामध्ये शव वाहीका व रूग्णवाहीका घेणे बाबत, परंतु त्याबाबत काय कार्यवाही झाली

किती दिवसात येणार आणि अंदाज पत्रकात तशी तरतुद केली आहे काय? याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** पुर्वीचे अंदाजपत्रकात ती तरतुद केलेली आहे आणि कोटेशन मागविले आहे याबाबतचा खुलासा अतिरिक्त शहर अभियंता हे करित आहेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** एक ॲम्बुलन्स येत्या दोन तीन दिवसात येणार आहे आणि शववाहिका जी आहे तिच्या बाबत आपली जुनी वाहीका केल्यानंतर तिच्या बदलयात नविन शववाहिका आपण्याचे प्रयत्न लवकर होणार आहेत.

**श्री.जयवंत ओक :** आम्हाला आश्वासन नको किती दिवसात शववाहीका येणार याची माहिती द्यावी. कारण दोन शववाहीका शहरात असणे आवश्यक असुन लवकर मागविण्या बाबत सभागृहात सुचना करावी.

**मा.महापौर :** नविन शववाहिका घेणे बाबत अंदाघपत्रकात प्रशी तरतुद आहे आणि पुढील एक महिन्यापर्यंत ती येईल.

**श्री.केशव सोनवणे :** सिडको भागामध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नाही केवळ आठ दिवसात तीन वेळेस पाणी येते. आणि वर्तमान पत्रामध्ये भाग १०% ते २०% पाणी वाढवून देण्यात येते अशी बातमी येते प्रत्यक्षात पाणी पुरवठा काहीच होत नाही आणि पेपरला अशा बातम्या का दिल्या जाता याचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा :** परिसर अभियांत्रीकी कार्यालया मार्फत मागे नविन योजने मार्फत पाणी पुरवठा होत होता तो दि.१३-३-९२ रोजी जायकवाडीचा खराब झाल्याने तो अद्यापाही दुरूस्त झालेला नाही आणि आज दुपारपर्यंत रिपेअर होवून पाणी पुरवठा सुरळीत करणार आहेत त्यामुळेच आपल्याला पुर्वीसारखे चा चार स्टेटसूने पाणी पुरवठा विस्कळीत झाल्या त्याचप्रमाणे एम.आय.डी.सी.सिडको कडून पाणी पुरवठा पुरक म्हणून करतो तरंतु एम.आय.डी.सी.ची पाईप लाईन खराब झाल्याने पाणी पुरवठा दोन तीन दिवसरासाठी सुरळीत झालेला नाही.

**श्री.केशव सोनवणे :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी केलेल्या खुलासा हा ८/१० दिवसापुर्वीचा आहे तो योग्य नसुन मागील सभेच्या वेळी सुचित केल्यानुसार सिडाके/हडको येथील दोन लाख नगरवासीयांना २० एम.एल. पाणी देण्यात येणार आहे यापैकी आजुनही कार्यवाही का झालेली नाही याचा खुलासा व्हावा. गेल्या चार महिन्यापासुन पाणी कमी येते. याबाबत चार्ट पहावा.

**कार्यकारी अभियंता :** जायकवाडी कडूप परिसर अभियांत्रीकी कार्यालयाने चालु केलेल्या नविन पाईप लाईनचे पाणी नक्षत्रवाडीपर्यंत येते परंतु आता त्यांच्या पाईप लाईनचे वॉल खराब झाल्याने बंद आहे त्यांनी दोन दिवसापुर्वीच नविन लाईनला जुनी लाईन जोडलेली आहे त्यांचेकडूनच पाणी कमी येते.

**श्री.मुजीब खान :** गेल्या ५/६ महिन्यापासुन करीम कॉलनी व आझम कॉलनी भागात पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याचे मी सुचित केलेले आहे त्याबबात मा.आयुक्तांकडे या संर्दभात मी चर्चा केली आहे मो.रशिीदपुरा येथे गेल्या दहा दिवसापासून अजिबात पाणी येत नाही याबाबत संबंधित कनिष्ठ अभियंता उप-अभियंता तथा कार्यकारी अभियंता यानं वेळोवेळी तक्रार करूनही योग्य ती कार्यवाही त्यांचे कडून झालेली नाही उलट स.सदस्यांनी केलेल्या तक्रारीवर मजाक म्हणून

हसतात हा प्रकार योग्य नसुन एकीकडे नागरीकांची पाण्यासाठी ओरड असुन संबंधित अधिकाऱ्यांनी त्याचे गांभिर्य लक्षात घ्यावयास पाहिजे आणि रशीदपुरा येथील पाईप लाईनचे अंदाजपत्रक मंजुर होवूनही अद्यापही कार्यवाही का झाली नाही याचाही खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा :** रशिदपुरा येथील गार्डनमधील पंपावर एक कर्मचारी असतो.

**श्री.मुजीब खान :** त्या ठिकाणी कुणीही कर्मचारी उपस्थित नसतो तेथील पंप तुटून पडलेल्या स्थितीत आहे तर पाईप फुटलेले आहोत या बाबत तीन वेळेस मा.आयुक्तानी स्वत: संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून सांगितले परंतु कोणतीही कार्यवाही झ ाालेली नाही व फाईल सापडत नाही याचा फटका गेल्या दहा दिवसापासुनचा तेथील नागरीकांना बसतो त्यास जबाबदार कोण ?

**मा.महापौर :** याबाबत चौकशी करण्यात येईल.

**श्री.पांडूरंग पैठणकर :** उद्या परवा होळी धळीवंदनाचा संण असल्याने पाण्याची वेळ काय असणार किती वाजता शहरात पाणी पुरवठा होणार.

**मा.महापौर :** स.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी शंतात राखावी पाण्याच्या संदर्भात मी कालच आदेश काढण्याची सुचना केलेली आहे उद्यान विभागातील कनिष्ठ लिपिक श्री.पहाडीया यांनी त्याबाबत आदेश काढण्याचे कळविले आहे आणि दुपारी एक वाजता संपुर्ण शहरात पाणी पुरावठा सुरळीत होण्याच्या दुष्टीने योग्य व्यवस्था ठेवण्याचे आदेश काढलेले आहेत आता विद्युत मंडळ आणि पाईप लाईन फुटने याचा आमच्याशी काहीही संबंध नाही तरीही विद्युत मंडळास पत्राद्वारे विनंती करून धुळीवंदनाच्या दिवशी सर्वत्र पाबंद राहण्यास कळविले आहे याउलट काही तांत्रिक बिघाड झाल्यास ती जबाबदारी आमची राहणार नाही.

**श्री.सुदाम वाघमारे :** लाईट आणि पाईप लाईन फुटल्यावरून आपण शहरास पाणी पुरवठा करणार नाही काय ? कृपया आपण सुचित केलेले शब्द परत घ्यावे.

**मा.महापौर :** तसे अचानक काही घडल्यास टँकरद्वारे पुरवठा करण्यात येईल.

**श्री.तकिहसन खान :** धुलीवंदन आणि ईद या दोन्हीही सणाच्या वेळी पाणी पुरवठा सुरळीत व्हावा अशी व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.गंगाधर गाडे :** शहरातील पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला आणि ज्या ज्या वेळी अतिदक्षता म्हणून ठिकठिकाणी हापसे बसवून लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली परंतु गेल्या पाच सहा महिन्यापुर्वी मी सभागृहात विचारणा केली होती की शहरात एकूण किती हापसे तयार करण्यात आले त्यापैकी किती बंद व किती चालु स्थितीत आहेत त्याची माहिती विचारली परंतु मला अद्यापाही माहिती देण्यात आलेली नाही तर माझा असा आरोप आहे की नागरिकांचे लाखो रूपये या हापसे संदर्भात खर्च करण्यात आले परंतु शहरात कित्येक ठिकाणी हापसेच बसविल्या गेले नाही जेथे आहेत उदा डॉ.आंबेडकर नगर, क्रांतीनगर आणि गारखेडा परिसर येथील हापसे नादुरूस्त आहेत याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांना माहिती देण्याची सुचना केली परंतु माहिती देण्यात आली नाही तेव्हा लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात गांभीर्य लक्षात घेवून प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. आणि हापसे बाबत चौकशी करण्यात यावी.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांना सुचित करण्यात येते की पाण्याच्या बाबत चर्चा करावयाची असेल तर इतिवृत्त बाजुला ठेवून देतो.

**श्री.गंगाधर गाडे :** म्हणजे पाण्याचा प्रश्न तुम्हाला गंभीर वाटत नाही काय ?

**सौ.लता दलाल :** उन्हाळ्याचे दिवस सध्या येत आहेत त्यामुळे पाण्याचा प्रश्नांवर सदस्यांना बोलण्यास परवानगी द्यावी.

**मा.महापौर :** जर सर्वांना पाणी प्रश्नावर चर्चा करावयाची झाल्यास इतिवृत्त बाजुला ठेवून सभागृहाच्या परवानगीने एका तासाचा अवधी चर्चेत देणेत यावा.

**श्री.गंगाधर गाडे :** कोटला कॉलनी टाकी मधून काही भागांना पाण्याचा पुरवठा करण्यात येतो परंतु सध्याती परिस्थिती लक्षात घेताो या भागामध्ये रात्रीच्या, एक व दोन वाजता लोक गाढ झोपत असतांना पाणी येते तेव्हा याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.कचरू नवपुते :** माझ्या वार्डात बरेचसे हापसे बंद आहेत तर ज्या ठिकाणी नविन हापसे बसविण्याचे ठरविले आहे आणि मनपाने ज्या कॉँट्राक्टरला संबंधित कामे दिलेली आहे त्या कॉन्ट्राक्टरची मशीन सध्या नादुरूस्त आहे त्यामुळष बरेजस कमे खोळविली असुन इतर दुसऱ्या कॉन्ट्राटरला हे कामे देण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** माझी सभागृहाला विनंती की सभागृहाचा वेळे वाया न घालता इतिवृत्ताचे व्यतिरिक्त इतर बाबीवर चर्चा करू नये जर पाणी प्रश्नावर स.सदस्य श्री.गाडे, नवपुते यांना चर्चाच करावयाची होती तर सात दिवसापुर्वी सभेत प्रश्न उपस्थित करून किंवा प्रस्ताव मांडून विषय चर्चेला गेला असता परंतु आता विनाकारण चर्चा करण्यास काहीच अर्थ नाही.

**मा.महापौर :** आता इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी.

**विषय क्रमांक १ :** दि.१९-२-९२ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.केशव सोनवणे :** दिनांक १९-२-९२च्या सर्वसाधारण सभेमध्ये स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे उपस्थित होते काय ? जर उपस्थित नव्होते तर पान क्र.१ मध्ये अनुक्रमांक ११ मध्ये स.सदस्य श्री.घडामोडे यांचे नांव कसे टाकण्यात आले याचा खुलासा व्हावा. अशा प्रकारचे प्रशासनाच्या वतीने सचिवांकडून वारवार चुका होत आहेत. त्याबाबत आपण काय कार्यवाही करणार ?

**सौ.लता दलाल :** सचिवांना मागील बैठकित सुचीत केलेले होते पुन्हा आता चुका झालेला आहेत आश चुका सचिवांकडून वारवार होणे योग्य नसुन त्यांचे लक्ष सध्या या पदावर दिसत नाही तेव्हा त्यांना उप आयुक्त म्हणून पदोन्नती द्यावी.

**मा.महापौर :** सचिवांनी दिलगिरी व्यकत करावी.

**मा.सचिव :** टाईप करीत असतांना नजरचुकीने स्थगित ऐवजी स.सदस्यांचे नांव टाईप केले या चुकीबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो सदरची दुरूस्ती करण्यात येईल.

**श्री.चेनकरण संचेती :** या सभेतील इतिवृत्तामध्ये किती चुका आहेत हे सांगता येणार नाही कृपया इतिवृत्त मध्ये लक्ष द्यावे यामध्ये जास्त चुका झालेल्या असल्याने माझ

याकडील प्रत आपण वाचुन दाखवावी (मा.महापौरांकडे इतिवृत्ताची प्रत यावेळी दिली जाते)

**सौ.लता दलाल :** सचिवांनी इतिवृत्त तयार झाल्यानंतर पुन्हा पडताळणी केलेली दिसत नाही अशा प्रकारच्या सारख्या चुका त्यांचे कडून सतत होत आहेत.

**मा.सचिव :** सायकलोस्टाईल मशीन तांत्रीक दुष्या खराब झाल्याने काही पानामध्ये अस्पष्ट इतिवृत्त दिसुन येते.

**मा.महापौर :** सचिवांनी खुलासा केलेला आहे की की इतिवृत्तामधील पानामध्ये सायकलो स्टाईल मशीनहन विघाड झाल्यामुळष थोडे अस्पष्ट दिसते.

**श्री.प्रकाश जावळे :** माझी एक लक्षवेधी सुचना आहे याबाबत सभागृहात चर्चा व्हावी.

**मा.महापौर :** आता जस्त चर्चा करण्यात येवू नये अगोदर इतिवृत्तावरच चर्चा करण्यात यावी. तुमची सुचना त्यानंतर विचारार्थ घेतली जाईल.

**श्री.प्रकाश जावळे :** अगोदर माझी लक्षवेधी सुचणा एकून घ्यावी शहराच्या विकास कामासाठी एका स्लम घोषित झोपडपट्टी भागातील काही घरांच्या बाबतीत माझी सुचना आहे कृपया आपण यावर चर्चा करावी किंवा खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.प्रकाश जावळे मी माझ्या दालानामध्येच आपल्या सुचने बाबत विचार करू असे सुचित केले परंतु सभागृहात कोणत्याही विषयावर विनाकारण वेळ वाय घालविण्यापेक्षा प्रथमत इतिवृत्तावर चर्चा करून त्यांनतर आपल्या सुचनेवर सर्वानुमते चर्चा करण्यात येईल आणि आपल्याला या बाबत लक्षवेधी सुचने ऐवजी एक प्रस्ताव ठेवावयास पाहिजे होता.

**श्री.प्रकाश जावळे :** मा.महापौर आपला सभागृहाचा वेळ वाया घालवून नये कृपया आपल झ ोपडपट्टी भागातील नागरीकांच्या तक्रारीकडे लक्ष देण्यासाठी सदरची चर्चा घडवून आणावी कारण हा प्रश्न जनतेच्या विकासा बाबतचा आहे.

**मा.महापौर :** जनतेचा विकास आणि झोपडपट्टी भागातील प्रश्नांकडे माझे विशेष लक्ष असेल आपण सुचित केल्याप्रमाणे त्या भागातील नागरीकांच्या च्या तक्रारी आहेत त्याबबत संबंधितांच्या नावाची एक लिस्ट तयार करण्यात आलेली असुन याबाबत प्रशासनाच्या वतीने योग्य ती कार्यवाही होत आहे आणि पुर्ण चौकशी होत आहे.

**श्री.प्रकाश जावळे :** प्रशासनाची जरी ही बाब असली तरी त्याबबत आजच्या सभेमध्ये चर्चा व्हावी आणि भागितलेल्या प्रश्नावर खुलासा द्यावा.

**श्री.बंडू प्रधान :** मा.महापौर ज्यावर चर्चा करण्यासाठी सभागृहात सुचविले जात आहे तो प्रश्न माझ्या वोर्डातील असुन ती माझ्या अखत्यारीतली बाब आहे कारण त्या वार्डातील नागरीकांनी मला या ठिकाणी प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडून पाठविले आहे तेव्हा स.सदस्य श्री.प्रकाश जावळे यांना विनंती की त्यांनी याबाबत जास्त कळवळा न दाखविता एकत्रितपणे बसुन चर्चा करून प्रश्न निकाली काढता येवू शकतो.

**श्री.प्रकाश जावळे :** स.सद्स्य श्री.बंडू प्रधान यांनी आता जे सुचित केलेले आहे की सदरील बाब ही त्यांच्या वार्डातील अखत्यारीतील असुन कुणीही याकडे लक्ष देवु नये परंतु सदरील बाब झोपडपट्टीतील प्रश्नाची असुन झोपडपट्टीच्या नागरीकांच्या समस्या

विषयी सहानुभती असल्याने सदरचा प्रश्न सभागृहात सर्वांचा समतीसाठी चर्चा होण्यासाठी मी मांडला आहे.

**मा.महापौर :** इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी.

**श्री.प्रकाश जावळे :** मी चार दिवस पुर्वी दिलेल्या लाक्षवेधी सुचनेवर चर्चा करावा.

**मा.महापौर :** आपल्या सुचनेवर सध्या चर्चा करता येणार नाही.

**श्री.प्रकाश जावळे :** झोपडपट्टी भागातील गोरगरीब जनतेवर होणाऱ्या अन्यायाबाबत आपण सभागृहात चर्चा घडवून आवश्यासन द्यावे. जेणे करून त्यांच्यावर अन्याय झालेला असेल, त्यांना दिलासा मिळेल. अन्यथा मी सभागृह चालवू देणार नाही.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.प्रकाश जावळे आपल्याला विनंती करण्यात येते की मी माझ्या दालानात आपणास सुचित केलेले होते की या बाबतीत मी सहानुभुतीपुर्वक लक्ष देत आहे आणि ज्या गोरगरीबांवर अन्याय झालेला असेल त्यांचे बाबतीत योग्य ती चौकशी करून त्यांना न्याये मिळवून देण्याचा प्रयत्न राहील याबाबत. प्रशासनातील सहाय्यक आयुक्त यांनी यासाठी आदेश काढलेले असुन त्या झोपडपट्टी भागातील रस्ता रूंदिकरणामध्ये काहीची घरे होती तर काहीची उघडे प्लॉट (जागा) होती त्यासर्वांचे १५/१६ व्यक्तीचे कागदपत्रे मागविण्यात (पाहण्यात) येत असुन त्यानंतर संबंधित कागदपत्रे योग्य असल्यास मा.आयुक्तांकडे शिफारस करून पाठविण्यात येतील यामध्ये कूणावरही अन्याय लादल्या जाणार नाही तर स.सदस्य प्रकाश जावळे, बंडू प्रधान व मुजिब आलमशाह खान यांनाही सोबत चर्चेस बोलावून प्रकरण मिटविता येईल.

**श्री.बंडूप्रधान :** सदरचा प्रश्न माझ्या वार्डातील असुन यामध्ये कुणीही नाक खुपसीपणा करू नये या भागातील गोर गरिबावर जो काही अन्याय झालेला असेल त्याबाबत कोणत्याही प्रकारे पक्षपातीपणा केला जाणार नाहीत याबाबत विचारपुर्वक निर्णय झालेला असुन विकास कामाध्ये जाणून बुजून अडथळे निर्माण करण्यात येत आहेत यापुर्वी स.सदस्य श्री.जावळे यांना संगितले होते की आपण लक्षवेधी सुचना ठेवू नका तत्पुर्वी मा.आयुक्त, मा.महापौर यांचेशी चर्चा करून योग्य निर्णय निधू शकेल परंतु तसे न होता या ठिकाणी राकारण खेळू पाहत आहेत ते योग्य नाही.

**मा.महापौर :** ठिक आहे याबाबत चौकशी करून माहिती देण्यात येईल.

**श्री.प्रकाश जावळे :** स.सदस्य श्री.बंडू प्रधान यांनी सभागृहात केलेले बेजबांबदार वकतव्य असुन त्यांना आपण ताकिद दिली पाहिजे कुणीही कुणाच्या वार्डात दखल देणार नाही परंतु अशा प्रकारे सदस्यांचे वकतव्य असल्यास ते सभागृहात अशोभनीय असे असुन सभागृहाने त्यांना समज दयावी मी कुणाच्याही वार्डात नाक खुपसेपणा करीत नसुन संबंधित वार्डातील काही मंडळी मनपामध्ये आली आणि त्यांनी माझ्याकडे तक्रार केली त्यावेळी आपण सुचित केल्याप्रमाणष मी संबंधित वार्डात जावून पाहणी केली व ज्यावेळी खराखरच त्यांच्या आपल्याला भेटलो हे मी आपल्या माहितीस्तव सांगतो तेव्हा स.सदस्यांनी अशा प्रकारचे वकाव्य करणे योग्य नसुन त्यांना योग् ती समज द्यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे ताकिद देण्यात येईल.

**श्री.मुजीब आलमशा खान :** रस्ता रूंदिकरणामध्ये रोषनगेट येथील ९/१० टपऱ्या हटविण्यात आल्या होत्या त्यांना पर्यायी ठिकाणी जागा देण्याचे आवश्वासन देण्यात आले होते संबंधित मालमत्ता विभागाकडे चौकशी केली असता वेगवेगळे कारणे सांगितले जातात याबाबत काय झाले याची चौकशी करून संबंधित टपरी धारकांसाठी योग्य ती कार्यवाही व्हावी .

**मा.महापौर :** चौकशी करण्यात येईल.

**श्री.अजिज जहागिरदार :** इतिवृत्तातील पान क्र.३० मधील प्रस्ताव क्र. ११५/११ च्या ठरावामध्ये दुरूस्ती करण्यात यावी. सदरील ठरावामध्ये शहरातील मंदिरे मस्जिदे, गुरूद्वारा व चर्च या धार्मिक स्थलांमध्ये निवासी घर व दुकान आहेत त्यांनाही कर मुक्त करण्यात यावे ज्यामध्ये मंदिरे, गुरूद्वारा, चर्च यांची धर्मादाय आयुक्नांडे रितसर नोंदणी (पंजिकृत) झालेली असेल त्याची पाहणी करावी तसेच ज्या ठिकाणी मस्जिद असेल त्यांची वक्फ बोर्डा यांचेकडे रितसर नोंदणी आहे काय याची पाहणी करून अशांनाच करमुक्ता करण्यात यावे.

**श्री.शंकर मगर :** बऱ्याचशा मंदिराची मस्जिीदची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेली नाही आणि अशांना जर मालमत्ता कर लावला तर भरणार कोण ?

**श्री.मुजीब खान :** सदरील ठरावामध्ये दुरूस्ती करावयाची आहे. ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** शहरातील मंदिरे, मस्जिदे, गुरूद्वारा, चर्च आहेत त्या सर्वांच्या बाबतीत निवासी घरे किंवा व्यवसायीक दुकाणे असल्यास त्यांना करमुक्त करण्यात यावे अशी दुरूस्ती करण्यात येते.

**श्री.मुजीब खान :** इतिवृत्तातील पान क्र.२६ व २७ मधील प्रस्ताव क्र.११३/९ मंजुर झालेला असुन या बाबत माहिती सभागृहात देण्यात यावी संबंधितांना याबाबत आपण तशी सुचना केलेली असून त्याप्रमाणे खुलासा व्हावा कारण एस.टी.कॉलनीतुन जाणारा रोड हा १०० फुटी असल्याने त्याप्रमाणष कार्यवाही झालेली नाही तेथील सुटलेल्या जागे बाबत मा.आयुक्त स्वतःच्या अखत्यारीत भुमिसंपादन करून कार्यवाही करू शकतात परंतु तसे झालेले नसुन याबाबत माहिती द्यावी.

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक नगररचना आणि अतिरिक्त शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक नगर रचना :** एस.टी.कॉलनीचे रेखांकन डिसेंबर १९८६ मध्ये मंजुर झालेले आहे त्यामधील प्लॉट नं.७७ मधील १०० फुट जागा रोडसाठी जागा ताब्यात घेतलेली आहे.

**श्री.मुजिब आलमशा खान :** नगर रचना विभागात या संमत झालेल्या ठरावाची माहिती घेण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी इतिवृत्त कायम करते वेळी आपल्याला माहिती देण्यात येईल असे सांगीतले त्यामुळे संबंधित विभागाकडे कोणत्याही स्वरूपाची माहिती उपलब्ध नसुन नकाशा प्लॅान वगैरे त्यांचेकडे काहीही नाही यामुळे असे दिसुन येते की स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती अशिरा मिळाल्यास काही वाढत नाही पर मा.महापौर यांनी निर्देशीत केलेल्या व इतिवृत्तात लिहिलेल्या वाकया प्रमाणे संबंधित अधिकारी माहिती देत नाही म्हणजे या ठिकाणी केवळ प्रस्ताव मंजुर करून काहीही नसुन त्याची अमलबजावणी व माहिती देणे आवश्यक आहे अन्यथा सभागृहाचा अपमान होय.

**सहाय्यक संचालक नगर रचना :** एस.टी.कॉलनीचा रस्ता जो आहे तो १०० फुटी आहे यामध्ये एका बाजुला एस.टी.कॉलनी व दुसऱ्या बाजुला त्रिमुर्ती सोसायटीचा ले-आऊट आहे त्यापैकी कुढल्यातरी सोसरयटीचा डेमार्टकेशन केलेला असल्याने त्या ठिकाणी हत्तीसिंगपुरा येथील जागा शिल्लक असल्याने ती मधली जागा एकवायर करा असे एस.टी.कॉलनीचे प्रस्ताव दिलेला आहे त्याचे जे डेमूर्केशन त्यांनी करून घेतले तर डी.एल.आर कडून आणि नेमल्या कुठल्याही सोसायटीने ती जागा जास्तीची सुटली आणि १०० फुट जागा रस्ता जागेवरती घेवून ताब्यात घेवून केलेला आहे नंतर दुसरा जो रस्ता याच प्रस्तावात सुचविलेला आहे त्यापैकी सिडकोने एक रस्ता तयार केलेला आहे आणि एक डी.पी. मध्ये आहे सिडकोच्या रस्त्याला आपण रस्ता जोळ्याने त्यात चांगले झालेले आहे असा प्रस्ताव मंजूर झालेला आहे तर सर्व्हे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**श्री.मुजीब खान :** संबंधित अधिकाऱ्यांनी जो खुलासा केलेला आहे त्याप्रमाणे त्यांनी आतापर्यंत कोणतीही चौकशी केलेली नाही तर या ठिकाणी प्रस्ताव मंजूर करूनही अमलबजावणी होणे आवश्यक असुन सदरील जागेवर संबंधित अधिकारी यांनी जावून कधी चौकशी केली आहे काय ? उलट या रोडवरील एका सोसायटीची जागा एकवायर करणे बाबत डेमार्केशन करण्यात आला ज्यामुळे रोडची जागा सुलभ व सरळ झाली असती त्याच प्रमाणे पाणी, ड्रेनेजची पाईप लाईनसाठी आज अडचणी आल्या त्या अडचणी कायमच्या मिटण्यासाठी मा.आयुक्तांनी मंजुरी दिली परंतु नगररचना विभागाकडून संबंधित जागेच्या मालका बरोबर काही तडजेड होवून ती जागा तशीच राहीली व आज रस्ता तसाच पडलेला आहे तेव्हा तेथील १०० ते ५०० स्केअर फुट जागा एकवायर करून नगर रचना विभागाने कार्यवाही करण्यासाठी मा.आयुक्तांनी स्वतःच्या अधिकाराने करावे. अशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे जी जागा अडचणीत येत आहे ती जागा एकवाय करून प्रश्न सोडविण्यात यावा.

**श्री.अलफखान :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये ज्या विषयावर चर्चा करीत असतांना सभा कोरम अभावी संपविण्यात आली तर त्यानंतर दुसरी सभा ज्यावेळी होत, त्यावेळेस सचिवाचे काम असते की मागील सभा कोणत्या विषयावर चर्चा सुरू असतांना संपली तोच विषय इतिवृत्तानसुार या सभेसमोर प्रथमतः ठेवावा ही बाब फार महत्वाची असुन यापुढे लक्षात ठेवावयास पाहिजे जसे स.सदस्य श्री.मुजीबखान यांनी सुचित केले की जागा एकवायर करण्यासंबंधी अशाच प्रकारचा मागील सभेतील प्रस्ताव चर्चेस होत व कोरम अभावी सभा संपल्याने तो तसाच राहिल सांगण्याचा मुद्दा म्हणजे शहरातील अशा किती जमीनी आहेत की त्या खुल्या पडलेल्या आहेत त्यावर अतिक्रमणे झालेली आहेत अशा जागेवर एकवायर करणेसाठी वा योग्य ते संरक्षित करणेसाठी एका उप-अभियंता पदाची आवश्यकता असुन ज्यामुळे मनपाला सर्व माहिती व्यवस्थीत ठेवता येईल व कोणतिही अडचण राहणार नाही यासाठी तसा प्रस्ताव आजच्या सभेमध्ये पुन्हा

विचारार्थ ठेवलेला नाही किंवा प्रशासनाने ही ठेवलाला नाही आपण दखल द्यावी व तशी सुचना करावी.

**मा.महापौर :** दोन्ही पॅकी कोणताही प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**श्री.नरेंद्र पाटील :** इतिवृत्तातील पान क्र.८ मध्ये स.सभासद श्री.केशव सोनवणे यांचे वकतव्यात मालमत्ता कराच्या संदर्भात स.सभासद श्री.घडामोडे, श्री.पाटील आदि असे वाकय आहे या ऐवजी आणि या शब्दाची दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** ठिक आहे आदी ऐवजी आणि या वाकयाची दुरूस्ती करण्यात येते.

**श्री.बंडू प्रधान :** इतिवृत्तातील पान क्र.३२ मध्ये माझ्या वाक्यात आरोग्य विभागातील वर्ग-१ व वर्ग-२ चे पदास मंजुरी देण्यात येईल व सदरील प्रस्ताव प्रशासना मार्फत पुढील बैठकित येईल असे सुचित केलेले आहे तशी दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** स.सदस्य श्री.बंडू प्रधान यांनी सुचित केलेल्या वाकयाची दुरूस्ती करण्यात येते.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** मागील सभेतील पान क्र.३०, ३१ व ३२ मधील विषय क्र. ११७/१३ अन्वये उप आयुक्तांच्या दोन पदास मंजुरी देउन सहा महिन्यासाठी तात्पुरते पदे भरण्यात यावे. व ते शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव पाठवावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** ठिक आहे तात्पुरते सहा महिन्यासाठी उप आयुक्तांची दोन पदे भरून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव पाठवावी.

**श्री.केशव सोनवणे :** सदरील बाब मा.आयुक्तांच्या अखत्यारीतील असल्याने तात्पुरते सहा महिन्यासाठी पद भरून शासनास मंजुरीसाठी पाठविता येते.

**श्री.बंडू प्रधान :** ठिक आहे, सदरील पदे भरित असतांना आरोग्य विभागातील वर्ग-१ व वर्ग-२ चे ही पदे प्रशासनाने भरावीत.

**मा.महापौर :** सदरची बाब प्रशासनांची असल्याने मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** आजचा जो विषय उप आयुक्तांचे दोन पदाच्या बाबतीत सहा महिन्यासाठी जागा भरण्याच्या संर्दभात चर्चेला आलेला आहे तर सदरील प्रस्ताव शासनाकडून मंजूर होवून आल्याशिवय पदे भरता येणार नाहीत ही वर्ग-१ ची पदे आहेत मोठी पदे आहेत सही मिहने आपण भरले आणि सहा महिन्या नंतर पुन्हा त्या कंटीनीव झाल्या नाही तर पुन्हा त्या आपल्याला रिव्हर्शन करता येईल त्यासाठी अगोदर शासनाची मंजूरी घ्यावी लागते.

**श्री.बंडू प्रधान :** आपल्याकडे आरोग्य विभागात वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे सध्या रिक्त आहेत त्या त्वरीत भरणेसाठी मा.आयुक्तांना सुचविण्यात यावे.

**श्री.प्रकाश जावळे :** मा.आयुक्त यांनी दोन उप-आयुक्तांच्या पदा बाबत जो खुलासा केलेला आहे त्यामध्ये सहा महिन्यासाठी तात्पुरत्यास्वरूपात पदे भरून घ्यावीत आणि प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव मंजुर झाल्यानुसार शासनाकडे पाठपुरावा करावा.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** मला हेच सांगावयाचे आहे की सध्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे आता तात्पुरते सहा महिन्यासाठी मा.आयुक्तांनी पदे भरून घ्यावीत आणि सहा महिन्या पर्यंत शासनाकडे पाठपुरावा करून पदे मंजुर करून आणता येतील.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव सदस्यांकडून मांडलेला आहे प्रशासना तर्फे नाही मा.आयुक्त यांनी असे सुचित केलेले आहे की शासनाची मंजुरी आल्या शिवाय पद भरता येणार नाही तेव्हा सदरील प्रस्ताव मंजुर झालेला आहे तो शासनाकडे पाठविण्यात येईल व मंजुरी आल्यानंतर भरण्यात येईल.

**मा.आयुक्त :** स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणष उप आयुक्तांचा प्रस्ताव यापुर्वीच शासनाकडे सादर झालेला आहे जवळ जवळ दिड वर्षा पुर्वीच मंजुरीस्तव शासनाकडे गेलेला आहे आणि पुन्हा हा उप आयुक्तांचा अतिरिक्त प्रस्ताव मंजुर केलेला आहे त्यामुळे जुनाच प्रस्ताव मंजुर होवून आलेला नाही.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** सहा महिन्यासाठी पदे भरून शासनाकडे प्रशासनाने वेळोवेळी पाठपुरावा करावा जर प्रशासनाने पाठपुरावा केला तरच शक्य आहे नसता शासनाकडून मंजुरीसाठी वाट पहावी लागेल याचे उदा : द्यावयाचे झाल्यास नगर रचना विभागातील विकास कामा बाबत लागणाऱ्या पदास मंजुरी मिळण्यासाव प्रस्ताव मंजूर करून पाठविलेला आहे तो अद्यापही शासनाकडून मंजुर होवून आलेला नाही त्याच प्रमाणे नविन विकास आराखडयाचे प्लॉन मंजुर झालेला आहे परंतु त्याच्या प्रति आपल्याकडे अजुनही शासनाकडून आलेल्या नाहीत यासाठी मा.आयुक्तांनी स्वत: मनावर घेवून पद भरण्याची कार्यवाही करावी व शासनाकडे पाठपुरावा करावा.

**मा.महापौर :** ठिक आहे तसे मा.आयुक्तांना संबंधित प्रस्तावा बाबत वेळोवेळी शासनाकडे पाठपुरवा करण्या बाबत कळविणेत येईल आणि तसे जातीने लक्ष घालण्यात येईल.

**श्री.बंडू प्रधान :** या प्रस्तावा बरोबर पुर्वी प्रस्ताव मंजूर झालेला प्रकल्प संचालक व उच्च श्रेणी लघु लेखक यांचाही प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**मा.महापौर :** ठिक आहे मी बघतो काय आहे ते आता विषय क्र.१ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

(१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.१ मध्ये स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे यांचे सभासदत्व दि.३१-१-९२ पासुन तीन महिन्या करिता स्थगित करण्यात झालेले आहे त्याचे नांव नजर चुकीने इतिवृत्तात आलेले आहे ही दुरूस्ती करण्यात येते. (२) इतिवृत्तातील पान क्र.३० मधील प्रस्ताव क्र.११५/१० च्या ठरावा मध्ये शहरातील मंदिरे, मस्जिद, गुरूद्वारा, चच; आहेत त्या सर्वच्यिा बाबतीत निवासी घरे किंवा व्यवसायक लुक असल्यास त्यांना महापालीकेचा कर आकारण्यात येवू नये अशी दुरूस्ती करण्यात येती. (३) पान क्र.३२ मध्ये आरोग्य विभागातील वर्ग-१ व वर्ग-२ चे पदे भरण्यास मंजुरी देवून प्रशासनातर्फे पुढील बैठकित प्रस्ताव हे शासनाकडे कळविण्यात येईल अशी दुरूस्ती करण्यात येते.

या व इतर दुरूस्त्यासह दि.१९-२-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२ :** (अ) मुल्य निधार्रण अधिकारी-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की घोषित झ ाोपडपट्टी मध्ये पी.आर.कार्ड टोच नकाशा रजिस्टर्ड खरेदीखता अभावी नामांतर करता येत नाही.

शासनाचे पत्र क्र.एस.सी.एस.१०८८/सी.आर-१९३५ का-७ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि.३६-५-१९८८ अन्वये श्रेणीवाढ योजनेत समाविष्ठ झालेल्या किंवा होणाऱ्या भषना झालेल्या व अनधिकृत झोपडयांचे हस्तांतरण (निवासी व अनिवासी झोपडया) झ

ाले असल्यास सदर हस्तांतर कायदेशीर (नियमती) करण्याच्या दुष्टीने खालील प्रमाणष हस्तांतरण (तबदिल) शुल्क आकारण्यात यावा.

(१) केवळ निवासी वापरासाठी असलेल्या झोपडीचा हस्तांतरण करिता किंवा अनाधिकृत रहीवासी नियमीत करण्या करिता रूपये ५००.००/-

(२) ज्या झोपडयाच्या वापर हा निवासी कारणासाठी व अंशता दैनंदिन जिवनाशी निगडित असलेल्या अनिवासी कमर्शियल कारणासाठी उप धान्य दुकान गिरणी सलन भाजी पाल्याची दुकाने व छोटे हॉटेल इत्यादिसाठी होत असेल तर रूपये १०००/-

(३) अनिवासी कमर्शियल कारणासाठी संपुर्णपणे वापर होत असलेल्या झोपड्या करिता रूपये २५००/-

तसेच ज्या झोपडया श्रेणीवाढ योजनेत समाविष्ठ नाहीत त्यांचे बाबत.

१) निवासी वापर झोपडीस रूपये ५०००/-

२) अनिवासी झोपडीस रूपये १०,०००/-

ब) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम २ चे पोट नियम (३) मध्ये मालकी हक्काचे नामांतरा संबंधी असा उल्लेख आहे की, अशी नोटीस ज्या जागे संबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत नोटीसच्या तारखेस देय असलेला मालमत्ता कर भरण्यात आला नसेल तर आणि स्थायी समीतीची नोटीस वेळोवेळी विहीत करेल अशी फी भरण्यात आली नसेल रित्या देण्यात आली आहे असे मानले जाणार नाही पैकी नोटीसच्या तारखेपर्यंत देय असलेला मालमत्ता कर भरल्यानंतर व खालील प्रमाणे नामांतर करण्याची पद्दत आपल्या कार्यालयात आहे.

(१) रूपये १५.०० शहर भुसंपादन कार्यालयात नामांतराची नोंद झालेल्या तारखेपासून आपल्या कार्यालयात नामांतरासाठी ३ महिन्याचे आत कार्यवाही दाखल केलेल्या प्रकररणासाठी.

(२) रूपये ३०.०० तिन महिन्याचे नंतर दाखंल केलेल्या प्रकरणासाठी

वरील दर हे दिनांक १-८-८७ पासुन आमलांत आले आहेत महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडण्यासाठी खालील नामांतर फी प्रस्तावीत आहे.

(१) करयोग्य मुल्य रूपये ५०० पर्यंत रूपये ५०.००

(२) करयोग्य मुल्य रूपये ५०० ते ५००० पर्यंत रूपये १००.००

(३) करयोग्य मुल्य रूपये ५००० ते ५०,००० पर्यंत रूपये २००.००

(४) करयोग्य मुल्य रूपये ५०,००० ते १००,००० पर्यंत रूपये ३००.००

(५) करयोग्य मुल्य रूपये १००,००० व त्यापुढे रूपये ३००.००

तरी वरील प्रमाणे हस्तांतरण शुल्क व नामांतर शुल्कचा प्रस्तवित प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवादः**

**श्री.अलफखाँ :** प्रशासनाने ठेवलेला प्रस्तावबाबत दि.१-१-१९८६ सन १९८८चा शासनाचा जो जि.आर.आहे ते सर्व स.सभासदांच्या माहितीसाठी त्यांना त्याच्या प्रति देण्यात याव्यात ज्यामुळे त्यावर विचार विनिमय करून चर्चा करता येईल. तर याच प्रस्तावातील (ब) चा प्रस्ताव जो आहे सेक्शन ९९ अन्वये स्थायी समिति मार्फत ठेवावा ज्यामध्ये महापालीकेच्या आर्थिक उत्पनाची बाब आहे.

**श्री.बंडूप्रधान :** नामांतरासाठी जी फी रूपये ५००/- आकारण्यात येणार आहे ती जास्त असुन रूपये १५०/- करण्यात यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** स.सदस्य श्री.अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे ज्या सन १९८६ व १९८८ चे जि.आर च्या प्रति सर्व स.सदस्यांना वाटप कराव्या आणि तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा.महापौर :** सर्व स.सदस्यांना संबंधित जि.आर च्या प्रति माहितीस्त्व प्रस्ताव क्र (अ) नुसार वाटप करण्यात यावा तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो तर याच प्रस्तावातील (ब) हा महापालीकेच्या उत्प्नाच्या (आर्थिक बाबत) बाब असल्याने स्थायी समिती मार्फत सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

**श्री.शंकर मगर, श्री.प्रकाश जावळे :** बऱ्याच दिवसा पासुनचा लोकांचा प्रश्न भेडसावीत आहे ज्यामध्ये नामांतर,टॅक्स,आकारणी होत नाही यासाठी आपण प्रस्ताव रद्द करू नये तर प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला आहे ज्या सर्व गुटीची पुर्तता करूनच ठेवलेला आहे तेव्हा झोपडपटी भागातील बऱ्याचशा समस्यां या प्रस्तावा अभा थांबलेला असल्याने तो केवळ जि.आर चे आधारे स्थगित न करता मंजुर करून घ्या.

**मा.महापौर :** सदरचा प्रस्तावाची सर्व स.सभासदांना पुर्ण माहिती होण्यासाठी जि.आरच्या प्रति वाटप करून पुढील बैठकित घेता येईल तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवायात यावा असे सभागृह नेता यांनी सुचित केलेले आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** माझी एक सुचना आहे की या ठिकाणी टॅक्स प्रश्न आलेला आहे तर मो.नारेगांव येतील बऱ्याचशा नागरीकांना खरेदीखत व राजिस्ट्रीच्या आधारे टॅक्स लावलो आहे तर रजिस्ट्रेशन झालेले असुनही नामांतर होत नाही याचे कारण काय अशा बऱ्याचश फाईली कार्यालयात पडून आहेत.

**मा.महापौर :** ते पाहून सांगता येईल.

**श्री.शंकर मगर :** मा.महापौर आपण म्हणता सभागृहाचा वेळ वाया घालवू नका कुणी पाण्या विषयी बोले त्यांना व झोपडप्टीचा विषय असला त्यांन बोलता म्हणजे आपणास चर्चा कोणत्या प्रकार केल्यास सभागृहाचा वेळ मिळेल. आपल्याला कुणा विषयी आस्था आहे.

**श्री.म.ईस्माईल :** शहरातील झोपडपट्टी भागातील प्रश्ना बरोबर इतर भागातील गरीब बस्त्या आहेत ्यानाही टॅक्सचा प्रश्न भेडसावतो आपल्याकडे काही ठिकाणी अनाधिकृत घरे बांधलेली आहेत ती जूनी आहेत त्याला ५/६ वर्षाचा कालावधी लोटलेला आहे अशा वस्त्या इंदिरानगर, किराडपुरा या ठिकाणी झालेल्या आहेत आता त्या वस्त्या आता पूर्णपणे विकसीत होत आहेत परंतु आपले नगर रचना विभाग, मालमत्ता विभागास सुचना करते की अर्जाधिकृत घरे पाडण्यात यावी म्हणजे जी घरे नव्याने अनधृिकत बांधकाम होतात त्यांना जर थांबविले तर काहीच हरकत नाही परंतु ज्या बस्त्या बऱ्याच दिवसा पासुन अस्त्विात आहेत त्यांना रेगुलराईज करण्याचे प्रयत्न व्हावेत आणि पुरेशा सवलती उपलब्ध व्हाव्यात याकडे सभागृहाने लक्ष देवून कार्यवाही करावी जो पर्यंत पुर्ण चर्चा होत नाही तो पर्यन्त.

**श्री.अजिजुल्ला बेग :** स.सदस्य, श्री.म.ईस्माईल यांनी सुचित केल्या प्रमाणे जी अनाधिकृत घरे आहेत आणि ती जुनी आहेत त्यांना आपण रेग्युलरराईजड करण्या बाबत आता यावर चर्चा चालूच आहे तशी चर्चा करावयाची असल्यास सदस्यांना परवानगी द्यावी.

**मा.महापौर :** नाही प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे व तो पुढील बैठकित ठेवण्यात येईल परंतु ज्या स.सदस्यांना आपले विचार मांडावयाचे असुन त्यांनी सुचना मांडाव्या तो त्यांना अधिकार आहे.

**श्री.म.ईस्माईल :** शहरातील आरक्षित जागेवर आणि नव्या अनाधिकृत बांधकामावर प्रशासनाने काय काय करावयाची ती करावी परंतु ज्या वस्त्या जुने आहेत आणि त्यांच्याकडे सर्व सुविधा उपलब्ध होत आहेत अशा गरीब वस्तयांना आपण योग्य ते सहकार्य करून त्यांना रेग्युलराईजड कसे करता येईल ते पहावे आणि तशी सर्वानुमते व्हावी परंतु घरे पाडण्या बाबत महापालिकेने यांबवाले.

**श्री.रशीदखान (मामु) :** गेल्या १३ वर्षाच्या कारकिर्दी पासुन विकास आराखड्या बाबत शासनाकडून काहीही आले नाही आणि या शहरात दिवसे दिवस घरे बांधल्या जातात त्यासाठी रितासर परवानगी मागितली तर लवकर मिळत नाही सर्व कागदपत्रे मागविल्या जातात जर नविन अराखडाच मंजुर झालेला नाहीत हिरवा पट्टा काय आहे त्याप्रमाणे काय कार्यवाही याची माहितीच मिळत नाही आरक्षणाच्या जमिनीवर किंवा खुल्या जागेवर मग झोपडपट्टया किंवा अनाधिकृत घरे नाही बांधतील तर काय करतील ? आपण म्हणता अधिकृत बांधकाम करा, शासनाकडून तुमचा प्लॉन मंजुर व्हायला उशिर लागतो तुमची कार्यप्रणाीली योग्य नाही तर लोकांना बोलून काहीच अर्थ नाही.

**मा.महापौर :** यासाठी मी अनाधिकृत बांधकाम बाबतची सभा घेतलेली होती तरंपु कोरम अभावे सभा तहकुब झाली आता पुन्हा ती सभा घेण्यात येईल आणि त्यावर योग्य अशी बंधने टाकूण निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

(अ) सर्व स.सभासदांना जि.आरच्या प्रतिवाटप करून पुढील सभेपर्यंत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**विषय क्रमांक ३ :** औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २०-११-८९ ठराव क्रमांक ४८/३ अन्वये गांधीनगर (पदमपुरा) येथील मंजुर विकास योजने नुसार न.भु.क्र.१९५९४ ते १९५९७ या मिळकतिच्या हद्दीपर्यंत ४० फुट रस्त्या ऐवजी ३० फुट रूंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबद्दल करण्याचे ठरविले नुसार दि.५-४-९० रोजी या संबंधी अधिसुचना दैनिक आलमगीर टाईम्स व दैनिक अजिंठा मध्ये प्रसिध्द झाली तसेच दि.२५-७-९१ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभागीय पुरवणी भाग एक अ वरील पान क्रमांक ४७ वर प्रसिध्द झशली या संबंधी एकही सुचना वा हरकती आलेल्या नाही संबंधितांना सुनावणी देण्यात आली अशा प्रकारे वरील अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही पुर्ण केली असुन सदर प्रस्ताव शासणास मंजुरीसाठी सादर करण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**सौ.लता दलाल :** या प्रस्तावातील गांधीनगर येथील संपुर्ण ले-आऊटची प्रत आपल्याकडे आहे काय ?

**मा.महापौर :** सहा.संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**मा.मोरेश्वर सावे :** शहरात एकीकडे विकास कार्य आपण करीत आहोत आणि दुसरीकडे मात्र ४० फुट रस्ता रूंदिकरणा ऐवजी ३० रस्ता करणे योग्य नसुन या प्रस्तावास माझ ा विरोध नोंदवावा.

**श्री.रशीदखान मामु :** मिल कॉर्नर रोड १०० चा ८० फुटी करीत असल्यास आजच पझेशन देण्यात येइेल.

**सहा.संचालक (नगर रचना) :** सि.स.नं.१९५९४ ते १९५९७ याचे वूहतेक ले-आऊट झालेले नाही परंतु स न१९७१ मध्ये सिटी सर्व्हे झालेले आहे या सर्व्हे मध्ये सपरेट प्लॉट अलिले आहेत त्यामुळे रस्ते सिटी सर्व्हे मध्ये आलेले आहेत.

**सौ.लता दलाल :** म्हणजे ले-आऊट मंजुर नसुनही आपण त्या ठिकाणी आहे ते रोड कमी करणे योग्य नये.

**मा.महापौर :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येते.

**ठराव :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक ४ :** औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७३/३ दिनांक १६-१-९० अन्वये मंजुरी विकास योजनेचे जुना बाजार येथीला आरक्षण क्र.११ खुली जागा पैकी ६५१.०० चौ.मी.जागा विना मोबदला महानगरपालिकेने घेवून उर्वरीत आरक्षणा खालील व लागतच्या २० फुट रूंद रस्त्या खालील जमिन वगळून निवास वापरासाठी फेरबद्दल करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मंजूर केलेल्या ठरावा प्रमाणे या संबंधिची अधिसुचना दिनांक ९-१०-९० रोजी दैनिक मराठवाडा व महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभाग पुरवणी भाग एक अ दिनांक ११-७-९१ चे पान क्र.३७/३८ वर प्रसिध्द झाली आहे याबाबत कोणाचेही आक्षेप वा सुचना आली नाहीत हित संबंधितांना सुनावणी देण्यात आली अशा प्रकारे महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही पुर्ण केली असुन प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री.म.इस्माईल :** सदरील प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही परंतु आमच्या निदर्शनास अशाकाही गोष्टी आल्या की विकास कामामध्ये काम करन घ्यावयाची असल्यास नागरीकापेक्षा महापालिकेने योग्य ती त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असते जे काही वादी प्रतिवादी किंवा जमिन मालक असतात अशा बाबत तडजोडीने प्रश्न मिटवून विकासाची कामे करावीत किराडपूर येथील ८० फुट रोड बाबत तेथील काही प्लॉट धारकांनी सहकार्य देण्याचे ठरविले आहे परंतु प्रशासनाने दखल घेतलेली नाही त्यामुळे विकास कामे खेंळंबुन राहतात व विविध अडचणी वेळेवर निर्माण होतात त्यास संबंधित मालक व नगरसेवक यांनी सुचित केल्यास त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.शंकर मगर :** प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही परंतु प्रशासनाने तत्पुर्वी पुर्णपने माहिती सर्व स.सदस्याना देणे आवश्यक आहे की संबंधित प्रस्ताव कोणत्या ठिकाणाचा असुन कोणत्या विकास कामासाठी याचा उपयोग होणार.

**श्री.अजिज जहागिरदार :** संबंधित प्रस्तावावर सन १९९० ला भरपुर चर्चा झालेली आहे आता केवळ मंजुरी मिळावी.

**श्री.शंकर मगर :** सन १९९० ला काय झाले ते आम्हाला माहिती नसुन सन १९९२ ला माहिती द्यावी.

**श्री.अलफखान :** सदरील प्रस्ताव सन १९९०ला मंजुर झालेला आहे आणि वर्तमान पत्रामध्ये तसे जाहिर प्रगटन दिलेले आहे तेव्हा आता नियमाप्रमाणे प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.मोरेश्वर सावे :** सन १९८९-९० किंवा ९१ ला काय झाले याची माहिती घेणे आवश्यक नसुन कोणत्याही वेळी शहराच्या विकास कामा बाबत जे काही प्रस्ताव मंजुरीस्तव सभेमध्ये येतात त्यावेळी त्या प्रस्तावा बाबत सर्व स.सदस्यांना त्या प्रस्तावाची जाणीव राहील शिवाय आलमगीर टाईम्स वर्तमान पत्र सर्वच जन वाचतात अशातीली बाब नाही यासाठी यापुढे तसे लक्षात घेवून कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** ठिक आहे प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व तशी स.सभासद श्री.मोरेश्वर सावे यांनी सुचित केल्याप्रमाणे नोंद घेण्यात येतो व प्रशासनास त्याप्रमाणे ताकिद करण्यात येते की यापुर्वी तशी स.सभासदांना विषयाची नोट लिहून पाठवावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७३१३ दि.२६-१-९० अन्वये मंजुर विकास योजनेचे जुना बाजार येथील आरक्षण क्र.११ खुली जागा पैकी ६५१.०८ चौ.मि. जागा विना मोबद्दला महानगरपालिकेने घेवून उर्वरित आरक्षण खालील व लागतच २० फुट रूंद रस्त्या खालील जमीन वगळून निवास वापरासाठी फेरबद्दल करून महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यात आल्याने प्रस्तावास सर्वनुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५ :** सर्वसाधारण सभा दि.१९-६-९१ ठराव क्रमांक ७/६ अन्वये मो.पन्नालाल नगर येथील आरक्षण क्र.१०५ खुली जागा या आरक्षणा पैकी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जमिनी पैकी ८४२४.०० चौ.मि.जागा रूपये ९०,०००/- प्रति वर्षा प्रमाणे ३० वर्षाच्या भाडेपट्याने देण्यास मंजुरी झाली आहे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, औरंगाबाद यांनी विनंती केली आहे की त्यांना फक्त ५५२५.०० चौ.मी. जागेची आवश्यकता आहे त्यामुळे त्यांनी तेवढया क्षेत्राच्या प्रमाणात भाडेपट्टयाची रक्कम कमी करण्यात कळविले आहे तेव्हा आता ५५२५.०० चौ.मी. साठी रूपये ६०.०००/- प्रति वर्षानुसार आकारणी करून ३० वर्षाच्या मुदतीसीठी भाडेपट्याने देण्यास व आरक्षणाचा ५५२५.०० चौ.मी. साठीच्या उदय महाराष्ट्र राज्य विद्युत मंडलाचे उपकेंद्र असा वापर बदलाण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबद्दल करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री.रशीद खान (मामु) :** अशाच प्रकारची एक खुली जागा पदमपुरा येथील धर्मशाळेला दिलेली आहे आणि त्या धर्मशाळेत महानगरपालिकेचा वॉचमन आहे संबंधित जागेच्या बाबतीत रूपये ५००/- च्या बाँड पेपरवर करार आहे मग ती जागा ताब्यात देण्यास तांत्रिक अडचणी येतात याचे कारण काय ? संबंधित मोची समाज कडून जागा घेवून त्या धर्मशळेस दिलेली आहे त्याचा मोबद्दल दिलेला नाही त्याप्रमाणे या प्रस्तावातील जागा आपली आहे काय ?

**मा.महापौर :** सदरील जागा महानगरपालिकेची असुन लाईटच्या विकास कामा बाबत देण्यात येत आहे प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा दि.१९-६-९१ चा ठराव क्रमांक ७/६ अन्वये मो.पन्नालाल नगर येथील आरक्षण क्र.१०५ खुली जागा या आरक्षणापैकी महानगरपालिकेच्या ताबयत असलेल्या जमिनी पैकी ८४२४.०० चौ.मि.जागा रूपये ९०,०००/- प्रति वर्षा प्रमाणे भाडेपट्याने दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ औरंगाबाद यांच्या विनंती नुसार फक्त ५५२५.०० चौ.मी. जगेची आवश्यकता असल्याने ६०,०००/- रूपये प्रति वर्षानुसार आकारणी करून तिस वर्षाच्या भाडेपट्याने देण्यास व आरक्षणाचा ५५२५.०० चौ.मी.साठीच्या उद्देश महाराष्ट्र  राज्य विद्युत मंडळाचे उपकेंद्र असा वापर बदलण्यास महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबद्दल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्रमांक १ :** महानगरपालिके मध्ये गेली चार पाच वर्षा पासुन पाच कर्मचारी तृतीय श्रेणी मध्ये रोजदारीवर काम करित आहे त्यामध्ये अपंग सुध्दा असुन त्या सर्व लोकांना कायम स्वरूपी नौकरी मध्ये घेण्यात यावे.

सुचक : श्री.रशीद मामू
अनुमोदक : श्री.विठ्ठल पेरकर
दिनांक १२-१२-९१

**संवाद :**
**श्री.प्रभाकर विधाते :** अनुमोदक नाही प्रस्ताव रद्द करावा.
**मा.महापौर :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.
**ठराव :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक २ :** वार्ड क्र.४६ समर्थनगर येथील वरद जिमखाना या संस्थेस व युवकांना विविध खेळ खेळण्यासाठी व युवकांना कवायती करण्यासाठी क्रिकेट, व्हॉलीबॉल, कॅरम, कुश्ती, कबड्डी,

खो-खो, जिम्नॉस्टेकस इत्यादी खेळ खेळण्यासाठी जागेची आवश्यकता आहे वरद जिमखाना ही संस्था नोंदणीकृत आहे.

सबब या संस्थेस वार्ड क्र.४६ भाग्य नगर माधील पोस्ट व टेलीग्राफ क्वार्टर मधील महानगरपालिकेची मोकळी जागा देण्यात यावी यासाठी हा प्रस्ताव येत्या सर्वेसाधारण सभेत चर्चेसाठी ठेवावा .

**सुचक :** श्री.मोरेश्वर सावे.

**संवाद :**

**श्री.अजिज जहागिरदार :** सदरील प्रस्तावानुसार ही जागा स.सदस्य श्री.किशोर थोरात यांच्या वडिलांच्या मालकिची आहे. त्यांनी तसे कागदपत्रे माझ्याकडे देवून गेलेले आहेत. त्या बाबत सविस्तव चौकशी केल्या नंतरचे प्रास्तावास मंजुरी द्यावी.

**श्री.प्रदिप कुमार जैस्वाल :** या प्रस्तावांत काही तांत्रिक अडचणी आल्या प्रस्ताव रद्द होईल परंतु प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.अजिज जहागिरदार :** आपण मंजुर कशी करणार.

**श्री.बंडू प्रधान :** सदरील जागा महापालीकेची असल्याने स.सदस्य जी कागदपत्रे दाखवितात ते चुकीचे आहेत.

**श्री.मोहसिन अहमद :** जेव्हा एका सोसायटीला आपण जागा देतो तर दोन वर्षापुर्वी गोल्डन स्पोटसच्या जागेचे पी.आर.कार्ड सर्वसाधारण सभेत मा.आयुक्त यांनी रद्द करण्याची शिफारस केली ज्यावेळी एका सोसायटीला आपण जागा देतो त्यावेळी त्या सोसायटीला रद्द का केले या गोल्डन स्पोटर्सचे मा.महापौर उपाध्यक्ष असुन त्यांचे पि.आर कार्ड रद्द का केले ? या सोसायटीला जर जागा द्यावी आणि जर सोसायटीस जागा द्यावयाची झाल्यास अगोदर गोल्डन स्पोर्टसच्या बाबत विचार व्हावा.

**मा.महापौर :** सभागृहाने निर्णय घ्यावयाच्या आहे त्यावेळी त्या सभागृहाने काय निर्णय घेतला मी काही सांगु शकत नाही परंतु आता सभागृहात एकमताने जो निर्णय होईल तो अंतिम होईल.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या विषयावर चर्चा व्हावी.

**श्री.बंडू प्रधान :** सदरील कागदपत्रे जी सुचविण्यात येत आहेत तो नकली असुन चुकिचे आहेत.

**श्री.अजिज जहागिरदार :** विषयानंतर करण्यात येवू नये याच विषयावर चर्चा व्हावी माझ्याकडे जे कागदपत्रे आहेत त्यानुसार मी वाचुन दाखविते सदरील जागा महापालिकेची नाही जो पर्यंत त्याची चौकशी होत नाही पर्यंत काहीही करण्यात येवू नये.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** महापालीकेची खुली जागा असुन प्रकारे शहरातील खुली जागा बऱ्याचशा हडप करण्यात आल्या आणि विकासासाठी ठेवण्यात आलेल्या जागेवर अतिक्रमणी झालेली आहेत त्यामुळे महापालिकेच्या विकास कामासाठी म्हणून हा प्रस्ताव मंजुर व्हावा.

**श्री.तकीहसन खान :** संबंधित जागा ओपन स्पेप असुन महापालीकेची आहे त्या जागेचे पि.आर कार्ड वगैरे आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.बंडू प्रधान :** याबाबत सहायक संचालक (नगर रचना) यांनी खुलासा संबंधित जागा एकवायर करून वाल कॅम्पाऊण्ड मनपाने करावे.

**सहा.संचालक नगर रचना :** प्रस्तृत जागा ही रेखशंकनातील ओपन स्पेस आहे रेखांकनाच्या खुल्या जागे मध्ये जिन्मास्टिक वगैरे अलाऊड आहे हा फार जुना ले-आऊट असल्यामुळष त्यानेवेळेस हस्तांतरण करण्याची नव्हती ती जागा महापालीकेने ताब्यात झेतली असुन ती रेखांकनाची ओपन स्पेस आहे.

**श्री.मोहसीन अहमद :** ती जागा कुणाच्या मालकीची आहे हयाची माहिती द्यावी.

**श्री.बंडू प्रधान :** महापालीकेने जागा ताब्यात घेवून विकसीत करावी.

**श्री.मोरेश्वर सावे :** सदरील जागा महापालीकेची असुन त्या जागेवर योग्यरित्या संरक्षण न केल्याने अशा सर्व जागेवर अतित्तक्रमाणे होत आहेत कोणत्याही सार्वजनिकहिताच्या उपयोगात आणण्यासाठी अशा जागांना जास्त महत्व आहे अशा दुष्टीकोशतून या ठरावास मंजुरी द्यावी.

**श्री.अलफखॉ हुसैन खॉ :** सदरीची जागा इनामी दिलेली आहे आणि या इनामी जागा संपु शकत नाही अदाए खिदमत म्हणजे खिदमत केल्याने ही जागा इनामी दिलेली आहे जो पर्यंत डिसाईड होत नाही तो पर्यंत काहीही बदल करता येणार नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** आताच सहाय्यक संचालक नगर रचना यांनी केलेल्या खुलासा प्रमाणे ती महापालिकेची खुली जागा असुन त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. त्याही पलीकेडे ज्याला कुणाला कोर्टात जावयाचे असल्यास त्यांनी जावे आता विषयास मंजुरी द्यावी.

**श्री.मोहसीन अहमद :** संबंधित प्रस्तावास आमचा विरोध नाही परंतु अगोदर गोल्डन स्पोर्टस बाबत विचार व्हावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** महापालीकेच्या अशा १७६ ओपन स्पेसच्या जागेपैकी ८७ जागेवर अतिक्रमणे झालेली आहेत हे प्रशासनाच्या चुकीमुळे झाले यास जबाबदार कोण आहे ? सदरची जागा स्पेस असुन ती सोसायटीच्या अखत्यारीत आहे तेव्हा इतरांनी अतिक्रमाण करण्यापेक्षा अथवा सोसायटीच्या विकास करण्यासाठी याचा उपयोग होवू शकतो.

**मा.महापौर :** सोसायटीला १०% जागा विकासासाठी येते देण्यात आणि ९०% जागा

**श्री.प्रदिप जैस्वाल :** नाही आपला गैरसज होत आहे याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक नगररचना यांनी खुलासा करावा.

**श्री.म.इस्माईल :** शहरातील ओपन स्पेस भरपूर आहेत पर अशा ओपन स्पेसच्या बाबतीत काही किंवा सोसायट्या यांनी मागणी जरी केली तरी ती देण्यात येवू नये आन्यथा या वार्डात मोतीवाला नगर येथे पाऊने दोन एकर जमीन ओपन स्पेस आहे ती जागा काही खाजगी संस्थानी मागणी केली तर आपण देणार काय? यापेक्षा महापालीके फक्त काही टक्वारी संस्थेस जागा द्यावयाचे असल्यास ठरवून द्यावे. अन्यथा नाही.

**श्री.अलफ खॉ हुसैस खान :** ज्या सोसायट्यांचे ले-आऊट असेल तशी संस्थेला ९०% ने जागा देता येत बाकी कामासाठी बाकी कुणाला नाही जर संबंधीत संस्था तशी बांधकाम करण्यास तयार असेल तर.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संबंधित सोसायटी तसे बांधकाम करण्यास तयार आहे.

**मा.महापौर :** त्या संस्थेकडे ले-आऊट आहे काय ? ती खुली जागा कशासाठी डेवण्यात आली ?

**श्री.मोरेश्वर सावे :** आज भाग्यनगर मध्ये ५ जागा मोकळ्या आहेत एकदर सहा जागा होत्या एका जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण झालेले आहे राहिलेल्या ५ जागे पैकी सध्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे अता फक्त साडे चार जागा शिल्क आहेत या अनुषंगाने खेळाच्या क्रिडागणासाठी सदरील जागा उपयोगात आणावयाची असुन तसे प्रस्तावात नमुद केलेले आहे आम्हाला कोणत्याही प्रकारचे बांधकाम करावयाचे नाही जर महानगरपालिकेला त्या ठिकाणी क्रिडा विषयक काही करावयाचे असल्यास हरकत नाही तसे विकसीत करायला पाहिजे परंतु महापालीका सिडको सारखे खुल्या जागेवर क्रिडांगणे तयार करीत नाहीत वे कोणताही विकास साध्य करीत नाही. परिणामी एखादे वेळी खुल्या जागेवर झोपडपट्टी अतिक्रमण करून बसल्यास योग्य नसून कीडांगणासाठीच्या जागेचा उपयोग व्हावा

**श्री.महमद इस्माईल :** याची पाहणी करून पुढील बैठकित निर्णय द्यावा असे करावे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** आम्ही त्या ओपन स्पेसच्या जागेवर कोणाप्रकारचे बांधकाम न करता क्रिडागणास विकास करावयाचा आहे त्या ठिकाणी आपले काही लोकप्रतिनिधीच काहीना अतिक्रमण करण्यासाठी वावदेत आहेत हे मी आपल्या नमुद करून देतो.

**श्री.मोरेश्वर सावे :** गेल्या ४ (चार) वर्षाच्या लोक प्रतिनिधीसानिध्यातून आम्हाला अतिक्रमण करावय असते तर आम्ही केले असते परंतु आम्हाला तसे करावयाचे नाही नियमा प्रमाणे काय करायचे तसे आम्ही ठरविलेले आहे त्यामुळे ही जागा क्रिडांगणणासाठी विकसीत करावी.

**श्री.धनंजय गंगाखेडकर :** स.सदस्य श्री.मोरेश्वर सावे, श्री.प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे त्या खुल्या जागे क्रिडांगणाची सोय करून विकसित होत असल्यास आणि कोणतेही बांधकाम होत नसल्यास देण्यास हरकत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** खुली जागा किती एकर आहे आणि प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किती जागेची मागणी आहे याची माहिती व्हावी.

**श्री.मोरेश्वर सावे :** संबंधित जागा किती एकराची आहे याची माहिती नगर रचना विभागाकडे असेल आणि शहरातील ओपन स्पेसच्या जागे बाबत सर्व स.सदस्यांना पुस्तीके नुसार माहिती आहे.

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा सदरील प्रस्ताव स्थगित ठेवऱ्यात यावा.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्ताव स्थगित न ठेवता मंजुर करावा कारण त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे इमारत बांधकाम न करता क्रिडागण तयार करून व्हॉलीबॉल, क्रिकेट व खो-खो इ.खेळ खेळण्याच्या सुविधा करावयाच्या आहेत.

**श्री.मोरेश्वर सावे, श्री.प्रदिप जैस्वाल :** नियमाप्रमाणे आमची मागणी आहे. जर आपला विरोध असल्यास तसे स्पष्टपणे सांगावे त्यास काही हरकत नाही कारण खेळण्याकरिता आणि क्रिडागणासाठी आपण विरोध करता असे स्पष्ट होईल.

**मा.महापौर :** आमच्या विरोध नाही सभागृहाने सर्वानुमते ठरावावे.

**श्री.म.इस्माईल :** जागा देण्यास आमचा विरोध नाही बऱ्याचशा जागा खेळण्यासाठी अतिक्रमणे झ ाली त्यावेळी महापालीकेने काहीही केलेले नाही परंतु प्रस्तावा नुसार या क्रिडीगणासाठी किती जागा पाहिजे याची कल्पना नसुन सदरील जागा किती एकर आहे आणि त्या भागातील लोकसंख्या किती आहे खरोखरच खेळासाठी मैदान विकसित करता येईल काय ? याची माहिती प्रथमत द्यावी आणि नंतर काय करता येईल या कार्यवाही व्हावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** शहरातील बऱ्याच खुल्या जागा आहेत ते अतिक्रमणाने मिळकत केल्या आहेत तर सर्व्हे नं.१५१-५२ च्या बाजुला जी खुली जागा आहे त्यावर प्लॉट पाडून विकल्या जात आहेत यास जबाबदारी कोण ? जर त्या ठिकाणी बांधकाम करीत असल्यास नगररचना विभागाने रोख परंतु क्रिडांगणासाठी जागा विकसीत कराव्याची असुन नियमा प्रमाणे मागणी करीत आहोत म्हणजे एकीकहे अतिक्रमणे होत आहेत तर दुसरीकडे नियमानुसार खेळण्यासाठी जागेची मागणी करीत आहोत.

**श्री.म.ईस्माईल :** जागा किती स्केवअर फुट आहे त्या जागे पाहुणी करून नंतरच निर्णय घेणे योग्य राहील.

**श्री.अजिजुल्ला बेग :** या बाबत मतदान द्यावे.

**श्री.अलफखान :** सदरची जागा सरदार दिलीपसिंग यांची होती त्यानी या सोसयटीस १९६३ किंवा ६५ ला विक्री केली तेव्हा त्या वेळेसच्या रेकॉर्ड करून नगररचना विभागाने त्या ठिकाणी खुली जागा आणि रस्ते या बाबतची माहिती द्यावी. म्हणजे ले-अऊट वरून कळून येईल.

**मा.महापौर :** स.सभासद श्री.अलफखॉ यांनी सुचित केल्या प्रमाणष सदरील जागा फशर जुनी असल्याने त्यावेळेस विक्री केल्यानंतर रजिस्ट्री करते वेळी ओपन स्पेस जागा सोडावी लागत होती परंतु त्या ओपन स्पेसाची नंतर मालक पुन्हा विक्री करीत असे आज तशी पध्दत नसुन शासनाच्या लक्षात आल्याने सोसायटीच्या जागा हया ओपन स्पेसअसल्यास त्या विकसीत कशासाठी करायच्या ते महानगरपालिकेने ठरवावयाचे आहे असे बंधन आहे त्यानुसार मागील रेकॉर्ड वरून ले-आऊटच्या संर्दभात त्याची पाहणी करता येईल.

**श्री.कचरू नवपुते :** सदरील जागेवर बालके विविध खेळ खेळणार असुन बाल क्रिडांगण म्हणून विकसीत करता येईल. या मध्ये विरोध करून नये .

**मा.महापौर :** सदरील जागा कोणत्या आधारे द्यावयाची भाडेपट्याने की लिजवर द्यावयाची या मध्ये उल्लेख नाही.

**श्री.म.ईस्माईल :** संबंधित जागेची कोणत्याही प्रकारची माहिती नगररचना विभागाने दिलेली नसतांना मंजुरी देणे ठिक नाही.

**मा.महापौर :** सविस्तर माहिती संबंधित विभागाकडे नसुन प्रस्ताव तो पर्यंत स्थगित ठेवावा.

**श्री.मोरेश्वर सावे :** आता पर्यंत आम्ही आपल्याशी अत्यंत सहकार्याच्या भावनेने वागलेली असतांना आपण या बाबत थोडासाही विचार केलेला नाही या बाबात आम्हाला खेद वाटतो तर क्रिडा क्षेत्रात आपली महानगरपालिका निष्फळ ठरली असुन आपल्या सारख्यांनी या क्रिडा क्षेत्रात सहकार्याच्या भावनेने पाहणे आवश्यक होते

परंतु काही एक करीत नसल्याने व बेजबाबदारपणे वागल्याने आम्ही आपला निशेधव्यकत करतो (वेळ अंदाजे १.२० वाजता सर्व सेना सदस्यांच्या सभात्याग)

**मा.महापौर :** सविस्तर माहिती पुढील बैठकीत ठेवाची तो पर्यत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सर्व माहिती प्रस्तावात पुढील बैठकित ठेवावा तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्रमांक ३:** मो.राहुलनगर, सादातनगर, सिल्कमिल कॉलनी, हमालवाडा, धनगरवाडा, स्टॅंर्डड कॉलनी, कांचनवाडी, कांचननगर, नक्षत्रवाडी यासर्व वस्त्या महानगरपालिका हद्यीत येतात या वसाहती मध्ये राहणाऱ्या जनतेला जाण्यासाठी पैठण रोड वरील रेल्वे पट्टा ओलांडावा लागतो अशा वेळी रेल्वे इंजिन आल्यास रस्तया वरील गेट बंद करण्यात येते यावेळी रस्ता ओलांडण्यासाठी व्यकतींना बराच वेळ थांबावे लागते ही जनतेची गैरसोय दुर कण्यासाठी रेल्वे कॉसिंगखाली भुयारी मार्ग तयार करणे आवश्यक आहे व हा मार्ग त्यार करणेसाठी ५० टक्के रक्कम महापालीकेने दिलयास भुयारी मार्ग तयार करण्यास रेल्वे खाते तयार आहे रेल्वे कॉंसिंग ओलांडतांना जनतेची गॅरसोय टाळणेसाठी भुयारी मार्ग तयार करणे ही महापालीकेची नैतिक जाबादारी आहे भुयारी मार्ग तयार करणेसाठी ५० टक्के रक्कम रेल्वे खात्यास देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर तरतुद सन १९९२-९३ च्या अर्थसंकलपात ठेवावी.

सुचक : श्री.अजिज जहागिरदार
अनुमोदक : श्री.अलफखॉ हुसैन खॉं,
डॉ.शांताराम काळे
दिनांक : १४-२-९२

**संवाद :**

**श्री.रशीदखान मामू :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा परंतु महापालीकेचा अर्धा पैसा व रेल्वे अर्धा पैसा द्यावा.

**मा.महापौर :** सार्वजनिक बांधकाम खात्याचा संबंधित रोड असल्याने त्यांनीच या बाबत निर्णय घ्यावा. आणि लागणारा खर्च कराव. जर सार्वजनिक बांधकाम खाते काही करायला तयार नसल्यास आपण त्यावर सहानुभूतीपुर्वक विचार करू.

**श्री.अजिज जहागिरदार, श्री.म.इस्माईल :** रेल्वे स्टेशन भागामध्ये अंदाजे १७७ सोसायट्या आहेत त्यामुळे तेथील लोकांना जाण्या येण्यासाठी त्रास होतो तेव्हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.रशीद खान :** मुबंई, पुणे या महानगरपालिका कडून याबाबत माहिती घ्यावी.

**मा.महापौर :** हा प्रश्न सार्वजनिक बांधकाम खात्याचा असल्याने आपल्याशी त्या कामाचा काही एक संबंध नाही तरी ही आपल्याला काही माहिती मिळवायची असल्यास तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

या बरोबरच जन गण मन राष्ट्र गिताने सभा संपली

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३१-३-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभा (अंदाजपत्राकिय) इतिवृत्तात मंगळवार दिनांक ३१-३-९२ रोजी**

**ठिक ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची विशेष सर्व साधारण सभा मा.महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

**या विशेष सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.थोरात किशोर गोविंदराव
२) मा.श्री.यादव अशोक सायन्ना
३) मा.श्री.शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
५) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
६) मा.श्री.पंडागळष रतनकुमार नारायणराव
७) मा.श्री.गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
८) मा.श्री.सोनवणे केशव काशीनाथ
९) मा.श्री.भगुरे तुळशिराम छगन
१०) मा.श्री.सुर्यवंशी महादेव मुंडलीक
११) मा.श्री.पाटील नरेंद्र यादवराव
१२) मा.श्री.म.अयुब गुलाम जिलानी
१३) मा.श्री.प्रधान बंडू गोविंदराव
१४) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
१५) मा.श्री.जावेद हसन खान कासिम हसन खान
१६) मा.श्री.तकीहसन खान कासिम हसन खान
१७) मा.श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतूबुद्दीन
१८) मा.श्री.मिर्झा अनवर बेग हमीद बेग
१९) मा.श्री.ओक जयवंत केशवराव
२०) मा.श्री.गिल इगबालसिंग प्रितमसिंग
२१) मा.श्री.वंजारे पिटर प्रभाकरराव
२२) मा.श्री.अ.रशीदखान (मामू) अ.हमिदखान
२३) मा.सौ.दलाल लता श्रीनिवास
२४) मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२५) मा.श्री.हाजी मोहम्मद हफिजोद्दीन
२६) मा.श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
२७) मा.श्री.कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) मा.श्री.डॉ.संचेती चेनकरण गणेशलाल
२९) मा.श्री.म.इस्माईल अ.करीम
३०) मा.श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग

३१) मा.श्री.मोहसीन अहमद बशीर अहमद
३२) मा.श्री.स.हुसैन स.अहमद
३३) मा.श्री.मगर शंकर जिजाराम
३४) मा.श्री.मानकापे नादेवराव शामराव
३५) मा.श्री.पैठणकर पांडूरंग भिमाजी
३६) मा.श्री.सुग्रीम हरलाल रिडलान
३७) मा.श्री.अलफखाँ हुसेन खाँ
३८) मा.श्री.वाघमारे सुदाम भानुदास
३९) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
४०) मा.श्री.अजिमखान दादामियाँ अ.रहेमान
४१) मा.श्री.शिंदे मधुकरराव माणिकराव
४२) मा.श्री.डॉ.काळे शांताराम यशवंत
४३) मा.श्री.दत्त प्रदिपकुमार एस.
४४) मा.श्री.बारवाल गजानन राकिसन
४५) मा.श्री.जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४६) मा.श्री.जावळे प्रकाश शिवराम
४७) मा.श्री.गाडे गंगाधर सुखदेव
४८) मा.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
४९) मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५०) मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

वंदे मातरम या गिताने सभेस सुरूवात झाली

**संवाद :**

**श्री.गंगाधर गाडे :** सभेला सुरूवात होण्यापुर्वी मी सभागृहाला विनंती करतो की जैन धर्माचे सर्वोच्च आचार्य सम्राट महामुनी श्री.राष्ट्र संत आनंद ऋषीजी यांचे देहावसान झाले आहे तेव्हा त्यांना श्रदाजंली वाहण्यात यावी.

**श्री.शंकर मगर :** त्याच प्रमाणे मुंबई येथील आमदार श्री.विठ्ठल चव्हाण यांची हत्या झाल्याने त्यांनाही सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** दोन्हीही प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** ठिक आहे सभागृहात ००.०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे ००.०२ मिनिटे उभे राहुन स्व.आनंदऋषीजी राजासाब व कै.आ.विठ्ठल चव्हाण यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री.गंगाधर गाडे :** सभागृहात स.सदस्यांनी केलेल्या चर्चेची या ठिकाणी नोंद होते काय ? याची माहिती द्यावी. आज सभागृहा मध्ये बैठक सुरू होण्यापुर्वी येथील ठेप एम्प्लीफायर सहीत चोरीला गेल असे कळले त्यामुळे आजच्या सभेसाठी या ठिकाणी माईकची व्यवस्था आणि स.सदस्यांनी केलेल्या चर्चेची नोंद घेताल्या जाणार नाही परंतु सभागृहतील एम्प्लीफायर सहित टेप चोरीला जाणे म्हणजे हा सभागृहाचा अपमान असुन सहा लाख जनतेच्या कामा करिता या ठिकाणी

सभागृहात स.सदस्य एकत्रीत येतात आणि येथील टेप चोरीला जाणे अशा प्रकारची निंदनिय गोष्ट होणे या महानगरपालिकेस शोभगारी नाही तर ज्या ठिकाणी सभागृह चालते त्या सभागृहातली कोणतिही वस्तु चोरीला जाणे ही बाब हेतुपुरस्सर करण्यात आली असुन यामध्ये प्रशासनाची व्यवस्था ठिक नाही असे दिसु येते तेव्हा आपण याबाबत कोणती कार्यवही करणार किंवा आजची सभा होणार नाही याचा खुलासा व्हावा.

**श्री.अविनाश कुमावत :** सभागृहात इतिवृत्ताची नोंद घेतलया जाते.

**मा.महापौर :** सभागृहातले एम्प्लीफायर सहीत टेप चोरीला गेला या बाबत मला काही मिनिटा पुर्वीच सुचना दिलेली आहे त्यामुळे मी माझ्या दालनात काही स.सदस्यांशी या बाबत विचार विनियम केलेला आहे काही स.सदस्यांनी सुचना केलया की पोलीस तक्रार केलेली अससल्याने त्याची चौकशी होई पर्यंत काही काळ सभा लांबबावी तर काहींनी अंदाजपत्रकिय सभा असल्याने ही सभा होणे महात्वाच असल्याचे सुचित केले त्यामुळे या सभेला प्रशासनाने पोलीस तक्रार केलेली असुन त्याची पोलीसा मार्फत योग्य ती चौकशी करण्यात येणार आहे.

**श्री.गंगाधर गाडे :** माझ्या मते चोरीला गेलेला टेपची हेतुपुरस्परणे चोरी केलेली असुन या बाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

**श्री.अजिज जहागिरदार :** सभागृहातला टेप चोरीला गेलेला आहे परंतु त्याच बरोबर तेथील कॅसटस चारीला गेल्या आहोत.

**श्री.गंगाधर गाडे :** आज जर सभागृहातला टेप चोरीला गेला त्यामुळे सभागृहातली व्यवस्था पुर्णपन कोलमडली उद्याला या ठिकाणा वरून काहीही चोरीला जाऊ शकते अश्याच प्रकारे मागे एकदा औरंगपुरा येथील सुराणा कॉम्पलेक्सच्या ईमारती बाबत प्रश्न सभागृहात उपस्थित केला असता संबांधात फाईल गहाळ झाल्याचे निदर्शनास आले म्हणजे महानगरपालिकेमध्ये कधी कोणती फाईल व कोणते कागदपत्रे कधी गहाळ होतील याची कल्पना येणार नाही अशाच प्रकारे उद्याला जर सभाढहात पारित झालेले ठराव जर चोरीला गेले तरी प्रशासनालाकाही घेणे-देणे नाही असाच त्याचा अर्थ काय ? ( यावेळी काही स.सदस्यांच्या शेम शेमच्या घोषणा)

शहरातील नव्हे तर संपुर्ण सहा लाख जनतेचा प्रश्न या ठिकाणी सोडविता येईल म्हणून एकत्रीत येवून प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जातात तर दुसरीकडे येथील वस्तु चोरीला जातात हे कृत्य निंदनिय असुन याकडे गांर्भियाने लक्ष देणे आवश्यक आहे आणि याची चौकशी हेवुन कार्यवाही करण्यात यावी.

**सौ.लता दलाल :** सहा महिन्या पुर्वाच प्रशासनातील काही फाईली गायब झाल्याची माहिती विचारण्यात आली परंतु त्याबाबत काहीही झालेले नाही तर पुन्हा दुसरे प्रकरण सभागृहातील टेपची चोरी झाली यासर्व बाबी योग्य नसुन याची गांर्भियाने दखल घेणे आवश्यक आहे.

**श्री.गंगाधर गाडे :** सुराणा बिल्डींगची फाईल गायब झाल्याचे यापुर्वीच सुचविण्यात आलेले आहे.

**श्री.पिटर वंजारे :** आता पर्यंत तीन महापौर होवुन गेलेत परंतु त्यांच्या कालावधीत कधीही टेप चोरीला गेलेला नाही परंतु आता टेप गायब कसा झाला ?

**श्री.नामदेव मानकापे :** टेप व कॅसेट चोरीला गेल्याचे निदर्शनास आले तर माझ्या वार्डातील एका कामाच्या संर्दभातील अंदाजपत्रक तयार केलेली फाईलच संबंधित अधिकाऱ्यानी गायब केली याबाबतची चौकशी व्हावी.

**श्री.बंडू प्रधान :** मा.महापौरांच्या दालनामध्ये बऱ्याचशा स.सदस्यांनी आजची सभा अंदाजपत्रका विषयी असल्याने वेळे प्रमाणे घेण्यात यावी अशा सुचना केल्या त्यामुळे ही सभा घेणे महत्वाचे आहे परंतु ठिकाणी स.सदस्य राजकिय भांडवल करू पहात आहेत ते योग्य नाही.

**मा.महापौर :** सर्व.स.सदस्यांना सुचित करण्यात येते की सर्वांनी सभागृहात शांतता बाळगावी सभागृहातील टेप चोरी गेल्या प्रकरणी बऱ्याचशा स.सदस्यांनी मला सुचना कळविल्या की आजची अंदाजपत्रकिय विशेष सर्वसाधारण सभा असल्याने ती महत्वाची आहे तेव्हा मी नवीन एम्प्लीफायर टेप दुकानातून विकत आणण्याची व्यवस्था करणार होते परंतु काही स.सदस्यांनी टेप जरी नसले तरीही सभेला सुरूवात करावी असे सुचित केल्याने सभेला प्रारंभ करण्यात आला अन्यथा ही सभा दुपारून होण्याची व्यवस्था करण्यात आली असती. अता यावर स.सदस्यांनी कोणतेही चर्चा करू नये व अंदाजपत्रकिय सभेतील विषया नुसार चर्चा व्हावी.

**विषय क्रमांक १ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाने सन १९९१-९२ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि सन १९९२-९३ चे मुळ अंदाजपत्रक सर्वकष विरारार्थ सादर.
(सोबत सन १९९१-९२ चे सुधारीत व सन १९९२-९३ चे मुळ अर्थसंकल्प अंदाजपत्रकाची पुस्तीका)

**संवाद :**

(या वेळी स्थायी समितीचे सभापती यांनी मा.महापौरांना अर्थसंकल्प सुधारीत १९९१-९२ व मुळ अंदाजपत्रक १९९२-९३ चे सर्वसाधारण सभेसाठी सादर केले)

**श्री.बंडू प्रधान :** आजच्या अंदाजपत्रकिय सभेला मनपाचे उप महापौर उपस्थित नसल्याने त्यांचा निषेध करित आहे.

**श्री.अजिज जहागिरदार, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.पिटर वंजारे :** सभागृहात उपमहापौरांचा निषेध करणे हा त्यांचा अपमान असुन स.सदस्यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

**श्री.बंडू प्रधान :** उप-महापौर असुन नसल्यासारखे आहोत ते निष्क्रिय असुन त्यांचा निषेध करतो.

**श्री.पिटर वंजारे :** स.सदस्य श्री.बंडू प्रधान यानी उप-महापौरांचा अपमान केला असुन हा सभागृहाचाही अपमान आहे तेव्हा त्यांना सभागृहा बाहेर काढण्याचे आदेश द्यावेत.

**श्री.बंडू प्रधान :** स.सदस्य श्री.पिटर वंजारे यांनी माझ्या बद्दल सभागृहात बोल्याने त्यांनीही माझा अपमान केला तेव्हा त्यांना सभागृहा बाहेर काढावे.

**मा.महापौर :** सन १९९२-९३ चे अंदाजपत्रकात २९५ हजार रूपये शिल्लकी अंदजपत्रक असुन एकूण रूपये ३७८१३६ हजराचे अंदाजपत्रक तयार करण्यात झालेले आसुन

यामध्ये देर्शविण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील तरतुदीत काही दुरूस्ती सुचवावयाची असल्यास त्याबाबत स.सदस्यांनी आपआपले विचार मांडावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पत्रकार कक्षातील पत्रकार बंधूना आजच्या सभेतील विषय पत्रिका व अंदाजपत्रकीय पुस्तीका न दिल्याने ते सभागृहा बाहेर जात आहेत तेव्हा त्यांना पुस्तीका पुरविण्याची व्यवस्था व्हावी.

**मा.महापौर :** प्रशासनाने सर्व पत्रकार बंधूंना अंदाजपत्रकिय पुस्तीका देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** अजुनाही अंदाजपत्रीकेयी पुस्तीका पत्रकारांना न दिल्याने मी सभागृहाचा निषेध व्यक्त करतो.

**मा.महापौर :** ठिक आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** शासनाकडून रूपये ७ कोटीतून रूपये ४.५० कोटी, मा.आमदार यांनी प्रयत्न करून महानगरपालिकेला मिळवून दिल्या बद्ल त्यांचे अभिनंदनाचा प्रस्ताव मी सभागृहात मांडीत आहे.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.रतनकुमार पंडागळे, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.बंडू प्रधान :** आमदारांनी वैयकितक प्रयत्न केलेले नसुन शासना कडील अनुदान मिळण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केलेले आहेत त्यामुळे सभागृहात अभिनंदनाचा प्रस्ताव मांडावा ज्यामध्ये मा.महापौर व मा.आयुक्त या चेही प्रयत्न होते.

**श्री.अजिज जहागिरदार :** शासना कडील अनुदान औरंगाबाद शहराच्या विकास कामासाठी आणन्याचे प्रयत्न करण्यात या जिल्हयाचे पालक मंत्री, मा.महापौर व मा.आयुक्त यांनी विशेष प्रयत्न केलेले असुन त्यांचे अभिनंदन करावे.

**मा.महापौर :** शहराचा विकास दुष्टीकोन लक्षात घेता मा.आमदारांचेही अभिनंदन करावयास हरकत नसावी परंतु या कामी मी स्वतःयाच सहा वेळेस मंत्रालयात जावून मान्यवर मंत्री महोदय आणि मा.मुख्यमंत्री यांची ही भेट घेतलेली आहे या मध्ये सर्वांचेय प्रयत्न लाभलेले आहेत.

**श्री.विठ्ठल पेरकर :** या शहराच्या आमदारांनी विकास कामामध्ये उलट अनेक अडथळे आणलेले असल्याने त्यांचा यामध्ये काहीच सहभाग नसल्याने अभिनंदन करून नये.

**श्री.तकीहसन :** ज्या आमदारांना विषयी सभागृहात चर्चा चालु आहे ते स्वतः या ठिकाणी उपस्थित नसुन त्यांचे अभिनंदन करावयाचा प्रश्नच उदभवत नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** हडको समोरील ३६ एकर जागा महापालिकेने भुसंपादन केलेली आहे तेव्हा महानगरपालिके तर्फे क्रिडा बाबत काहीही तरतुद केलेली नसुन या करीता संबंधित जागा ठेवण्यात यावी.

**श्री.नामदेव मानकापे :** अंदाजपत्रकातील पान क्र.४४ मध्ये नगररचना विभाग कडून घेतलेले कर्ज दि.१७-११-९९ असे दर्शविण्यात आलेले आहे तेव्हा ती दुरूस्ती व्हावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. सदरील दुरूस्ती करण्यात यावी.

**श्री.सुदाम वाघमारे :** अंदाजपत्रकातील पान क्र.१ मध्ये अ-३ मालमत्ता कर या शिर्षामध्ये अ-४ इतर करात करमणूक कर (शो टॅक्स) मध्ये मागील बैठकित रूपये ५०० हजार ठेवावे असे सुचविले होते ते आत रूपये ३०० हजार आहेत तर पान क्र.२ मध्ये विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली मध्ये बी-२ अन्वये बिल्डींग परवाना मध्ये

रूपये १२०० हजार सुचविण्यात आलेली होती ती रूपये १०००/- हजार आहे या दोन्होमध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :** यासर्व दुरूस्त्या स्थायी समिती सभेत झालेल्या आहेत.

**श्री.अशोक सायन्ना :** स्थायी समिती सभेत झालेल्या दुरूस्त्यांची माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** मागील तीन वर्षा पासुन मी सतत बोलत आहे की शहरामध्ये महिला प्रसाधन गृह बांधण्यास अंदाजपत्रकात तरतुद करावी परंतु या वर्षाही कोणतिही तरतुद केलेली नाही याचा मी सभागृहात निषेध करते व तशी तरतुद करावयाची असल्यास कित करणार याची माहिती द्यावी. अन्यथा मी सभा होवू देणार नाही.

**मा.महापौर :** आपण सुचित केल्याप्रमाणे तशी तरतुद करून घेता येईल.

**श्री.अलफखान :** १९९२-९३ चे अंदाजपत्रकातील इतर भांडवली कामे यामध्ये पोहण्याचा तलाव यासाठी रूपये ८ लाखशची तरतुद केलेली आहे तर नविन पोल बसविणे बाबत एम.एस.ई.बी. (सोसायटी) या मध्ये रूपये १७ लाखाची तरतुद केलेली आहे यामध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** नविन पोल बसविणेसाठी रूपये १७ लाखाची तरतुद केलेली असुन ले-आऊट बगैरेसाठी रूपये ६ लाखाची तरतुद केलेली आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** महानगरपालिकेतर्फे शहरात अद्ययावत असे क्रिंडागण होणेसाठी प्रस्ताव मंजुर झालेला आहे यासाठी महापालीकेने जागाही भुसंपादीत केलेली आहे तेव्हा त्या क्रिंडागणासाठी रूपये १० लाखाची तरतुद या अंदाजपत्रकात करण्यात यावी तसेच पान क्र.१ मध्ये मालमत्ता करात (३-१) सर्वसाधारण करामध्ये सन १९९०-९१ ला रूपये १.८० लाखाची तरतुद होती तर ती १९९१-९२च्या मुळ अंदाजपत्रकात ४.७५ लाख इतकी करण्यात आली हे कसे दर्शविण्यात आले.

**मा.महापौर :** यामध्ये सिडको भाग धरून संपुर्ण शहराचा मालमत्ता कर गृहीत धरण्यात आलेला आहे.

**श्री.नरेंद्र पाटील :** म्हणजे सिडको-हडको भागातील टॅक्स वसुली केल्यास इतके होईल असे या ठिकाणी धरलेले आहे काय ? तर गेली दोन वर्षापासून नेहरू रोजगार योजने अंतर्गत ज्या योजना महानगरपालिके तर्फे राबविल्या जाता आहेत त्या सर्व स्लम भागासाठी आहे काय ? यामध्ये मायको इंटरप्रायजेस व सेलटर ॲबग्रेडेशन बाबत मागील वर्षी काहीही केलेले नाही याची माहिती द्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** अंदाजपत्रकात म्हाडा व सर्व रिपोर्टसाठी रूपये १ लाखाची तरतुद आहे तर समारभाची बिले १५० हजार व पाहूणचार भत्ता मा.महापौर, मा.आयुक्त यांना रूपये १० हजार तसेच विद्युत खर्च रूपये ३५० हजाराची तरतुद केलेली आहे ती योग्य आहे काय ?

**मा.महापौर :** सदरची तरतुद अंदाजे करण्यात आलेली असुन आपल्याला दुरूस्ती करता येवु शकते.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** अंदाजपत्रकातील पान क्र.३ चे क-१० मधील पोहण्याचा तलावामध्ये काहीही दर्शविलेले नसुन म्हणजे पुढील वर्षा सुध्दा तलाव सुरू होणार नाही काय ?

**मा.महापौर :** यामध्ये दुरूस्ती करण्यात येईल म्हणजे कमीत कमी रूपये २५ हजार पर्यंताची तरतुद करण्यात येईल ज्यामुळे तलाव सुरू झाल्यास त्यापासुन हा फायदा अपेक्षित धरता येईल.

**सौ.लता दलाल :** संबंधित पोहण्याचा तलाव किती दिवसात येथील नागरिकांना खुला करून देणार आहात याची माहिती द्यावी या तलावासाठी आतापर्यत्न रूपये १ कोटी खर्च झालेला असुन हा खर्च केवळ पाण्यात गेलेला आहे त्यामुळे आजुन किती पैसा पाण्यात टाकावयाचा आहे याचा विचार व्हावा.

**मा.महापौर :** मी प्रत्यक्षात या कामा बाबत लक्ष घालून काय लावकरात लवकर सुरू करण्याचे प्रयत्न करणार आहोत (आहे)

**श्री.प्रदिप जैस्वाल :** गेल्या तीन वर्षा पासुन दिलेली येथील महापौरा भवनसाठी रूपये १ लाख देण्यातयाणे म्हणून तरतुद केलेली आहे तरंतु सारखे रिमाईंडर येवूनही त्यांना १ लाख रूपये पाठविण्यात येत नाही तेव्हा त्या ठिकाणी रूपये १ लाख पाठविण्याची मंजुरी द्यावी.

**मा.महापौर :** होय दिलेली येथील महापौर भवनसाठी रूपये १ लाख देण्याबाबत अंदाजपत्रकात तरतुद केलेली असुन ती पुढील माहेण्याच्या ११ एप्रिल रोजी होणाऱ्या व्यवस्थापकिय महापैरांच्या बैठकित मी स्वत: घेवून जाणारे आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पोहोण्याच्या तलावाचे बांधकाम संर्दभात जे संबंधित अधिकारी सध्या कार्यरत आहेत त्यांची इतर विभागत बदली करण्यात यावी.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** मागील वर्षी असा निर्णय घेतलेला आहे की १५% ची तरतुद आर्थिक दुष्या कमकवत असलेल्या घटकांसाठी ठेवण्यात यावी आणि त्यानुसार स्थायी समितीने मंजुरीही दिलेली आहे त्याप्रमाणे रूपये १ कोटी स्लम भागाच्या विकासासाठी ठेवण्यात यावे.

**श्री.बंडू प्रधान :** रूपये १ कोटी अल्पशी तरतुद असुन स्लम भागातील विकास करिता जास्तीची तरतुद करावी.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** १ कोटी २० लाख रूपयांची तरतुद या स्लम भागासाठी विकासासाठी करण्याची तरतुद करण्यात हरकत नाही.

**मा.महापौर :** तशी तरतुद करण्यात येणार आहे.

**श्री.रतनकुमार पंडाकळे :** पान क्र.३० मध्ये नौकरांना घर बांधणी अग्रीम देणेसाठीची अंदाजपत्रकातील तरतुद रूपये २० लाखाची आहे ती कमी असुन त्या ऐवजी त्यामध्ये वाढ करून रूपये ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

**श्री.बंडू प्रधान :** नौकरांना घरबांधणी अग्रिमाची तरतुद कमीत कमी रूपये ३० लाखाची करण्यात यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे रूपये २५ लाखाची तरतुद घर बांधशी अग्रिमासाठी करण्यात येते.

**श्री.रतनकुमार पंडाकळे :** पना क्र.३५ मध्ये डॉ.आंबेडकर संशोधन केंद्रासाठी यावर्षी काहीही तरतुद दाखविण्यात आलेली नाही.

**मा.महापौर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी तरतुद केल्याचे या अंदाजपत्रकातील हळक वैशिष्ठयामध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासाठी या अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे परंतु स्वातंत्र्यविर सावरकर यांच्या पुतळ्यासाठी यामध्ये काहीही तरतुद नाही.

**श्री.प्रदिप जैस्वाल :** संभाजी महाराज अण्णाभाऊ साठे व स्वांतत्र्यवीर सावरकर यांचे पुतळ्यासाठी रूपये १० लाखाची तरतुद या अंदाजपत्रकात करावी.

**मा.महापौर :** पुतळ्यांसाठी रूपये ५ लाखाची तरतुद केलेली आहे यापेक्षा जास्तीची तरतुद अंदाजपत्रकात करणे शक्य नाही कारण अंदाजपत्रकात शिल्लकी नसल्याने यासाठी जादा रक्कमेची तरतुद करता येत नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर, लता दलाल :** स.सदस्य श्री.प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे स्वतंत्र्यवीर सावरकर, संभाजी महाराज यांचे पुतळ्यासाठी रूपये १० लाखाची तरतुद यामध्ये करावी.

**मा.महापौर :** बजेटमध्ये प्रोव्हीजन नसल्याने तसे करता येणे शक्य नाही परंतु जो प्रस्ताव मंजुर झालेला आहे त्यावर प्रशासन अमलबजावणी करेल.

**सौ.लता दलाल :** पाणी पुरवठयाच्या संर्दभात या अंदाजपत्रकात जी तरतुद केलेली आहे त्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडून योग्य ती कार्यवाही होत नाही तर परिसर अभियांत्रीकी कार्यालया कडून जो पुरवठा केला जाणार आहे त्याप्रमाणष सन १९९२ पर्यंत तरी शहरातील नागरीकांना मुबलक पाणी पुरवठा सुरळीत होणार असे होते परंतु अद्याही काहीही झालेले नसुन अता उन्हाळा सुरू झाल्याने या कामाची गती वाढलेली दिसत नसुन सन १९९३ ला तरी शहरासाठी मुबलक पाणी पुरवठा होण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे बाबत संबंधित कार्याल्याना योग्य त्या सुचना द्याव्यात.

**मा.महापौर :** ठिक आहे या संर्दभात एक बैठक बोलावून योग्य त्या सुचना देण्यात येतील.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पान क्र.३ मध्ये पोहण्याचा तलावा बाबत या ठिकाणी कोणत्याही उत्पन्नाची तरतुद करण्यात आलेली नसुन सिध्दार्थ गार्डन मधील मिनी ट्रेन सुध्दा बऱ्याच दिवसापासुन बंद आहे म्हणजे त्यापासुन मिळणारे महापालिकेचे उत्पन्न कमी होत आहे तेव्हा मिनी ट्रेन येथील नागरीकांना कधी पर्यंत चालु करून देणार याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :** सिध्दार्थ गार्डन मधील मिनी ट्रेनची दुरूस्ती करण्याचे काम चालु असुन येत्या आठ दिवसात ती सुरू करण्यात येईल.

**श्री.अजिजुल्ला बेग :** शहरातील काही विविध ठिकाणी जवळपास १८ खेडया सारखे वसाहती तयार झालेल्या आहेत आणि त्या ठिकाणच्या सर्व घरांना टॅक्स लावण्याच्या दुष्टीकोनासतु सर्व्हे करणे आवश्यक असुन त्यासाठी एकंदर २० लाखाची या अंदाजपत्रकात तरतुद करावी आणि संबंधित भागाचा सर्व्हे करणे ही महानगरपालीकेची सर्वस्वी जबाबदारी असुन त्या नागरीकांना पी.आर.कार्ड तयार करून देणे आवश्यक आहे ज्यामुळे नियमाप्रमाणे लोकांना योग्य त्या सुविधांचा विचार करणे सुलभ होईल. तेव्हा नाही तरी कमीत कमी रूपये १० लाखांची या वर्षासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी.

**मा.महापौर :** या अंदाजपत्रकास तसे करणे योग्य नाही.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** स.सदस्य श्री.अजिजुल्ला बेग यांनी सुचित केल्याप्रमाणे व इतर काही स.सदस्यांनी ज्या सुचना सभागृहा समोर मांडल्या त्याबाबत विचार करण्यात यावा.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पान क्र.२८ मध्ये निवडणूकीसाठी रूपये २ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे ते कसे.

**मा.महापौर :** निवडणूका अजुन पुढेच आहेत परंतु त्या संबंधिच्या प्रकियेसाठी ही तरतुद केलेली आहे त्याच प्रमाणे महिला करीता प्रसाधन गृह बांधण्यासाठी रूपये ५ लाखाची तरतुद या अंदाज पत्रकात करण्यात येत आहे तर महापालीके तर्फे क्रिंडागणा तयार करण्यासाठी रूपये १० लाखाची तरतुद करण्यात येते आणि नौकरांना घर बांधशी अग्रिमासाठी रूपये २० लाखाची तरतुद केलेली होती त्यामध्ये पुन्हा रूपये ५ लाखाची वाढ करण्यात येते. त्याप्रमाणे इतर काही दुरूस्त्यांसह अंदाज पत्रकास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ३१-३-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने सन १९९२-९३ च्या अंदाजपत्रकात सुचविलेल्या दुरूस्त्या खालील प्रमाणे या सोबतच्या पत्रतात जोडण्यात येत आहे (पान क्र.१ व २ पहावे)

दिनांक : ३१-३-९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने सन १९९२-९३ च्या अंदाज पत्रकात सुचविलेल्या दुरूस्त्या.

| अ.क्र. | पान क्र. | बाब क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकातील तरतुद | सर्वसाधारण सभेने संमत केलेल्या अंदाजपत्रकातील तरतुद | वाढा/ पट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | जमा बाजु | | | |
| १ | | ५-३-४/१ | प्राथमिक शिक्षण वरील अनुदान | २०००० | २६३०० | +६३०० | |
| २ | | ६-७-११ | विशेष शासकीय अनुदान | २०००० | ४५१०० | +२५१०० | |
| | | | | **४००००** | **७१४००** | **+३१४००** | |

## महसुली खर्च

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४ | | डांबारी रस्ते पॅचवर्क | ३००० | २००० | -१००० | |
| २ | २९ | | सुधारीत बेतनत्र्येनी व थकबाकी | ५००० | २७०० | -२३०० | |
| ३ | ३० | | नोकरांना घरबांधणी अग्रिम | २००० | २५०० | +५०० | |
| ४ | २९ | | सिटी सर्व्हे | --- | १०० | +१०० | |
| ५ | २८ | | पुतळे खरेदी व दुरूस्ता | ५००० | ५०० | +२०० | |
| | | | **एकूण** | **१५०००** | **८०००** | **-२५००** | |

## भाडवली खर्च बाजु

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३१ | ब | पाणी पुरवठा मपना फडातुन करावयाची कामे | १०००० | ७००० | -३००० |
| २ | ३१ | १ | जालनिससारण मनपा फडातुन करावयाची कामे | ९००० | ५००० | -४००० |
| ३ | ३२ | ५ अ | रस्ते बांधणी मनपा फंडातील कामे | १२००० | ४५०० | -७५०० |
| ४ | ३२ | ब १ | अद्यायावत कतालखाना | ३०० | १००० | +७०० |
| ५ | ३३ | त | फायर टैडरखरेदी | १५०० | १००० | -५०० |
| ६ | ३३ | ग | विकास योजना अंतर्गत भुखंडाचे सरंक्षण | २००० | १००० | -१००० |
| ७ | ३२ | ग | विकास ईमारती | ३००० | ५००० | +२००० |
| ८ | ३२ | घ | इतर ईमारती व उर्वरीत कामे | ३५०० | ५००० | +१५०० |
| ९ | ३४ | | स्टेडीयम साठी खरेदी अग्रिम | ६५०० | ५०० | -६००० |
| १० | ३४ | | स्टेडीयम | | १००० | +१००० |
| ११ | ३४ | | महिलासाठी पक्षाधनगृह | ४७८०० | ३१५०० | -१६३०० |
| १२) | ३४ | | शासकिय अनुदानातील कामे | ४०००० | ९०२०० | +५०२०० |
| | | | | **८७०००** | **१२१७००** | **+३३९००** |

या व इतर दुरूस्त्यासह सन १९९१-९२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९२-९३ चे मुळ अंदाज पत्रकातील तरतुदी नुसार प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर राष्ट्र गिताने सभा संपली

स्वाक्षरीत/-
सविव
महापगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महापगरपालिका औरंगाबाद